म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
क्र. २२४८
१५०३

# मंडलशाही आणि समाजवाद

REFBK-0018711

प्रा. प्र. गो. ठोंबरे

दि कोल्हापूर
रायटर्स कोऑपरेटिव्ह
सोसायटी लि.

संदर्भ
निबंध २२५८
८०५६७
नार१६३

# भांडवलशाही

## आणि

# समाजवाद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८०५६७ वि. निबंध
स्थळ २२५८ नार१६३

लेखक

प्रा. प्रमोद गोविंद ठोंबरे एम्. ए.
कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.

REFBK-0018711

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८७११
सं. ठाणे (स्वतंत्र प्रत)

मुद्रक :
गोविंद वामन कुलकर्णी
सेवा मुद्रणालय, १६७ बी,
कोल्हापूर.

प्रकाशक :
प्रा. सुभाष बा. दापके एम्. ए.
दि कोल्हापूर रायटर्स
को–ऑप. सो. लि. करिता
१०४९ इ, शाहूपुरी ६ वी गल्ली
कोल्हापूर–१

© 'मांडवलशाही व समाजवाद' या
पुस्तकाचे सर्व हक्क लेखक
प्रा. प्रमोद गोविंद ठोंबरे ८५४
शाहूपुरी ५ वी गल्ली कोल्हापूर १
यांच्या आधीन आहेत.

मूल्य : सात रुपये फक्त

प्रकाशन : ता. २२ फेब्रूवारी १९७३

न पाहिलेले आजोबा

**कै. श्रीधर हरी ठोंबरे**

यांना

# परिचय

प्रा. प्रमोद गोविंद ठोंबरे हे सौ. सुमती गोविंद आणि श्री. गोविंद श्रीधर यांचे पुत्र. सध्या सोलापूर जिल्ह्यात असलेल्या मोडलिंब या गावी १९४१ साली जन्म. १९६४ साली अर्थशास्त्रातील पुणे विद्यापीठाची एम्. ए. पदवी संपादन केली. गेली नऊ वर्षे अर्थशास्त्राचे महाविद्यालयीन अध्यापक. संगमनेर महाविद्यालयात व्यावहारिक अर्थशास्त्र विभागाचे व कीर्ती ( आता राजर्षी शाहू ) महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख. सध्या कोल्हापूर येथील कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अर्थशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षक. महाविद्यालयीन शिक्षक होण्यापूर्वी सोलापूर समाचार, सोलापूर, तरुण भारत, पुणे, केसरी, पुणे या दैनिकात उपसंपादक व फायनँशिअल एक्स्प्रेस, मुंबईचे पुण्यातील प्रतिनिधी. भांडवलशाही व समाजवाद हे त्यांचे पहिलेच पुस्तक. दि कोल्हापूर रायटर्स को-ऑ. सो. लि. चे संस्थापक–कार्याध्यक्ष.

◇ ◇ ◇

# पुरस्कार

कोल्हापूर येथील कॉलेज ऑफ कॉमर्सच्या अर्थशास्त्र विभागातील प्रा प्रमोद ठोंबरे यांनी ‘ भांडवलशाही आणि समाजवाद ’ हे पुस्तक लिहून अभिनंदनीय कामगिरी पार पाडली आहे.

आमच्या विद्यापीठातील तृतिय वर्ष बी. कॉम. च्या विद्यार्थ्यांना आधुनिक आर्थिक विकासाचा आढावा घेताना भांडवलशाही आणि समाजवाद या अर्थ-व्यवस्थांचे अध्ययन करावे लागते. सदर कारणासाठी हे प्रा. प्रमोद ठोंबरे यांचे पुस्तक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपयुक्त वाटेल.

आज फक्त मोजकी पाठ्यपुस्तके महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मराठीत उपलब्ध आहेत. पूरक वाचनास उपयुक्त ग्रंथाची भर वेगाने पडली पाहिजे. त्या दृष्टीने प्रा. प्रमोद ठोंबरे यांचा प्रयत्न योग्य दिशेनेच आहे.

भांडवलशाही आणि समाजवाद यांना जाणून घेण्याविषयी सध्या सामान्य जनता फार उत्सुक आहे. सामान्य वाचकांची जिज्ञासा या समयोचित पुस्तकामुळे बऱ्याच अंशी तृप्त होईल.

प्रा. प्रमोद ठोंबरे यांची भाषा व विवेचन सुबोध आहे. पुस्तकाची मांडणी मुद्देसूद व रेखीव आहे. कोणाचीच बाजू न घेता त्यांनी दोन्ही अर्थ-व्यवस्थांच्या वैशिष्टचांची व गुणदोषांची सविस्तर चर्चा केली आहे. अलीकडील निवडक वाङ्मयाचा परामर्ष घेतला आहे, मान्यवर ग्रंथाचे आधार घेत विषयाची मांडणी केली आहे. लेखन सुगम करण्याच्या नादात विवेचनाचा कस न घालविण्याची खबरदारी लेखकाने कटाक्षाने घेतल्याचे दिसते. एका बैठकीत वाचून संपेल एवढ्या छोटेखानी पुस्तकात दोन्हीं अर्थव्यवस्थांची मुबलक माहिती बंदिस्त केली आहे.

हे पुस्तक केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीच आहे असे नाही. समाजाच्या सर्व थरांत आणि घरोघर जावे असे हे पुस्तक आहे.

मराठीतील ललित साहित्याचे दालन समृद्ध आहे. समाजशास्त्राचे दालन देखील असे समृद्ध असले पाहिजे. म्हणून प्रा. प्रमोद ठोंबरे यांच्या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत व्हावे. मराठीत अशा प्रकारची ग्रंथनिर्मिती होण्यास चालना मिळावी.

लेखन-कार्याबद्दल प्रा. प्रमोद ठोंबरे यांचे पुनश्च एकवार अभिनंदन. त्यांच्या पुस्तकास शुभेच्छा.

**प्रा. आ. दि. शिंदे**
बी. कॉम्. एफ्. सी. ए.
डीन
फॅकल्टी ऑफ् कॉमर्स,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८०५६९ निबंध
२२८५८ ०१।१६३

# प्रास्ताविक

मांडवलशाही व समाजवाद या दोन अर्थव्यवस्थांचा मराठीत निर्विकारपणे व आटोपशीरपणे परामर्श घेणाऱ्या पुस्तकाची गरज फार दिवसापासून होती. पण या दोन अर्थव्यवस्थांवरील देशी-परदेशी वाङ्मयाचे मंथन करून विषयाची मांडणी करणे फारच अवघड आहे. माझा हा प्रयत्न कितपत यशस्वी झाला हे वाचकांनीच ठरवावयाचे आहे.

विवेचन अद्ययावत् ठेवण्याचा प्रयत्न केलेला असला तरी मर्यादित पृष्ठ-संख्येत सर्व अंगोपांगांची चर्चा मी करू शकलो नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. जे. टिम्बरजेन यांच्या 'कन्व्हर्जन्स हायपॉथिसिस' चा परामर्श मी घेतलेला नाही. मराठीत ललितेतर वाचनाची सवय थोडी कमीच आहे. म्हणून एकाच वेळी वाचकाला फार ताण देणे बरे नव्हे असे मला वाटते. टीपादेखील ज्या त्या पृष्ठावर घेण्याऐवजी एकदम ओळीने शेवटी दिल्या आहेत. त्यामुळे काही वाचकांची गैरसोय होईल याची मला जाणीव आहे. पण टीपांची आडकाठी वाटणारांना वाचन सुलभ जाईल असा कयास आहे. असल्या विषयावरील बारीक टाइपातील छपाई त्रासदायक वाटेल म्हणून जरा मोठा टाइप निवडला आहे. भुवनेश्वर ठराव मराठीत उपलब्ध केल्याने थोडीफार सोय होईल असे वाटते.

पुस्तक लिहिताना अनेक विद्वान लेखकांच्या पुस्तकांचा मुक्तहस्ताने आधार घेतला आहे. त्या सर्व लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहे. शक्यतोवर ऋणनिर्देश केलेला आहे. अर्थात न्यून, दोषास्पद असे काही असेल तर ते केवळ माझेच आहे. वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून लेखन सुधारण्यास मी उत्सुक आहे.

प्रकाशनाबद्दल दि कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. कोल्हापूर या संस्थेचे आभार मानण्याचा औपचारिकपणा कसा दाखवावा असे कोडे पडावे इतके सदर संस्थेशी माझे जिव्हाळयाचे संबंध आहेत. या संस्थेतील माझ्या सर्व सहकाऱ्यांनी मला वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल मला कृतज्ञता वाटते. या पुस्तकाला प्रा. आ. दि. शिंदे, डीन, फॅकल्टी ऑफ कॉमर्स, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी पुरस्कार लिहून मला कायमचे उपकृत केले आहे.

सेवा मुद्रणालयाने वेळेवर सुबक छपाई करून दिली याबद्दल मालक श्री. गो. वा. कुलकर्णी, व्यवस्थापक श्री. स. कृ. आराध्ये आणि यांचे छापखान्यातील सहकारी यांचा मी आभारी आहे.

कोल्हापूर **प्र. गो. ठोंबरे**

१८ फेब्रुवारी १९७३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ............
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# अर्थव्यवस्था

भांडवलशाही, समाजवाद इत्यादि शब्द नेहमी आपल्या कानावरून जातात. त्यांचे नक्की अर्थ काय आहेत हे जाणून घेण्याची जिज्ञासा सर्वत्र आढळत नाही. ही सर्व अर्थव्यवस्थेच्या प्रकारांची नांवे आहेत एवढेच काहीतरी सामान्य माणसाला अस्पष्टपणे माहीत असते. निरनिराळ्या प्रकारच्या अर्थव्यवस्थांना वाहिलेले वाङ्मय विपुल. अशा वाङ्मयाच्या वाटेला चुकूनही न जाणारे सामान्य वाचकदेखील विपुल. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याला मात्र निरनिराळ्या अर्थव्यवस्थांच्या प्रकाराविषयी अज्ञान बाळगता येणार नाही.

शक्य तितक्या जास्तीतजास्त मानवी गरजा भागविण्यासाठी माणूस स्वत:भोवती निर्माण करत असलेल्या आर्थिक संघटनेच्या विविक्षित प्रकाराला अर्थव्यवस्था असे म्हणतात. आर्थिक संघटना म्हणजे गरजा भागविण्यासाठी माणसाने निर्माण केलेल्या संस्था. संस्था म्हणजे दुसरे तिसरे काही नसून केवळ कृती करण्याची एक विशिष्ट पद्धत अथवा निर्णय घेण्याचा वा व्यवस्थापन करण्याचा एक विशिष्ट मार्ग होय. म्हणून ‘मानवी गरजा भागविताना, आपली साधनसामुग्री वापरण्याचे कार्य अंगिकारण्यासाठी एखादा समाज अथवा एखादे राष्ट्र करीत असलेले समग्र व्यवहार’[1] अशा शब्दात अर्थव्यवस्थेच्या कल्पनेचा खुलासा करता येईल.

जगात अनेक प्रकारच्या अर्थव्यवस्था नांदून गेल्या व नांदत आहेत. त्यांचे वर्गीकरण करणे फार कठीण आहे. तरीपण आपल्या अभ्यासाच्या सोयीसाठी अर्थव्यवस्थेचे चार प्रकार पाडता येतील. ते असे : (अ) भांडवलशाही, (ब) समाजवाद, (क) साम्यवाद आणि (ड) फॅसिझम. हीच वर्गवारी आपण उराशी धरून बसलो तर धोक्याचे ठरेल.[२] विषय-प्रवेशापुरती ही वर्गवारी बरीच उपयुक्त आहे. निरनिराळ्या अर्थव्यवस्थांच्या नांवाचे उल्लेख अगदी सवंगपणे[३] आणि अर्थशून्यतेनेदेखील होण्याचे प्रसंग वारंवार घडत असतात. एखाद्या अर्थव्यवस्थेच्या नांवाचा नुसता उल्लेख होताच ऐकणाराचे पूर्वग्रह खडबडून जागे होतात. म्हणून भांडवलशाही, समाजवाद वगैरे निरनिराळ्या अर्थव्यवस्थांचा तौलनिक अभ्यास करताना अभ्यासकाने पूर्वग्रहांना—मग ते अनुकूल असोत वा प्रतिकूल—दूर ठेवणे इष्ट.[४]

वर उल्लेखलेल्या अर्थव्यवस्थांच्या चार प्रकारापैकी भांडवलशाही आणि समाजवाद या दोन प्रमुख अर्थव्यवस्थांचाच ऊहापोह या ठिकाणी करण्याचे ठरविले आहे.

◊ ◊ ◊

# भांडवलशाही

भांडवल ही कल्पना मानवी इतिहासाइतकी जुनी आहे. तरीपण भांडवलाच्या निर्णायक वर्चस्वावर आधारलेली अर्थप्रणाली म्हणून भांडवलशाहीचा जन्म औद्योगिक क्रांतीनंतर झाला. अर्थात, आज भांडवलशाहीशी निगडित असलेल्या बऱ्याच संस्था औद्योगिक क्रांतीपूर्वीदेखील शतकानुशतके अस्तित्वात होत्या. इंग्लंडला भांडवलशाहीची जननी मानतात. अमेरिका हे जगातील एक बलाढ्य राष्ट्र भांडवलशाहीचा केवळ आचारच ठेवत नाही तर त्याचा आंतरराष्ट्रीय पुरस्कारदेखील मोठ्या हिरीरीने करते. भांडवलशाहीची पद्धत पुरातन आहे. म्हणून जगातील बहुसंख्य समाज भांडवलशाहीवर आधारलेले आहेत.

## व्याख्या :

भांडवल आणि भांडवलशाही या दोन शब्दांची पुष्कळदा गल्लत होते. दोन्ही शब्द समानार्थी म्हणून वेळोवेळी वापरले जातात. पण ते शब्द भिन्न आहेत. उत्पादन-प्रक्रियेत उपयुक्त ठरणाऱ्या यंत्रे वगैरे वस्तूंचा बोध भांडवल या शब्दामुळे होतो तर भांडवलशाही या शब्दामुळे उत्पादन सामुग्रीच्या मालकीच्या आणि वापराच्या विविक्षित व्यवस्थेचा बोध होतो. भांडवल जेव्हा व्यक्तींच्या मालकीचे रहाते तेव्हा त्या भांडवलाचा वापर करण्याचा हक्क मालकांना रहातो. भांडवलाचे मालक भांडवलाचा त्याच मार्गाने वापर करणे पसंत करतात की ज्यामुळे त्यांचा जास्तीतजास्त

फायदा होईल असे त्यांना वाटते. म्हणून '**मनुष्यनिर्मित आणि निसर्गनिर्मित भांडवलाची खाजगी मालकी आणि तिचा खाजगी नफ्यासाठी वापर या गुणांनी युक्त असलेल्या आर्थिक संघटनेच्या पद्धतीला भांडवलशाही असे म्हणतात**' अशी भांडवलशाहीची व्याख्या देता येईल.[५] भांडवल ही चीज फक्त भांडवलशाहीतच असते असा गैरसमज होता कामा नये. भांडवलाचे अस्तित्व जसे भांडवलशाहीत आहे तसे ते इतर अर्थव्यवस्थांमध्येही आहे. समाजवादी समाजरचनेतदेखील भांडवलाचे अस्तित्व आहे. भांडवलाचे अस्तित्व आणि भांडवलाच्या मालकीचा प्रकार यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. भांडवलशाहीत भांडवलाचे अस्तित्व असून त्याच्या मालकीचा प्रकार 'खाजगी' स्वरूपाचा आहे. समाजवादातही भांडवलाचे अस्तित्व नाकारता येत नाही. पण तेथे भांडवलाच्या मालकीच्या आणि नियंत्रणाच्या कल्पना 'सार्वजनिक' स्वरूपाच्या आहेत. भांडवलशाही आणि समाजवाद यांच्यातील भेद भांडवलातून निर्माण झालेला नसून, भांडवलाच्या मालकीच्या आणि वापराच्या 'खाजगी' अथवा 'सार्वजनिक' प्रकारातून निर्माण झालेला आहे.

## भांडवलशाहीची वैशिष्ट्ये :

भांडवलशाहीत इतक्या विविध छटा आणि त्यावरील वाङ्मय इतके विपुल आहे की त्या अनुषंगाने या आर्थिक पध्दतीची ठळक, निवडक वैशिष्ट्ये सांगणे फार कठीण आहे. तरीपण खालील मुख्य वैशिष्ट्याबाबत दुमत होणार नाही.

**१. आर्थिक विवेकाचे वर्चस्व :** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यक्तींचे आर्थिक विवेकानुसार वागणे गृहीत धरलेले असते. वस्तू आणि सेवा संपादन करताना किंवा त्यांचा वापर करताना आर्थिक हिताच्या जपणुकीच्या प्रेरणेने माणूस वागत असतो. कमीत कमी त्यागात अथवा

खर्चात जास्तीतजास्त समाधान मिळावे यासाठी त्याची धडपड चालू असते. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या व्यक्ती व्यय आणि लाभ यांच्यातील समतोल कटाक्षाने राखतात. पण हे नेहमी, न चुकता घडेलच असे नाही. कधी कधी आर्थिक लाभाकडे दुर्लक्ष करून ध्येय, भावना, आपद्धर्म वगैरेंच्या आहारी जाऊन माणूस अव्यवहारीपणे वागण्याची उदाहरणे फार दुर्मिळ नाहीत. व्यक्तिपेक्षा जॉईंट स्टॉक कंपनीसारख्या व्यक्तीभूत संस्थेला आर्थिक विवेकानुसार निर्णय घेणे अधिक चांगले जमते. आर्थिक विवेकानुसार होणारे निर्णय भांडवलशाही अर्थकारणात सुसंवाद निर्माण करण्यास प्रेरणादायक ठरतात. प्रत्येक उद्योगसंस्था आर्थिक सद्सद्विवेकबुद्धीच्या आदेशानुसार व्यवहार करते. त्यामुळे सर्व व्यवहारांना सुव्यवस्थित व्यापारी व्यवहारांचे स्वरूप येते. आपल्याप्रमाणेच बाकीचे व्यापारी आणि उद्योगपतीदेखील अशाच आर्थिक सद्सद्विवेकबुद्धीच्या आदेशानुसार वागत असल्याची जाणीव प्रत्येकाला असते. भांडवलशाही अर्थकारणात सर्व आर्थिक व्यवहारामागील प्रेरणा एकच एक ( म्हणजे आर्थिक विवेकाची ) असल्यामुळे तेथे सुव्यवस्था दृष्टीस पडते, असे म्हणतात.

**२. खाजगी मालमत्ता :** खाजगी मालमत्ता ही भांडवलशाहीतील मौलिक संस्था आहे. मालमत्तेच्या मालकीचा हक्क मालकाकडे सुपूर्द असतो. तो सुरक्षित ठेवण्याची हमी समाजाने घेतलेली असते. मालकी हक्कामुळे मालकी वस्तूंच्या वापराचे नियंत्रण करण्यचा हक्क मालकाला आपोआपच प्राप्त होतो. मौल्यवान वस्तू संपादणे, सांभाळणे, केवळ स्वतःसाठी वापरणे, त्यांची विल्हेवाट लावणे, अशा वस्तू इतरांना वापरावयास देण्याचा प्रसंग आल्यास वापरणारांनी त्या कोणत्या अटीवर वापराव्यात हे ठरविणे इत्यादि हक्कांचा समावेश खाजगी मालमत्तेच्या हक्कात होतो. मालकी हक्कांच्या वस्तूत जसा यंत्रे, कारखान्यांच्या इमारती इत्यादि दृष्य वस्तूंचा समावेश होतो, त्याच प्रमाणे लौकिक मूल्यासारख्या

(गुड वुइल) अदृष्य वस्तूंचाही समावेश होतो. खाजगी मालमत्ता म्हणजे वस्तूंचा नुसता कब्जा नव्हे. भाडेकरूच्या ताब्यात घर असते, पण तो घराचा मालक नसतो. तो फक्त भाडेपट्ट्याचा मालक असतो.

'सरकारने खाजगी मालमत्तेस दिलेली मान्यता आणि मालकी–हक्कांच्या संरक्षणाची दिलेली हमी' हे खाजगी मालमत्तेच्या संस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. एखाद्या मालमत्तेचा कायदेशीर मालक कोण असा प्रश्न उद्भवल्यास त्या विषयीचा अंतिम निर्णय देण्याचा अधिकार सरकारचा असतो. मालकी हक्काइतकेच कराराविषयक हक्कही महत्त्वाचे ठरतात. व्यक्ती आणि उद्योग-संस्था आपल्या दैनंदिन व्यवहारात सतत करार करीत असतात. जीवन म्हणजे करारांची एक मालिकाच आहे, असे म्हटले तरी चालेल. या करारातून काही हक्क-कर्तव्ये उद्भवत असतात. अशी करारातून उद्भवलेली हक्क-कर्तव्ये आणि दृष्यादृष्य वस्तूवरील मालकी हक्क या दोहोंचाही खाजगी मालमत्तेत अंतर्भाव केल्याखेरीज खाजगी मालमत्तेच्या संस्थेचे भांडवलशाहीतील खरेखुरे महत्त्व स्पष्ट होत नाही. भांडवलशाहीत खाजगी मालमत्ता बाळगण्या-वगैरे बाबतच्या स्वातंत्र्याबरोबरच सर्वसाधारण कायद्याच्या चौकटीत राहून करार करण्याच्या स्वातंत्र्याचेही सरकारने जतन केलेले असते.

उत्पादकांच्या वस्तू आणि करारनामे यांना खाजगी मालमत्ता मानणे हा भांडवलशाहीचा गाभा आहे. जर तो नष्ट झाला तर भांडवलशाही संपुष्टात येईल. तसेच भांडवलशाहीला पर्यायी व्यवस्था निर्माण करावयाची झाल्यास खासगी मालमत्तेच्या स्वरूपात बराच बदल करावा लागेल. खाजगी मालमत्तेची संस्था भांडवलशाहीत महत्त्वाची कार्ये बजावत असते. उत्पादक घटकाकडून कोणती कार्ये करवून घ्यावयाची याबाबतचा निर्णय कोणी घ्यावयाचा (अर्थात खाजगी मालमत्तेच्या मालकांनी) या विषयी खाजगी मालमत्तेच्या हक्कामुळे संदिग्धता रहात नाही. तसेच बचत करण्याच्या, संपत्ती-

संग्रहाच्या, त्याचे जतन करण्याच्या वृत्तीला उत्तेजन मिळते. अर्थात, मालमत्तेचा हक्क अनिर्बंध नाही. सार्वजनिक व्यवहारांचे नियमन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्बन्ध खाजगी मालमत्तेच्या हक्कावर असतात. पण असे निर्बंध असले तरी अर्थव्यवहारविषयक निर्णय घेण्याचे आणि मालकीच्या वस्तूंचा वापर करण्याचे बहुतेक अधिकार खाजगी व्यक्ती वा संस्था यांच्याकडेच रहातात हे विशेषकरून लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**३. वारसा :** वारसा हक्क हे खाजगी मालमत्तेचेच एक अंग आहे. तरीपण निदान सैद्धान्तिक विवेचनात तरी वारसा-हक्क खाजगी माल-मत्तेच्या हक्कापासून वेगळे करता येणे शक्य आहे. खाजगी मालमत्ता वारशाने हस्तांतरित होणे या क्रियेला दोन बाजू आहेत. एक म्हणजे मालमत्ता वारशाने देण्याचा अधिकार आणि दुसरी बाजू म्हणजे ती मालमत्ता वारशाने स्वीकारण्याचा अधिकार. मालमत्तेच्या मालकाला आपले मालकी हक्क आपल्या पश्चात कोणास मिळावे हे निर्देशित करण्याचा अधिकार आहे. तसेच मयत मालकाच्या वारसास मयताची मालमत्ता आपल्या नांवे करून घेण्याचा अधिकार आहे. वारसा हक्कात दुरुस्ती होणे अशक्य नाही. इतकेच काय पण वारसा हक्क नष्ट करूनदेखील खाजगी मालमत्तेची संस्था जिवंत ठेवता येईल. निरनिराळ्या प्रकारच्या मालमत्तेचे वारशाने होणारे हस्तांतर निरनिराळ्या प्रकारे करण्याचे कायदे अथवा संकेत आहेत. यावरून वारसा हक्कांचे विविध प्रकारे नियमन करता येते व हे हक्क, खाजगी मालमत्तेच्या हक्कापेक्षा वेगळे आहेत, हे स्पष्ट होते. भांडवलशाहीच्या निरंतर अस्तित्वासाठी वारसा हक्कांची संस्था अत्याव-श्यक आहे. ही संस्था नष्ट केल्यास, केवळ खाजगी मालमत्तेच्या संस्थेच्या आधारावर भांडवलशाही तग धरणे अशक्य आहे. मालमत्तेचा संचय करण्यास व त्या संचयाचे जतन करण्यास प्रोत्साहन खाजगी मालमत्तेच्या संस्थेमुळे मिळत असले तरी वारसा हक्कांच्या सोईमुळे वरील क्रियेस

सहाय्य होते यात शंका नाही. घराण्याला ऐश्वर्य यावे आणि ते पिढ्यान्-पिढ्या टिकावे म्हणून श्रीमंतांना वारसा हक्कांचे सहाय्य होते. मुला-बाळांच्यासाठी थोडीफार माया मागे ठेवता यावी म्हणून गरीब कुटुंबे-देखील धडपडत असताना दिसतात. अगदी दरिद्री वर्ग वगळता इतर सर्व वर्गांना मालमत्ता-संचय करण्याची दुय्यम प्रेरणा वारसा-हक्कांच्या तरतुदींमुळे होते. वारसा-हक्कांची संस्था हे भांडवलशाही अर्थकरणाचे उपजत वैशिष्ट्य आहे. ही संस्था निसर्गाने निर्माण केलेली नाही. माणसाने निर्माण केलेली आहे. त्यामुळे या संस्थेत बदल करण्याचा माणसाला पूर्ण अधिकार आहे. इतकेच काय पण या तरतुदी नष्ट करण्याचादेखील माणसाला अधिकार आहे.

**४. व्यक्तिगत उपक्रमशीलतेचे स्वातंत्र्य :** भांडवलशाहीत सर्व व्यक्तींना आर्थिक व्यवहाराबाबत उपक्रमशीलता दाखविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. व्यक्तीची भूमिका उपभोक्त्याची असेल अथवा संयोजकाची असेल, ज्या त्या क्षेत्रात मुक्तपणे वागण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असते. आपली प्राप्ती हव्या त्या वस्तू आणि सेवा विकत घेण्यासाठी खर्च करण्याची, तसेच सदर वस्तू आणि सेवा यांचे आवडेल त्या पद्धतीने सेवन करण्याची ग्राहकाला मुभा असते. ग्राहक आपणाला हव्या असलेल्या वस्तू आणि सेवा मिळविण्यासाठी किंमतीच्या रूपाने आमिष दाखवितो. या आमिषामुळे उत्तेजित होऊन सर्व उत्पादक ग्राहकांच्या गरजा पुऱ्या करण्यासाठी झटतात. ग्राहक हुकूम सोडत आहेत व इतरेजन त्यांचे हुकूम शिरसावंद्य मानत आहेत असे चित्र भांडवलशाहीत दिसते. म्हणून भांडवलशाही अर्थकारणाचे सार्वभौमत्व ग्राहकाकडे आहे असे म्हणतात. ग्राहकाचे सार्वभौमत्व ग्राहकाला असलेल्या उपक्रमशी-लतेच्या स्वातंत्र्यातून निर्माण होते. स्वातंत्र्य जसे ग्राहकांना आहे तसे ते उत्पादक घटकांच्या मालकांनाही आहे. नोकरी कोणत्या क्षेत्रात करावी व कोणत्या परिस्थितीत करावी हे ठरविण्याचा अधिकार

कामगाराला आहे. स्वातंत्र्य असल्यामुळे अधिक लाभ असलेल्या नोकरीत जाण्यास त्याला मज्जाव नसतो. म्हणजे कामगाराने कोठे काम करावे याबाबत समाजाची जी इच्छा असते ती तो पुरी करत असतो. जे कामगाराबाबत तेच जमीन, भांडवल याबाबत म्हणता येईल. जमिनीचा वापर ज्याप्रकारे होण्याची निकड आहे त्याप्रकारे तो व्हावा म्हणून समाज जमीन-मालकाला वाढवून दिलेल्या खंडाचे आमिष दाखवेल. जर जमीन-मालक आपली जमीन इच्छेनुसार वापरण्याची मुभा देत असेल तरच समाजाला हव्या असणाऱ्या कारणासाठी जमीन वापरणे त्याला शक्य होईल. एखाद्या उद्योगात अधिक भांडवल ओतण्याची समाजाला निकड वाटल्यास, समाज, नवे भांडवल आकर्षित करण्यासाठी व्याजाचा दर वाढवून द्यावयास तयार होईल. आपले भांडवल इच्छेनुसार वापरण्याची भांडवलदारास संधी असल्याखेरीज समाजाची इच्छा पूर्ण होऊ शकणार नाही. म्हणजे ग्राहकाच्या सार्वभौमत्वाबरोबर व्यवसाय स्वातंत्र्यही उपक्रमशीलतेच्या स्वातंत्र्यात समाविष्ट आहे. संयोजकांनादेखील उपक्रमशीलता दाखविण्याची मोकळीक असते. आपला उद्योग भागीदारीत चालावा की कंपनी कायद्यानुसार चालावा, उत्पादनाची साधनसामुग्री कशी जमवावी, त्यासाठी किती मोबदला द्यावा, उत्पादनाची विक्री कशी करावी इत्यादि गोष्टींचे निर्णय किफायतशीरपणाच्या निकषावर घेण्याचे संयोजकाला स्वातंत्र्य असावे लागते. व्यवसायाचे स्वातंत्र्य आणि संयोजनाचे स्वातंत्र्य या दोन गोष्टीमुळे पूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण होते. उत्पादक घटकामध्ये बेकारी आढळल्यास बेकार उत्पादक घटक आपली किंमत कमी करून घेऊन काम शोधतील असे गृहीत धरलेले असते. उपक्रमशीलतेचे स्वातंत्र्य उपभोगावयास मिळाल्यास माणसाच्या कल्पकतेस प्रोत्साहन मिळते. निरनिराळे प्रयोग करावेसे वाटतात. त्यातून नवे तंत्रज्ञान हाती येते. प्रगतीच्या वाटा मोकळ्या होतात. व्यावसायिक, यांत्रिक वगैरे प्रकारचे शोध उपक्रमशीलतेस वाव नसता तर लागणे

(गुड वुइल) अदृष्य वस्तूंचाही समावेश होतो. खाजगी मालमत्ता म्हणजे वस्तूंचा नुसता कब्जा नव्हे. भाडेकरूच्या ताब्यात घर असते, पण तो घराचा मालक नसतो. तो फक्त भाडेपट्टयाचा मालक असतो.

'सरकारने खाजगी मालमत्तेस दिलेली मान्यता आणि मालकी—हक्कांच्या संरक्षणाची दिलेली हमी' हे खाजगी मालमत्तेच्या संस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. एखाद्या मालमत्तेचा कायदेशीर मालक कोण असा प्रश्न उद्भवल्यास त्या विषयीचा अंतिम निर्णय देण्याचा अधिकार सरकारचा असतो. मालकी हक्काइतकेच करारविषयक हक्कही महत्त्वाचे ठरतात. व्यक्ती आणि उद्योग-संस्था आपल्या दैनंदिन व्यवहारात सतत करार करीत असतात. जीवन म्हणजे करारांची एक मालिकाच आहे, असे म्हटले तरी चालेल. या करारातून काही हक्क-कर्तव्ये उद्भवत असतात. अशी करारातून उद्भवलेली हक्क-कर्तव्ये आणि दृष्यादृष्य वस्तूवरील मालकी हक्क या दोहोंचाही खाजगी मालमत्तेत अंतर्भाव केल्याखेरीज खाजगी मालमत्तेच्या संस्थेचे भांडवलशाहीतील खरेखुरे महत्त्व स्पष्ट होत नाही. भांडवलशाहीत खाजगी मालमत्ता बाळगण्या-वगैरे बाबतच्या स्वातंत्र्याबरोबरच सर्वसाधारण कायद्याच्या चौकटीत राहून करार करण्याच्या स्वातंत्र्याचेही सरकारने जतन केलेले असते.

उत्पादकांच्या वस्तू आणि करारनामे यांना खाजगी मालमत्ता मानणे हा भांडवलशाहीचा गाभा आहे. जर तो नष्ट झाला तर भांडवलशाही संपुष्टात येईल. तसेच भांडवलशाहीला पर्यायी व्यवस्था निर्माण करावयाची झाल्यास खासगी मालमत्तेच्या स्वरूपात बराच बदल करावा लागेल. खाजगी मालमत्तेची संस्था भांडवलशाहीत महत्त्वाची कार्ये बजावत असते. उत्पादक घटकाकडून कोणती कार्ये करवून घ्यावयाची याबाबतचा निर्णय कोणी घ्यावयाचा (अर्थात खाजगी मालमत्तेच्या मालकांनी) या विषयी खाजगी मालमत्तेच्या हक्कामुळे संदिग्धता रहात नाही. तसेच बचत करण्याच्या, संपत्ती-

संग्रहाच्या, त्याचे जतन करण्याच्या वृत्तीला उत्तेजन मिळते. अर्थात, मालमत्तेचा हक्क अनिर्बंध नाही. सार्वजनिक व्यवहारांचे नियमन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्बन्ध खाजगी मालमत्तेच्या हक्कावर असतात. पण असे निर्बंध असले तरी अर्थव्यवहारविषयक निर्णय घेण्याचे आणि मालकीच्या वस्तूंचा वापर करण्याचे बहुतेक अधिकार खाजगी व्यक्ती वा संस्था यांच्याकडेच रहातात हे विशेषकरून लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**३. वारसा :** वारसा हक्क हे खाजगी मालमत्तेचेच एक अंग आहे. तरीपण निदान सैद्धान्तिक विवेचनात तरी वारसा–हक्क खाजगी मालमत्तेच्या हक्कापासून वेगळे करता येणे शक्य आहे. खाजगी मालमत्ता वारशाने हस्तांतरित होणे या क्रियेला दोन बाजू आहेत. एक म्हणजे मालमत्ता वारशाने देण्याचा अधिकार आणि दुसरी बाजू म्हणजे ती मालमत्ता वारशाने स्वीकारण्याचा अधिकार. मालमत्तेच्या मालकाला आपले मालकी हक्क आपल्या पश्चात कोणास मिळावे हे निर्देशित करण्याचा अधिकार आहे. तसेच मयत मालकाच्या वारसास मयताची मालमत्ता आपल्या नांवे करून घेण्याचा अधिकार आहे. वारसा हक्कात दुरुस्ती होणे अशक्य नाही. इतकेच काय पण वारसा हक्क नष्ट करूनदेखील खाजगी मालमत्तेची संस्था जिवंत ठेवता येईल. निरनिराळ्या प्रकारच्या मालमत्तेचे वारशाने होणारे हस्तांतर निरनिराळ्या प्रकारे करण्याचे कायदे अथवा संकेत आहेत. यावरून वारसा हक्कांचे विविध प्रकारे नियमन करता येते व हे हक्क, खाजगी मालमत्तेच्या हक्कापेक्षा वेगळे आहेत, हे स्पष्ट होते. भांडवलशाहीच्या निरंतर अस्तित्वासाठी वारसा हक्कांची संस्था अत्यावश्यक आहे. ही संस्था नष्ट केल्यास, केवळ खाजगी मालमत्तेच्या संस्थेच्या आधारावर भांडवलशाही तग धरणे अशक्य आहे. मालमत्तेचा संचय करण्यास व त्या संचयाचे जतन करण्यास प्रोत्साहन खाजगी मालमत्तेच्या संस्थेमुळे मिळत असले तरी वारसा हक्कांच्या सोईमुळे वरील क्रियेस

कठीण होते. माणसाला कल्पकतेचे स्वातंत्र्य देणे म्हणजे त्याच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेस चेतना देणे. पण ग्राहकस्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, संयोजनस्वातंत्र्य आणि कल्पनास्वातंत्र्य या घटकानिशी बनलेले उपक्रमशीलतेचे स्वातंत्र्य म्हणजे अनिर्बंध स्वातंत्र्य नव्हे. ग्राहकाने कसा उपभोग घ्यावा, उत्पादक-घटकांनी इच्छित काम कसे मिळवावे, संयोजकाने कोणत्या चौकटीत राहून संयोजन-चातुर्य दाखवावे, कोणती नावीन्य-निर्मिती समाजाला हितकारक आहे याबाबतीत समाज आवश्यक तितके नियम करत असतो. या नियमांना पात्र राहूनच उपक्रमशीलतेचे स्वातंत्र्य उपभोगता येते.

**५. स्पर्धा :** स्पर्धा हे भांडवलशाही अर्थकारणाचे आणखी एक वैशिष्ट्य असून ते बऱ्याच अंशी उपक्रमशीलतेच्या स्वातंत्र्यातून उद्‌भवलेले आहे. भांडवलशाहीत सर्वत्र स्पर्धा आढळते. विक्रेते ग्राहक मिळविण्यासाठी आपापसात स्पर्धा करत असतात तर ग्राहक गरजेच्या वस्तू मिळविण्यासाठी आपापसात स्पर्धा करत असतात. काम मिळविण्यासाठी कामगारांची आपापसात चढाओढ असते तर नोकरमाणसे मिळविण्यासाठी मालकमंडळी एकमेकाशी चढाओढ करत असतात. कर्ज घेऊ इच्छिणारे लोक ते हस्तगत करण्यासाठी आपापसात स्पर्धा करतात तर आपल्या बचतीसाठी गुंतवणुकीचा योग्य मार्ग शोधण्यासाठी बचत करणाऱ्या व्यक्तींची धडपड चाललेली असते. काही उत्पादक-घटक पर्यायी उपयोगाचे असतात. उपलब्ध असलेली संधी आपल्यालाच मिळावी म्हणून उत्पादक-घटकात स्पर्धा असते. उदाहरणार्थ मजूर आणि यंत्रे एकमेकास पर्यायी आहेत. म्हणून उपलब्ध संधी हस्तगत करण्यासाठी श्रमशक्ती आणि भांडवल यांच्या मालकात स्पर्धा आढळते. एकापेक्षा अधिक पक्ष असल्याखेरीज स्पर्धा होऊ शकत नाही. स्पर्धेत उतरलेल्या पक्षांची संख्या एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जेवढी जास्त तेवढी स्पर्धेची तीव्रता अधिक. बाजारपेठा मुक्तद्वार असल्याखेरीज स्पर्धेला

वाव मिळत नाही. म्हणून मुक्त बाजारपेठेचे अर्थकारण असेही भांडवलशाहीचे वर्णन करतात. स्पर्धा भांडवलशाहीचा अविभाज्य घटक आहे हे त्यावरून स्पष्ट होते. स्पर्धेमुळे दोन महत्त्वाची कार्ये भांडवलशाहीत साधतात. एक म्हणजे स्पर्धेमुळे वाजवी किंमती अस्तित्वात येतात व त्या टिकून रहातात आणि दुसरे म्हणजे अर्थव्यवस्थेत आणि विशेषतः उत्पादनाच्या क्षेत्रात कार्यक्षमता येते. स्पर्धेच्या भतीमुळे कोणीही अवास्तव किंमत मिळविण्याचा हव्यास धरत नाही. उत्पादन खर्च किमान पातळीवर ठेवण्याचा अट्टाहास होतो. अशा प्रकारे वाजवी किंमत आणि कार्यक्षमता या दोन गुणांचा लाभ होतो. उपक्रमशीलतेच्या स्वातंत्र्यातून जशी स्पर्धा निर्माण होते तशी मक्तेदारीही निर्माण होऊ शकते. पण मक्तेदारी आणि विशेषतः खाजगी मक्तेदारी भांडवलशाहीशी पूर्णपणे विसंगत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मक्तेदारीमुळे स्पर्धेच्या वातावरणाला बाधा येते. त्यामुळे वाजवी किंमत आणि कार्यक्षमता या गुणांना भांडवलशाही मुकते. म्हणून जातिवंत भांडवलशाही राष्ट्रे मक्तेदारीच्या नियमनाचा हिरीरीने पुरस्कार करताना आढळतात.[१] भांडवलशाहीच्या परिपूर्णतेसाठी मक्तेदारीस प्रतिबंध होणे आवश्यक आहे. स्पर्धा अनिर्बंध राहिली पाहिजे. परस्पराशी स्पर्धा करण्याच्या हक्कावर गदा आल्यास त्या अर्थकारणाला भांडवलशाही स्वरूप टिकविता येणार नाही. जेथे स्पर्धेचे प्राबल्य तेथे भांडवलशाहीचे अस्तित्व आणि जेथे मक्तेदारीचे प्राबल्य तेथे भांडवलशाहीचा लोप.

**६. नफ्याची प्रेरणा :** आतापर्यंत वर्णन केलेली वैशिष्ट्ये जशी भांडवलशाहीत आढळतात तशी ती, निदान त्यांची भ्रष्ट रूपे तरी, अन्य अर्थव्यवस्थांमध्ये आढळू शकतात. पण नफ्याच्या प्रेरणेचे वैशिष्ट्य हे असे एकच वैशिष्ट्य आहे की जे भांडवलशाहीच्या कक्षेबाहेर आढळत नाही. प्रथम नफ्याची प्रेरणा म्हणजे काय ते पाहू. नफा

म्हणजे खर्चापेक्षा जादा असलेली जमा होय. पण नफा धन अथवा ऋणदेखील ( म्हणजे तोटा ) असण्याची शक्यता असल्यामुळे जमेचे खर्चावरील आधिक्य असे म्हणण्याऐवजी जमा आणि खर्च यांच्यामधील फरक असे म्हणणे आधिक योग्य दिसेल. प्रेरणा म्हणजे कृतीस उत्तेजन देणारी गोष्ट. आपले विवेचन पैशाचा वापर करणाऱ्या समाजापुरते मर्यादित असल्यामुळे नफ्याची प्रेरणा या शब्दामुळे ' कृतीस उत्तेजन देणारा जमा आणि खर्च यांच्यामधील पैशाच्या स्वरूपातील फरक ' असा अर्थबोध होतो. व्यक्ति, भागीदाऱ्या अथवा कंपन्या जेव्हा जमा आणि खर्च याच्यामधील पैशाच्या स्वरूपातील फरक अजमावतात आणि त्यावरून एखादी सुसंगत कृती करतात तेव्हा नफ्याची प्रेरणा कार्यवाहीत आहे असे म्हटले जाते. मागील वर्षाचे हिशोब पाहून पुढील वर्षाचे धोरण ठरविताना नफ्याची प्रेरणा कार्यरत असते. नुसत्या नफ्याचे अथवा नुसत्या प्रेरणेचे अस्तित्व असले म्हणजे भागते असे नाही. भांडवलशाहीची कसोटी पुरी होण्यासाठी नफा आणि त्याची प्रेरणा या दोन्ही गोष्टी एकत्र असणे आवश्यक आहे. रशियात हिशोब करण्याच्या निमित्तापुरता नफा अस्तित्वात आहे. तसेच तेथे अर्थकारणाला प्रेरणा देणारे घटकही आहेत. पण या दोन्ही गोष्टी एकत्र नसल्यामुळे तेथील अर्थव्यवस्था भांडवलशाही ठरत नाही. नफ्याच्या प्रेरणेमुळे संयोजकाच्या निर्णय घेण्याच्या कार्यावर परिणाम होतो. नवे उत्पादन अंगिकारणे, जुन्या उत्पादनात सुधारणा करणे इत्यादिबाबत योग्य ते निर्णय नफ्याच्या प्रेरणेने होतात. या प्रेरणेमुळे साधनसामुग्रीचे निरनिराळ्या उपयोगासाठी आपोआप वाटप होते. जिकडे नफा जास्त तिकडे आपोआप अधिक साधनसामुग्री आकर्षित होते. त्यामुळे साधनसामुग्रीचे मुद्दाम वाटप करण्याचे कारण उरत नाही. नफ्याची प्रेरणा म्हणजे भांडवलशाहीतील नियंत्रण-यंत्रणाच आहे. सर्व आर्थिक व्यवहारात समन्वय साधण्याचे, व्यक्तीला संयोजक बनण्यास उद्युक्त करण्याचे, संयोजकाला कार्यक्षम बनविण्याचे कार्य

नफ्याच्या प्रेरणेतून होत असते. नफ्याची प्रेरणा म्हणजे संयोजन-शक्तीचा स्रोत. म्हणूनच 'भांडवलशाहीचा प्राण' असे नफ्याच्या प्रेरणेचे सार्थ वर्णन केले जाते.[७]

## भांडवलशाहीचे गुण :

अमेरिका भांडवलशाहीचा सक्रीय पुरस्कार करणारे राष्ट्र आहे. तिच्या अर्थकारणाच्या अभ्यासानंतर जाणवणारे भांडवलशाहीचे गुण खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. लवचिकता :** भांडवलशाहीने उत्क्रान्तीची अवस्था दीर्घकाळ अनुभवली आहे. त्यामुळे बदलत्या परिस्थितीशी मिळतेजुळते घेण्यासाठी लागणारा लवचिकपणा या पद्धतीत विशेष करून आढळतो. भांडवशाही-तील संस्था काळाच्या गरजेनुसार सतत बदलत राहिल्या असून बरेच नवे बदल सामावून घेण्याचे आणि पचविण्याची श्रेय भांडवलशाहीने मिळविले आहे. कधी युद्ध तर कधी शांतता, कधी मंद तर कधी द्रुत तांत्रिक प्रगती, साधनसामुग्रीचा कधी सढळ वापर तर कधी तिचे दुर्भिक्ष अशा विविध अवस्था भांडवलशाहीने अनुभवल्या. कंपनी या उद्योग-संघटना प्रकाराशी तर भांडवलशाही इतकी एकरूप झाली की अशा कंपन्या निघण्यापूर्वीदेखील भांडवलशाही अस्तित्वात होती याची आठवण करून द्यावी लागते. सहिष्णुता, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रवृत्ती यामुळे भांडवलशाहीतील संस्थांची गरजेनुरूप उत्क्रान्ती घडवून आणण्याचे कार्य पार पडू शकले. सामाजिक कल्याणाची वृद्धी व्हावी म्हणून स्वत:वरील असंख्य सरकारी निर्बंध भांडवलशाहीने सहन केले.

**२. वाढते राहणीमान :** भांडवलशाहीतील रहिवाशांना वाढत्या राहणीमानाचा लाभ घडवून देण्यात भांडवलशाही पुष्कळच यशस्वी झाली आहे. याबाबत अमेरिकेचे उदाहरण बोलके आहे. १९२० पर्यंत

अमेरिकेच्या आर्थिक विकासाची चढती कमान होती. १९३० मध्ये महामंदीमुळे अर्थकारणात पेचप्रसंग निर्माण झाला खरा, पण त्यामुळे मोठी पीछेहाट पत्करावी लागली नाही. उलट झाली ती प्रगती, कशीबशी का होईना, पण टिकवून धरण्याचा अट्टहास अमेरिकेत दिसून आला. १९५० नंतरदेखील दरडोई खपाचे आकडे उत्तेजक आहेत. निसर्गसंपत्तीचे अमेरिकेतील वैपुल्य यास थोडे जबाबदार आहे हे खरे. पण या विपुल नैसर्गिक संपत्तीचा वापर त्यांनी भांडवलशाही चौकटीत राहूनच केला आहे. निसर्ग-संपत्तीच्या वैपुल्याचे वाढत्या राहणीमानात रूपांतर करण्यात भांडवलशाहीची साथ मिळाली, हे उघड आहे. राहणीमानातील फरक अजमावण्याचा सर्वात साधा मार्ग म्हणजे निरनिराळ्या काळातील दरडोई उत्पन्नाची (स्थिर किंमतीनुसार) तुलना करणे. १९५० साली अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नात १९२० च्या मानाने दुप्पट आणि १८५० च्या मानाने चौपट वाढ झाली. पांचव्या दशकात त्यात आणखी दहा टक्क्यांनी वाढ झाली. १९२९ साली विनियोगक्षम व्यक्तिगत प्राप्ती स्थिर किंमतीनुसार दरडोई १०६६ डॉलर्स होती. महामंदी ऐन भरात असताना, म्हणजे १९३३ साली, ती ७५४ डॉलर्स येवढी घसरली. पण नंतर १९४० साली ११०१ डॉलर्स, १९५० साली १५१३ डॉलर्स अशी वाढ झाली. १९४० ते १९६० या काळात ही प्राप्ती पन्नास टक्क्यांनी वाढली. पण डॉलर्सचे तेवढे आकडे आकर्षक आहेत असे नाही. १८५० ते १९५० या शतकात औद्योगिक कामगाराचे कामाचे तास दर आठवड्यास ६६ तासावरून ४० तासावर आणि शेतकी कामगाराचे ७२ वरून ४८ वर आले. म्हणजे प्राप्ती वाढली तसा लोकांचा आरामदेखील वाढला.[८] त्याचबरोबर या काळात जनतेसाठी उपलब्ध असलेल्या वस्तु आणि सुखसोई यांच्या दर्जात सुधारणा होऊन अँटिबायोटिक औषधे, दूरचित्रवाणी, जेट विमाने इत्यादि अपूर्व वस्तु तेथील जनतेस उपलब्ध होऊन त्यांचे जीवन अधिक समृद्ध

झाले ते वेगळेच. अमेरिकेतील राहणीमान कसकसे वाढले याचे निवडक नमुने खालीलप्रमाणे देता येतील.

१८५० ते १९५० या काळात अमेरिकेची लोकसंख्या सहा पटीने वाढली, पण वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न ( स्थिर डॉलरमधील ) तीस पटीने वाढले.

दर कामगाराचे दर ताशी उत्पादन सतत वाढत असून दुसऱ्या महायुद्धानंतर ते दर दशकास पस्तीस ते चाळीस टक्क्यांनी वाढत आहे.

१९४८साली ५४ टक्के कुटुंबे मोटारमालक होती. १९५९ साली ७४ टक्के कुटुंबे मोटारमालक होती. दोन-दोन मोटारी बाळगणाऱ्या कुटुंबांची संख्या ४ टक्क्यावरून पंधरा टक्क्यावर गेली.

१९४७ साली जवळजवळ कोणत्याच विद्युत् पुरवठा असलेल्या घरात दूरचित्रवाणी नव्हती. १९५९ साली अशा नव्वद टक्के घरात दूरचित्रवाणी आली.

१९५० ते १९५९ येवढ्या काळात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पन्नास टक्क्यांनी वाढली.

१८९० ते १९६० या काळात लोकसंख्या साडेबारा कोटींनी वाढली, तरीही अमेरिकन माणसाचे सरासरी राहणीमान वाढले. विषमता असली तरी तेथे प्राप्तीचे केन्द्रीकरण होत असल्याचा पुरावा या काळात आढळत नाही.[१] प्राप्तीचे केन्द्रीकरण होऊ न देता, लोकसंख्या वाढत असताना, स्थिर डॉलरमधील दरडोई प्राप्तीत भरीव प्रगती करून, त्याचवेळी जनतेला अधिक आराम प्राप्त करून देऊन, त्यांच्या उपभोगातील वस्तूंचा दर्जा वाढवून, सर्वस्वी नव्या वस्तूंची त्यांच्या उपभोगात भर घालून, मानवी जीवन समृद्ध करण्याची चमत्कृती अमेरिकन भांडवलशाहीने साधली आहे.

**३. नव्या ग्राहक वस्तूंचा उदय :** भांडवलशाहीत राहणीमान उंचावण्याची शक्यता पहात असताना या पूर्वी आपण नव्या ग्राहक वस्तूंच्या उदयाचा ओझरता उल्लेख केला आहे. पण या नव्या ग्राहक-वस्तूंचे वाढते महत्त्व लक्षात घेता, त्यांचा स्वतंत्रपणे विचार होणे आवश्यक आहे. अमेरिकेत बाजारात उपलब्ध असलेल्या वस्तूमध्ये इतके वैचित्र्य असते की ग्राहकाला आपल्या पसंतीचा प्रकार निवडण्यास भरपूर वाव मिळून त्याचे समाधान वृद्धिंगत होते. तयार कपडे, विद्युत् साहित्य, फर्निचर, मोटारी इत्यादि वस्तूंचे रंग, रूप, आकार वगैरे वैशिष्ट्यानुसार अगणित प्रकार विक्रीस येतात. या वस्तू सामान्य माणसाच्या आवाक्यातही असतात. १९०७ साली ६० वॉटचा विजेचा दिवा दीड डॉलरला मिळत असे. आज त्यापेक्षा अधिक चांगल्या बनावटीचा दिवा पंचवीस सेन्टला मिळतो. शिवाय आकार, रंग वगैरेबाबतीत भरपूर वैचित्र्य असलेल्या दिव्यांच्या मालिकेतून मनपसंत असा निवडण्याची भरपूर संधी मिळते ती वेगळीच. चित्रविचित्र आणि नवनव्या वस्तूंचे अमेरिकन बाजारात इतके वैपुल्य आहे की तेथील एकछती दुकानाला बहुधा अनेक मजली इमारत घेतल्याखेरीज जागा पुरत नाही.[१०] न्यूयॉर्क शहरातील एखाद्या एकछती दुकानातील विक्रीस ठेवलेल्या वस्तूंची संख्या नुसती मोजली तरी ती तीन लाखांच्या आसपास भरेल. मोटारी, विद्युत उपकरणे, कापडाचा कृत्रिम धागा, नवे बांधकाम साहित्य, वातावरण हवे तसे थंड अथवा उबदार ठेवणारी उपकरणे, दूरचित्रवाणी इत्यादि वस्तूंचा वाढता उपभोग भांडवलशाहीमुळे शक्य झाला. उपभोग्य वस्तूंचे वैचित्र्य आणि वैपुल्य असल्यामुळे ग्राहकांच्या समाधानात भर पडली आहे. नुसत्याच उंचावणाऱ्या राहणीमानामुळे नव्हे तर दर पिढीगणिक नवनव्या वस्तूंचा उपभोग घेण्याची संधी मिळत गेल्यामुळे भांडवलशाहीतील भौतिक जीवन संपन्न दिसते.

**४. संयोजनशक्तीचे संवर्धन :** समाजातील संयोजनशक्तीचा संचय किती आहे व या संयोजनशक्तीची गुणवत्ता काय आहे यावर त्या समाजाच्या आर्थिक विकासाचे भवितव्य अवलंबून असते. संयोजनशक्ती सहजासहजी निर्माण होत नसते. धाडस करणे, धोका पत्करणे, प्राप्ती वाढविणे, प्रतिष्ठा वाढविणे, आपल्या मनातील खळबळीला अथवा सृजनशक्तीला वाट मोकळी करून देणे, नशिबाची परीक्षा पाहणे इत्यादि विविध मानवी भावना संयोजनशक्तीच्या संवर्धनाच्या निमित्ताने अभिव्यक्ती शोधत असतात. उदाहणादाखल बोलावयाचे झाल्यास अमेरिकन भांडवलशाहीने केवळ नवी संयोजनशक्ती जन्माला घातली असे नव्हे तर त्या शक्तीचे संवर्धनही केले असे त्यांच्या आर्थिक विकासावरून स्पष्ट होते. अमेरिकेत अन्य प्रकारची अर्थव्यवस्था असती तर संयोजनशक्तीचे यापेक्षा अधिक संवर्धन झाले असते का, याचा पडताळा घेणे अशक्य आहे. पण नफ्याची प्रेरणा, व्यवसाय स्वातंत्र्य इत्यादि भांडवलशाहीतील संस्थामुळे संयोजनशक्तीच्या संवर्धनाला तेथे वाव मिळाला यात शंका नाही.

**५. तांत्रिक प्रगती :** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तांत्रिक प्रगती करून घेण्यास वातावरण फार अनुकूल असते. अमेरिकेत तांत्रिक प्रगती इतकी प्रचंड झाली आहे की त्याचा आवाका नुसता दृष्टीपथात राहणेदेखील कठीण आहे. १८५० ते १९५० या शतकात उद्योगधंद्यात वापरल्या जाणाऱ्या शारीरिक श्रमशक्तीचा वाटा बारा टक्क्यावरुन एक टक्क्यावर आला. जनावरापासून मिळणाऱ्या शक्तीचा वाटा बावन्न टक्क्यावरून पाचदशांश टक्क्यावर आला. कोळसा, गॅस, तेल इत्यादि शक्तिसाधनांचा वाटा पस्तीस टक्क्यावरून साडेअठ्याण्णव टक्क्यावर गेला.[११] निरनिराळी शक्तिसाधने वापरण्याच्या कार्यक्षमतेत गेल्या शतकात पन्नास टक्क्यांनी वाढ झाली आहे. या प्रचंड तांत्रिक प्रगतीचा मुख्य परिणाम म्हणून दर कामगारतासागणिकच्या निव्वळ औद्योगिक उत्पादनात वाढ झाली आहे. १८५० साली एक कामगार

एका तासात सरासरी सुमारे सतरा सेंट किंमतीचा औद्योगिक माल तयार करत होता. डॉलरचे बदलते मूल्य लक्षात घेऊनदेखील १९३९ साली हे उत्पादन ७४ सेंट किंमतीचे होते. म्हणजे या काळात कामगारांच्या उत्पादकतेत चौपटीपेक्षा अधिक वाढ झाली. तांत्रिक प्रगती केवळ कारखान्यांच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे असे नाही. अर्थकारणाची आणि जीवनाची सर्व अंगोपांगे तांत्रिक प्रगतीने व्यापली आहेत. या तांत्रिक प्रगतीस शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ जसे जबाबदार आहेत तशीच भांडवलशाहीदेखील जबाबदार आहे. नफ्याची प्रेरणा आणि स्पर्धा या भांडवलशाहीच्या दोन वैशिष्ट्यामुळे अमेरिकन समाजाला तांत्रिक प्रगतीचा पाठपुरावा करणे भाग पडले. आज अमेरिका एका नव्या औद्योगिक क्रान्तीच्या उंबरठ्यावर आहे. अणुशक्ती, गणकयंत्रे, स्वयंचलित यंत्रे यामुळे अमेरिकेत तांत्रिक प्रगतीची परिसीमा गाठली जात आहे. त्यातून नक्की काय उद्भवेल हे अजून स्पष्ट सांगता येण्यासारखे नाही. तरी तांत्रिक प्रगतीच्या क्षेत्रात अमेरिकेला आघाडीवर ठेवण्यात तेथील भांडवलशाहीचा वाटा मोठा आहे यात संशय नाही.

६. **उत्पादक साधनसामुग्रीचा पुरेपूर वापर :** तांत्रिक प्रगतीमुळे उत्पादक साधनसामुग्रीचा पुरेपूर वापर करण्यात भांडवलशाहीत अडथळा येतो असे नव्हे. तांत्रिक प्रगतीमुळे माणसाची कामे यंत्रे करू लागतात. म्हणून माणूस बेकार, निरूपयोगी बनत नाही. नव्या वस्तू, नव्या सवयी यांच्या प्रादुर्भावामुळे केवळ श्रमशक्तीच नव्हे तर सर्व उत्पादक सामुग्रीचा भांडवलशाहीत पुरेपूर वापर होऊ शकतो. नफ्याच्या आणि खाजगी मालमत्तेच्या प्रेरणेमुळे संयोजक व्यवसाय स्वातंत्र्याचा फायदा घेऊन बेकार असलेल्या उत्पादक घटकांना उत्पादन कार्यात गोवू शकतात. अमेरिकेत यांत्रिक प्रगतीच्या घोडदौडीमुळे श्रमिकावर बेकारीची कुऱ्हाड कोसळण्याऐवजी त्याच्या आरामात वाढ झाल्यासारखी दिसते. पण सर्व उत्पादन

सामुग्रीचा पुरेपूर वापर करण्यात अलीकडे तेथे काही अडथळे येऊ लागले आहेत. प्राप्ती वाढेल तसा तेथील ग्राहक चंचल बनत आहे. कोणत्या प्रकारच्या वस्तूंची मागणी स्थिर राहील हे नक्की सांगणे कठीण झाले आहे. आर्थिक सुबत्ता वाढल्यामुळे विकत घ्यावयाच्या वस्तूमधील अत्यंत जीवनोपयोगी वस्तूंचे प्रमाण कमी झाले आहे. मागणी चंचल बनली आहे. तशात वैशिष्ट्यपूर्ण तंत्रपद्धतीमुळे, मागणी बदलल्यावर यंत्रे एका उपयोगातून दुसऱ्या उपयोगात नेणे कधी कधी अगदी अशक्य होते. म्हणून उत्पादक साधनांचा पुरेपूर वापर करण्यात तेथे अडथळे येतात. पण ते प्रासंगिक आहेत. उत्पादक साधनांचा पुरेपूर वापर करण्यास तेथे मज्जाव नाही, उलट प्रोत्साहनच आहे.

**६. व्यक्ति-स्वातंत्र्य :** भांडवशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांच्यात सुसंवाद आहे. त्यामुळे भांडवलशाहीला यश आले आहे. व्यक्ति-स्वातंत्र्यामुळे, व्यक्ती आणि व्यक्तिसमूहानिशी बनलेल्या कंपन्या वगैरे, संयोजनशक्ती स्रवण्यास पात्र होतात. त्यामुळे निसर्ग-संपत्ती, श्रमशक्ती आणि भांडवल-संचय यांचा वापर होण्याची शक्यता वाढते. व्यक्ति-स्वातंत्र्यावर आधारलेले आचरण भांडवलशाहीशी एकरूप झाले आहे. या व्यक्ति-स्वातंत्र्याधिष्ठित आचरणामुळेच औद्योगिक संघटनांचे नवनवे प्रकार अस्तित्वात येऊ शकले, नव्या उत्पादन-क्रिया, नव्या वस्तू जगाला माहीत होऊ शकल्या आणि राहणीमान उंचावणे शक्य झाले. खाजगी मालमत्ता, वारसा यासारख्या भांडवलशाहीच्या व्यक्तिवादी स्वरूपाच्या वैशिष्ट्यामुळे दूरदृष्टीची जोपासना झाली, भावी उपयोगासाठी भांडवलसंचय होऊ शकला. आर्थिक व्यवहारांचे ‘ स्वाभाविक ’ नियमन करण्याची पद्धत व्यक्ति-स्वातंत्र्यावरच आधारलेली आहे. भांडवलशाहीने एकमेकाशी संबंध नसलेल्या असंख्य व्यक्ती आणि संस्था यांना आर्थिक क्षेत्रात कार्यरत ठेवल्यामुळे आर्थिक व्यवहारांचे आपोआप नियमन झाले आहे. परस्परविरोधी हालचालींचा संक्षेप जाऊन वेतन, किंमती, व्याज,

नफा इत्यादि वाजवी पातळीवर रहाण्यास मदत झाली आहे. एकंदरीत व्यक्ति स्वातंत्र्याचा लाभ हा भांडवलशाहीचा गुण असून भांडवलशाहीच्या यशाचे रहस्य त्यात आहे.

## भांडवलशाहीचे दोष :

**१. मूल्य–संघर्ष :** आर्थिक मूल्ये आणि मानवी मूल्ये यांचा संघर्ष होण्याचा धोका भांडवलशाहीत पदोपदी असतो. पैशात मिळणाऱ्या मोबदल्यावर भांडवलशाहीतील सर्व व्यवहार अवलंबून असतात. पण या पैशातील मोबदल्यामुळे मानवी सुखात भर पडतेच असे नाही. भांडवलशाहीतील संयोजक आपले सर्व निर्णय पैशातील मोबदल्यावर अवलंबून ठेवतो. बाजारात मागणी असेल अशा वस्तूंचे उत्पादन करणे त्याच्या दृष्टीकोणातून योग्य आहे. पण अशा वस्तूमुळे मानवी कल्याणात भर पडते याची हमी नेहमीच देता येत नाही. संयोजकाला वस्तूच्या उत्पादनखर्चातील वाढ अनुचित वाटते आणि त्यातील घट शुभकारक वाटते. पण वस्तू कोणत्या, त्यांची उत्पादन-पद्धत कोणती याचे ज्ञान झाल्याखेरीज उत्पादन खर्चातील वाढीचा अगर संकोचाचा मानवी कल्याणावर काय परिणाम होईल, हे सांगता येणार नाही. एकंदरीत, भांडवलशाही समाजात द्रव्याधिष्ठित मूल्यांना प्रतिष्ठा येते. माणसाचे सार्थक झाले, याचा भांडवलशाहीतील अर्थ, त्याने भरपूर पैसा मिळविला, येवढाच. द्रव्याधिष्ठित मूल्यापेक्षाही मानवी मूल्ये अधिक महत्त्वाची आहेत. कामगारांचा अमानुष छळ करून उद्योगपतींनी समृद्धी आणली तर त्या समृध्दीला कामगारांच्या घामाची आणि शिणलेल्या निश्वासांची कळा आल्याखेरीज राहणार नाही. द्रव्यसंपादनाची संधी भांडवलशाही उपलब्ध करून देते खरी, पण त्यामुळे झपाटलेला जीव पुष्कळदा माणुसकी विसरतो.

**२. आर्थिक विषमता :** भांडवलशाही आणि आर्थिक विषमता या दोन गोष्टी एकत्र आढळतात ही वस्तुस्थिती असली तरी भांडवलशाही

क्र. १८७१

आर्थिक विषमता निर्माण करण्यास जबाबदार नाही अशी तरफदारी भांडवलशाहीचे हस्तक करतात. पण ते खोटे आहे. भांडवलशाही विषमता निर्माण करते यात शंका नाही. फार तर भांडवलशाही विषमतेचे अरण्य माजविते की विषमतेचे तण उगवू देते एवढाच काय तो वादाचा मुद्दा झाल्यास होऊ शकेल. आर्थिक विषमता ही वस्तुस्थिती असून भांडवलशाहीने ती नाकारण्यात अर्थ नाही. अमेरिकन भांडवलशाहीचा दाखला द्यायचा झाल्यास तेथे प्राप्तीतील विषमता नजरेत भरण्यासारखी आहे. १९५९ साली अमेरिकेत दोन हजार डॉलर्सपेक्षा कमी वार्षिक प्राप्ती असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १४ टक्के होते आणि त्यांच्याजवळ फक्त दोन टक्के प्राप्ती होती, तर १५००० डॉलर्सपेक्षा जास्त प्राप्ती असणाऱ्या कुटुंबाची संख्या ५ टक्के होती आणि त्यांच्याजवळ २१ टक्के प्राप्ती एकवटली होती.[१२] प्राप्ती आणि संपत्ती यामधील विषमता मुख्यत्वेकरून भांडवलशाहीतील मुक्त बाजारपेठा, खाजगी मालमत्ता आणि वारसा यांच्यासारख्या वैशिष्ट्यातून निर्माण झाली आहे. मुक्त बाजारपेठेमुळे उंचाई असलेल्या उत्पादक-घटकांना प्रमाणाबाहेर मोबदला मिळून ते श्रीमंत होतात. खाजगी मालमत्ता बाळगण्याच्या सोईमुळे मालमत्ता नसणाऱ्या वर्गाला उत्कर्षाची संधी रहात नाही. वारसाविषयक कायद्यामुळे प्राप्ती आणि संपत्तीचे एखाद्या घराण्यातील केन्द्रीकरण पिढ्यानपिढ्या शाबूत राहू शकते. आर्थिक विषमतेतून क्रान्तीचा जन्म होतो. क्रान्ती सर्वांनाच काटेकोर न्याय देते असे नव्हे. राष्ट्रीय मालमत्तेचे आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे निर्दोष वाटप करण्याची हमी भांडवलशाहीत नाही. म्हणून आर्थिक विषमता हा भांडवलशाहीचा एक ठळक दोष मानला जातो.

**३. विनाकष्ट प्राप्ती :** उत्पादनास उपयुक्त ठरणारे आपले व्यक्तिगत प्रयत्न खुल्या बाजारात जाऊन न विकता क्रयशक्ती संपादन करणे यास कष्टाविना प्राप्ती मिळविणे असे म्हणतात. भांडवलशाहीने

अशी विनाकष्ट प्राप्ती संपादण्यास मुभा दिलेली आहे. भांडवलशाहीत काम न करता जगणारा—आणि बहुधा उत्तमप्रकारे जगणारा—वर्ग असू शकतो. तो आहे देखील. प्राप्ती मिळविणाऱ्यांमध्ये काम करणारे आणि काम न करणारे असे दोन्ही वर्ग असतील तर त्याचा अर्थ एवढाच की काम करणाऱ्या लोकांचा काही न्याय्य वाटा काम न करणाऱ्यांनी बळकावला आहे. चोरी करून अथवा देणगी स्वीकारून मिळविलेली प्राप्ती विनाकष्ट असली तरी हे दाखले आपल्या चर्चेच्या दृष्टीने महत्त्वाचे नाहीत. मक्तेदारीमुळे उद्भवणारा नफा, जमिनपासून मिळणारा खंड आणि वारशाने येणाऱ्या मालमत्तेपासून होणारी प्राप्ती ही विनाकष्ट प्राप्तीची विचारार्ह अशी ठळक उदाहरणे आहेत. वरील तिन्ही प्रकारच्या विनाकष्ट प्राप्तीचे अस्तित्व भांडवलशाहीत असते.

**४. टंचाईच्या निर्मितीस प्रोत्साहन :** उत्पादन-कपात करण्यास आणि वस्तूंचा पुरवठा आखडता घेण्यास उत्पादकांना वेळोवेळी प्रोत्साहन मिळणे, हा भांडवलशाहीचा आणखी एक दोष आहे. टंचाई निर्माण करण्यास उत्पादकांना प्रोत्साहन मिळणे हा नफ्याच्या प्रेरणेच्या विकृत स्वरूपाचा परिणाम आहे. वस्तुतः नफा वाढवावचा असतो तो साधारणपणे उत्पादनाचा विस्तार करून. पण कधी कधी उत्पादनात कपात केली तर वस्तूंची टंचाई निर्माण होऊन तिच्या किंमती भडकतात. त्यामुळे पूर्वीपेक्षा (पूर्वी म्हणजे वस्तूचे वैपुल्य असताना) अधिक नफा होतो. उत्पादन—कपात केली असता वस्तूच्या दर नगामागे नफ्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे उत्पादनवाढीपेक्षा उत्पादनातील कपातच अधिक फायदेशीर ठरते. अशी उत्पादनकपातीची संधी आल्यास कारखानदार ती वाया दवडत नाहीत, उत्पादनात कपात करून किंमत कृत्रिमरित्या वाढवावयाची व त्याद्वारे नफेबाजी करावयाची या सर्व क्रियेचे सार्थ वर्णन 'खाजगी मक्तेदारी' या शब्दांनी

होते. तऱ्हेतऱ्हेच्या नवनवीन पद्धतींनिशी अशी मक्तेदारी उपभोगण्यासाठी अमेरिकन उद्योगपतींनी आपल्या चातुर्याची कमाल केली आहे. अलीकडील काळात अमेरिकन उद्योगसृष्टीत मक्तेदारीच्या कोणकोणत्या खुल्या व छुप्या तऱ्हा अवतरल्या याची एक लांबलचक यादी १९४० च्या अमेरिकन सरकारच्या अहवालात पहावयास मिळते.[१३] या प्रत्येक पद्धतीत अट्टाहास आहे तो उत्पादन-कपातीच्या मार्गे किंमती वर ढकलण्याचा. अशाप्रकारे किंमती वाढल्या तर मिळालेला नफा एरवीच्या उत्पादन-पातळीतून होणाऱ्या नफ्यापेक्षा जास्त असतो. एकंदरीत, भांडवलशाहीत नफ्याची प्रेरणा विकृत रूप धारण करून संपन्न समाजात कृत्रिम टंचाईदेखील निर्माण करते.

५. **उधळपट्टी :** भांडवलशाहीत सर्वत्र उधळपट्टी दिसते. अर्थशास्त्रीय विवेकाच्या आदेशानुसार काटेकोरपणे वागणाऱ्याला ही उधळपट्टी वृथा वाटते. साधनसामुग्रीच्या एका परिमाणातून जेवढे उत्पादन होणे शक्य आहे त्यापेक्षा प्रत्यक्षात कमी उत्पादन झाल्यास ती साधनसामुग्रीची उधळपट्टी होय. वस्तुतः प्रत्येक अर्थप्रणालीत अशी थोडीफार उधळपट्टी असतेच. पण भांडवलशाहीतील उधळपट्टी प्रमाणाबाहेर आहे, यात शंका नाही. ही उधळपट्टी स्पर्धेच्या अस्तित्वातून निर्माण होते. स्पर्धेमुळे यंत्रसामुग्री आणि सेवकवर्ग काही कारण नसता फाजील होतो. प्रत्येक उत्पादक अशी महत्त्वाकांक्षा बाळगून राहतो की त्याचा एकटयाचाच माल सर्व बाजारपेठ काबीज करणार आहे. अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारे उत्पादक, स्पर्धा असल्याने, असंख्य असतात. त्यामुळे बाजारात खपू शकेल इतक्या मालापेक्षा अधिक माल तयार होतो. त्यासाठी प्रत्येक उत्पादकाला जरूरीपेक्षा जास्त यंत्रे आणि कामगार बाळगावे लागतात. ही झाली यंत्रसामुग्री आणि मनुष्यबळ यांची उधळपट्टी. पुष्कळदा प्रतिस्पर्ध्याचा काटा काढण्याखातर एखादा उत्पादक जरूर नसताना, उत्पादनसामुग्री हस्तगत करतो. एखादी मोक्याची

जागा प्रतिस्पर्धी कंपनीने पुढेमागे घेऊ नये म्हणून एखादी कंपनी ती जागा अगोदरच घेऊन तेथे एखादे डिपार्टमेंटल स्टोअर थाटते. अशा वेळी या स्टोअरची जरूर असतेच असे नाही. केवळ स्पर्धा करण्यासाठी एका रेलवे कंपनीने दुसऱ्या रेलवे कंपनीच्या मार्गा-शेजारीच रूळ टाकल्याची उदाहरणे अमेरिकेत आहेत. स्पर्धेमुळे उत्पादनसामुग्री लौकर निरुपयोगी होते व त्यातून उधळपट्टी उद्भवते. प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी उत्पादक तऱ्हेतऱ्हेच्या, फॅशनेबल वस्तु बनवतात. फॅशन जुनी झाली की त्या फॅशनच्या वस्तू तयार करणारी यंत्रसामुग्री निरूपयोगी ठरते. म्हणजे, एरवी जी सामुग्री बराच काळ उपयुक्त ठरली असती ती अल्पावधीत निरुपयोगी बनते. मोटारीची विक्री वाढावी म्हणून ग्राहकांच्या पसंतीस उतरतील अशी मोटारींची नवीनवी मॉडेल्स प्रतिवर्षी काढणे अमेरिकन कारखानदारांना क्रमप्राप्त असते. नवे मॉडेल निघाले की जुने मॉडेल तयार करणारी यंत्रसामुग्री बाद होते. अलीकडे एका वर्षी जुने मॉडेल टाकून नवे मॉडेल काढण्या-साठी अमेरिकेतील मोटार-उद्योगाला एक शतकोटी डॉलर्स खर्च आला. याचा अर्थ प्रत्येक मोटारीसाठी दीडशे डॉलर्स जादा किंमत मोजावी लागली.[१४] जाहिरातबाजीवर होणारा बराच खर्च उधळपट्टी दर्शवि-णारा आहे. प्रामाणिक आणि माहितीपूर्ण जाहिरात उपयुक्त आहे. पण खोटी विधाने करणारी, दिशाभूल करणारी आणि वस्तूची कसलीही माहिती न देणारी जाहिरातबाजी मुळीच उपयुक्त नाही. अशा जाहिरातबाजीपोटी होणारा खर्च वृथा आहे. किराणा मालाच्या दुकानदारांनी वस्तूंच्या किंमतीबाबत वृत्तपत्रांत जाहिरात दिली तर ते रास्त आहे. पण नियतकालिके, रस्त्यातील फलक, रेडिओ, टेलि-व्हिजन इत्यादि माध्यमाद्वारे प्रसृत होणाऱ्या, प्रसाधने, मोटारी, सिगारेट्स्, पेटंट औषधे इत्यादि वस्तूंच्या प्रशस्तीपत्रकवजा, भडक, ग्राहकाच्या मनोदौर्बल्याचा फायदा उठविणाऱ्या आणि सनसनाटी अशा

जाहिरातबाजीवर होणारा प्रचंड खर्च भांडवलशाहीतील उधळपट्टी कोणत्या थराला गेली आहे ते दाखवितो. १९५० ते १९५९ या कालखंडात अमेरिकेने सर्व प्रकारच्या जाहिरातबाजीवर ८६ शतकोटी डॉलर्स उधळले. पैकी १९५९ या एकाच वर्षी या कारणासाठी ११ शतकोटी डॉलर्स खर्ची पडले.[१५]

**६. असमतोल आणि असुरक्षितता :** भांडवलशाहीला स्थैर्य लाभत नाही. व्यापार-चक्रांच्या चढउतारातून अर्थकारणाचा प्रवास चालू असतो. तेजी आणि मंदी या अवस्था सर्वांनाच फायदेशीर नसतात. तेजीच्या काळात व्यापारी वर्गास लाभ होत असला तरी नोकरपेशाच्या लोकांना घसरलेले राहणीमान सहन करावे लागते. मंदीची परिस्थिती स्थिर प्राप्तीच्या मंडळींना सुखावह वाटत असली तरी त्या काळात कारखानदार आणि कामगार अनुक्रमे दिवाळखोरी आणि बेकारी यांनी टेकीस आलेले असतात. अस्थिरतेतून असुरक्षिततेची भावना निर्माण होते. औद्योगिक कामगारांना स्थिर उत्पन्नाची शाश्वती वाटत नसल्यामुळे, बेकारी वगैरे संकटापासून आपण सुरक्षित नाही याची त्यांना बोचणी लागून राहिलेली असते. अर्थात प्राप्तीतील विषमता कमी करून, सामाजिक सुरक्षेची व्यवस्था निर्माण करून भांडवलशाहीतील अस्थिरता कमी करण्याचे प्रयत्न होत आहेत. १९२९ ते १९३४ या काळात अस्थिरता किती भयानक रूप धारण करू शकते हे अमेरिकेने महामंदीच्या रूपाने पाहिले. एका बाजूला अतिरिक्त उत्पादन आणि दुसऱ्या बाजूला दुर्भिक्ष असे दीनवाणे चित्र या काळात अमेरिकेत दिसले. 'सुबत्तेच्या घरी दुर्भिक्ष' ही कल्पना खालील चुटक्यावरून मोठ्या भेदकपणे स्पष्ट होते.

थंडीने कुडकुडणारा कोळसा कामगाराचा एक अजाणता मुलगा आपल्या आईला म्हणतो :

'आई, शेगडी पेटव ना ग, मला किती थंडी वाजतेय ते दिसत नाही का तुला?'

'होय बाबा, पण मी काय करू? घरातले कोळसे संपले आहेत ना!'

'मग विकत आण की कोळसे.'

'अं ऽ हं.'

'का?'

'पैसे कुठं आहेत?'

'पैसे नाहीत! का?'

'तुझ्या बाबांची नोकरी सुटलीय्.'

'पण का?'

'कोळसा अतोनात झालाय म्हणून. समजल?'

## भांडवलशाहीचे भवितव्य :

भांडवलशाहीचा उत्कर्ष होत असतानाच एकोणिसाव्या शतकात भांडवलशाही विरोधी विचार निर्माण होऊ लागला. रॉबर्ट ओवेन[१६] या ब्रिटिश कारखानदार-अर्थपंडिताने भांडवलशाहीतील दोष टाळण्यासाठी सहकार तत्त्वाचा पुरस्कार केला. भांडवलशाहीच्या अन्य टीकाकारांनी समाजवादाचे तोरण बांधले. समाजवाद्यांचा मेरुमणी म्हणजे कार्ल मार्क्स. भांडवलशाहीच्या भवितव्याचे शास्त्रशुद्ध विवेचन करून त्यांनी भांडवलशाही आपोआप नष्ट होईल, असे भाकित केले. तेव्हापासून भांडवलशाहीच्या आणि समाजवाद्यांच्या छावण्यांमध्ये भांडवलशाहीच्या भवितव्याची चर्चा मधूनअधून होत असते. अशा चर्चेला पुष्कळदा अभिनिवेशाचा रंग चढलेला असतो त्यामुळे त्यातून निर्विवाद निष्कर्ष काढणे जरा कठीणच.

१९१७ साली रशियात समाजवादी अर्थव्यवस्था आली. त्यानंतर १९२९ साली अमेरिकेत अचानक अभूतपूर्व भावघसरण होऊन तिने

सर्व अमेरिकन अर्थकारणाला अवकळा आणली. दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवादी राष्ट्रांची संख्या वाढली. या घटनांच्या संदर्भात भांडवलशाहीच्या भवितव्याची वारंवार चर्चा होणे साहाजिक आहे. भांडवलशाही आता घटकेचीच सोबतीण आहे या निष्कर्षापासून ते थेट भांडवलशाही सूर्य-चंद्र असेतोपर्यंत टिकणार आहे या निष्कर्षापर्यंत सर्व प्रकारचे विचार निरनिराळे पंथ आपापल्या परीने मांडत आहेत. त्या सर्व विचारांचे केवळ सार सांगणेदेखील विस्तारभयास्तव कठीण आहे. तरीपण भांडवलशाहीच्या भवितव्याविषयीचे निवडक प्रातिनिधिक निष्कर्ष नमुन्यादाखल सांगता येतील.

मार्क्स, वेब्लेन,[१८] केन्स[१९] आणि शुंपिटर[२०] या चार अर्थपंडितांनी भांडवलशाहीच्या भवितव्याविषयी केलेले मूलगामी विवेचन खाली सारांशरूपाने दिले आहे. अशा प्रकारची विवेचने पुष्कळदा पक्षपाती असू शकतात. म्हणून मुद्दाम चार निरनिराळ्या मनोवृत्तीच्या अर्थपंडितांची निवड केली आहे. मार्क्स यांचे भांडवलशाहीशी हाडवैर आहे तर केन्स भांडवलशाहीचे खंदे पुरस्कर्ते आहेत. शुंपिटर यांना भांडवलशाहीविषयी वाटणारा जिव्हाळा लपविता येत नाही तर वेब्लेन याना भांडवलशाहीची मुळीसुद्धा माया येत नाही. अशा चार भिन्न मनोवृत्तीच्या अर्थपंडितांची, भांडवलशाहीच्या भवितव्याविषयीची भाकिते, फार भिन्न नाहीत हे विशेष होय.

**मार्क्स :** आपल्या आर्थिक विकासाच्या मीमांसेत कार्ल मार्क्स यांनी भांडवलशाहीच्या भवितव्याविषयी चर्चा केली आहे. त्याचा भावार्थ असा: भांडवलशाहीत असलेल्या अंगभूत दोषामुळे कालांतराने भांडवलशाही आपला घात करून घेणार आहे. भांडवलशाहीची प्रगती होत असताना उद्योगसंस्थेचे प्रमाण मोठे होत जाते. मक्तेदारीची प्रवृत्ती बळावते. मोठे कारखानदार लहान कारखानदारांना

गिळून टाळतात. अर्थकारणात चढउतार होऊ लागतात. उत्पादन जरुरीपेक्षा जास्त आणि उपभोग जरूरीपेक्षा कमी होतो. रोजगाराचे दर कमी होतात. उत्पादकांच्या मालाचा खप आणखी कमी होतो. आर्थिक आपत्तीस अशाप्रकारे प्रारंभ होतो. नफ्याचा दर घसरू लागतो. त्यामुळे भांडवलशाही ढासळण्यास प्रारंभ होतो. युद्धे, वसाहतींचे संपादन इत्यादि मार्गांनी भांडवलशाही तगविण्याचा प्रयत्न होतो. पण पेंचप्रसंग दूर होत नाही. उलट मालक आणि कामगार असे समाजात तट पडतात. वर्गकलहातून उद्भवलेल्या संघर्षात कालबाह्य झालेली भांडवलशाही अखेर नष्ट होते. वस्तुतः हा भांडवलशाहीने घडवून आणलेला आत्मघातच असतो. समाजातील उत्पादकशक्तींचे संगोपन करण्याचे इतिहासदत्त कार्य पार पाडल्यावर भांडवलशाहीचा अवतार संपलेला असतो. आता तिने दुसऱ्या, अधिक चांगल्या अर्थव्यवस्थेला वाट करून देणे भाग असते. म्हणून अस्थिरतेच्या आणि विषमतेच्या अंगभूत दोषामुळे भांडवलशाही संपुष्टात येते. समाजवाद अवतरतो.

मार्क्स यांनी कॅपिटल या ग्रंथात व्यक्त केलेले भांडवलशाहीच्या नाशाचे भाकित तंतोतंत खरे ठरले नाही. त्याबद्दल त्यांच्यावर टीकाही होते. तरी त्यांचे विचार युगप्रवर्तक होते. ही गोष्ट त्यांचे विरोधक-देखील कबूल करतात.

**वेब्लेन :** थॉर्स्टिन वेब्लेन यांनी संस्थाविषयक अर्थशास्त्राचा पाया घातला. १८९९ च्या 'थिअरी ऑफ द लीझर क्लास' आणि १९०४ च्या 'थिअरी ऑफ बिजनेस एन्टरप्राइझ' या त्यांच्या दोन ग्रंथामुळे अमेरिकेत आणि इतरत्र मोठी खळबळ उडाली. अमेरिकेतील श्रीमंत भांडवलदार आणि त्याचा उद्योग यांचा ऊहापोह त्यांनी या पुस्तकांतून केला. सेवेपेक्षा द्रव्यार्जन हेच उद्योगाचे ध्येय असते आणि

उद्योगाचे उखळ व्यापारचक्रामुळेच पांढरे होते असे सिद्धान्त त्यांनी मोठ्या अवखळ भाषेत मांडले. व्यापारचक्रामुळे आर्थिक आपत्ती उद्‌भवते हे त्यांचे भांडवलशाहीविषयीचे विवेचन मार्क्स यांच्या विचाराशी मिळतेजुळते आहे. दोघांनाही भांडवलशाहीविषयी मुळीच प्रेम नव्हते. ती ऱ्हासमान होत नष्ट होईल असे त्यांना वाटत होते. पण वर्गकलहात ती नष्ट होईल असे मार्क्स यांचे भाकित होते. वेब्लेन यांची कारणपरंपरा जरा भिन्न होती. त्यांच्या विवेचचनानुसार तीन निरनिराळ्या प्रकारच्या संस्कृतींच्या संघर्षांचा परिणाम म्हणून भांडवलशाही नष्ट होत जाते. या विचारसरणीचा भावार्थ असा: उद्योगपती, तंत्रज्ञ आणि 'सेनानी, राजकारणी, व्यावसायिक वगैरे' असे समाजात तीन गट असतात. त्यांच्यात संघर्ष उद्‌भवतो. प्रत्येक गटाला एक वेगळ्याच प्रकारची ओढ असते. उद्योगपतीला द्रव्यार्जनाची, तंत्रज्ञाला यांत्रिक प्रक्रियेच्या कार्यक्षमतेची तर तिसऱ्या वर्गाला कसल्यातरी अमूर्त लाभाची अथवा श्रेयाची ओढ असते. (उदाहरणार्थ, सैनिक लढतो ते केवळ देशाभिमानाखार, द्रव्यार्जनाखातर अथवा रणगाड्यांची कार्यक्षमता अजमावण्याखातर नव्हे.) एकंदरीत या तिन्ही गटातील मंडळींची विचार करण्याची पद्धत भिन्न असते. या भिन्नतेतूनच संघर्ष उद्‌भवतो. या संघर्षात सैनिक विजयी होईल किंवा तंत्रज्ञ विजयी होईल. कोणी का विजयी होईना, भांडवलशाही उद्योगाचे दिवस भरले आहेत येवढे मात्र नक्की. युद्ध असो वा शांतता, भांडवलशाही उद्योग-संस्थेचे स्थान दुय्यमच राहील. धामधुमीच्या काळात, सैनिकाला महत्त्व असल्यामुळे, भांडवलदार-उद्योगपतीला समाजात वर्चस्व स्थापण्याची आशा नाही. शांततेच्या काळात तांत्रिक प्रगतीला महत्त्व असल्यामुळे, त्याची तंत्रज्ञावर मात करण्याची प्राज्ञा नाही.[२२]

एकंदरीत भांडवलशाही उद्योगसंस्था आणि भांडवलदार उद्योगपती यांचा ऱ्हास होणार असे मत वेब्लेननी वर्तविले.

गिळून टाळतात. अर्थकारणात चढउतार होऊ लागतात. उत्पादन जरुरीपेक्षा जास्त आणि उपभोग जरूरीपेक्षा कमी होतो. रोजगाराचे दर कमी होतात. उत्पादकांच्या मालाचा खप आणखी कमी होतो. आर्थिक आपत्तीस अशाप्रकारे प्रारंभ होतो. नफ्याचा दर घसरू लागतो. त्यामुळे भांडवलशाही ढासळण्यास प्रारंभ होतो. युद्धे, वसाहतींचे संपादन इत्यादि मार्गांनी भांडवलशाही तगविण्याचा प्रयत्न होतो. पण पेंचप्रसंग दूर होत नाही. उलट मालक आणि कामगार असे समाजात तट पडतात. वर्गकलहातून उद्भवलेल्या संघर्षात कालबाह्य झालेली भांडवलशाही अखेर नष्ट होते. वस्तुतः हा भांडवलशाहीने घडवून आणलेला आत्मघातच असतो. समाजातील उत्पादकशक्तींचे संगोपन करण्याचे इतिहासदत्त कार्य पार पाडल्यावर भांडवलशाहीचा अवतार संपलेला असतो. आता तिने दुसऱ्या, अधिक चांगल्या अर्थव्यवस्थेला वाट करून देणे भाग असते. म्हणून अस्थिरतेच्या आणि विषमतेच्या अंगभूत दोषामुळे भांडवलशाही संपुष्टात येते. समाजवाद अवतरतो.

मार्क्स यांनी कॅपिटल या ग्रंथात व्यक्त केलेले भांडवलशाहीच्या नाशाचे भाकित तंतोतंत खरे ठरले नाही. त्याबद्दल त्यांच्यावर टीकाही होते. तरी त्यांचे विचार युगप्रवर्तक होते. ही गोष्ट त्यांचे विरोधकदेखील कबूल करतात.

**वेब्लेन :** थॉर्स्टिन वेब्लेन यांनी संस्थाविषयक अर्थशास्त्राचा पाया घातला. १८९९ च्या 'थिअरी ऑफ द लीझर क्लास' आणि १९०४ च्या 'थिअरी ऑफ बिजनेस एन्टरप्राइझ' या त्यांच्या दोन ग्रंथामुळे अमेरिकेत आणि इतरत्र मोठी खळबळ उडाली. अमेरिकेतील श्रीमंत भांडवलदार आणि त्याचा उद्योग यांचा ऊहापोह त्यांनी या पुस्तकांतून केला. सेवेपेक्षा द्रव्यार्जन हेच उद्योगाचे ध्येय असते आणि

उद्योगाचे उखळ व्यापारचक्रामुळेच पांढरे होते असे सिद्धान्त त्यांनी मोठ्या अवखळ भाषेत मांडले. व्यापारचक्रामुळे आर्थिक आपत्ती उद्भवते हे त्यांचे भांडवलशाहीविषयीचे विवेचन मार्क्स यांच्या विचारांशी मिळते-जुळते आहे. दोघांनाही भांडवलशाहीविषयी मुळीच प्रेम नव्हते. ती ऱ्हासमान होत नष्ट होईल असे त्यांना वाटत होते. पण वर्गकलहात ती नष्ट होईल असे मार्क्स यांचे भाकित होते. वेब्लेन यांची कारणपरंपरा जरा भिन्न होती. त्यांच्या विवेचचनानुसार तीन निरनिराळ्या प्रकारच्या संस्कृतींच्या संघर्षांचा परिणाम म्हणून भांडवलशाही नष्ट होत जाते. या विचारसरणीचा भावार्थ असा: उद्योगपती, तंत्रज्ञ आणि 'सेनानी, राजकारणी, व्यावसायिक वगैरे' असे समाजात तीन गट असतात. त्यांच्यात संघर्ष उद्भवतो. प्रत्येक गटाला एक वेगळ्याच प्रकारची ओढ असते. उद्योगपतीला द्रव्यार्जनाची, तंत्रज्ञाला यांत्रिक प्रक्रियेच्या कार्यक्षमतेची तर तिसऱ्या वर्गाला कसल्यातरी अमूर्त लाभाची अथवा श्रेयाची ओढ असते. (उदाहरणार्थ, सैनिक लढतो ते केवळ देशाभिमानाखार, द्रव्यार्जनाखातर अथवा रणगाड्यांची कार्यक्षमता अजमावण्याखातर नव्हे.) एकंदरीत या तिन्ही गटातील मंडळींची विचार करण्याची पद्धत भिन्न असते. या भिन्नतेतूनच संघर्ष उद्भवतो. या संघर्षात सैनिक विजयी होईल किंवा तंत्रज्ञ विजयी होईल. कोणी का विजयी होईना, भांडवलशाही उद्योगाचे दिवस भरले आहेत येवढे मात्र नक्की. युद्ध असो वा शांतता, भांडवलशाही उद्योग-संस्थेचे स्थान दुय्यमच राहील. धामधुमीच्या काळात, सैनिकाला महत्त्व असल्यामुळे, भांडवलदार-उद्योगपतीला समाजात वर्चस्व स्थापण्याची आशा नाही. शांततेच्या काळात तांत्रिक प्रगतीला महत्त्व असल्यामुळे, त्याची तंत्रज्ञावर मात करण्याची प्राज्ञा नाही.[२२]

एकंदरीत भांडवलशाही उद्योगसंस्था आणि भांडवलदार उद्योगपती यांचा ऱ्हास होणार असे मत वेब्लेननी वर्तविले.

**केन्स :** जॉन मेनार्ड केन्स यांना भांडवलशाहीचा सार्थ अभिमान होता. पहिल्या युद्धानंतर भांडलशाही अर्थकारणातील दुखणी दृष्टोत्पत्तीस आली. त्यामुळे केन्स हताश झाले नाहीत. संदिग्ध विचार आणि द्विधा वृत्ती यामधून भांडवलशाहीतील विकृती उद्भवल्या आहेत असे त्यांना वाटे. भांडवलशाहीस विरोध करण्यात हितसंबंधी गट गुंतलेले आहेत हे लक्षात येताच, अखेर कल्पकतेचा विजय होत असतो, हितसंबंधी गटाचा नव्हे, ही गोष्ट त्यांनी भांडवलशाहीच्या विरोधकांच्या नजरेस आणून दिली. त्यांचे बहुतेक विवेचन अल्पकाळास लागू असले तरी भांडवलशाहीच्या भवितव्याचा कानोसा घेणाऱ्या दीर्घकाळाला त्यांनी आपल्या ‘ जनरल थिअरी ’ ( १९३६ ) या ग्रंथात स्थान दिले आहे. भांडवलशाहीला आजार झाला आहे हे त्यांना नाकबूल नव्हते. पण आजार आटोक्याबाहेरचा आहे असे त्यांना कधीच वाटले नाही. भांडवलशाहीच्या प्रत्येक दुखण्यावर इलाज करण्याची त्यांची जिद्द होती. मानवी मनाची सृजनशीलता इतकी असीम आहे की भांडवलशाहीतील पेचप्रसंगावर इलाज सापडलाच नाही असे कधी व्हावयाचे नाही, असे त्यांना वाटे. आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा वापर करून त्यांनी स्वतःच कितीतरी उपाय सुचविले. उदाहरणार्थ, “ चलनवृद्धीचा धोका उद्भवला तर चलनाचे ‘ व्यवस्थापन ’ करा, आर्थिक पुनरुज्जीवनाला सुवर्णपरिमाणाचा अडथळा होऊ लागला तर टाकून द्या ते सुवर्णपरिमाण, व्हर्सायच्या तहातून सगळ्या युरोपला धोका निर्माण होणार असेल तर विवेकी आत्म्यांनो, पुनर्विचार करा त्या तहाचा ” असे त्यांचे आदेश होते. इंग्लिश भांडवलशाहीचे दुखणे अतिरिक्त बचतीत आहे असा पुढे त्यांचा कयास झाला.

विविधता आणि व्यक्तिवाद यांची आसक्ती असलेल्या केन्सनी भांडवलशाहीचा आकृतिबंध बदलत असल्याचे मान्य केले, पण

वर्ग-संबंधात मूलभूत बदल होईल आणि भांडवलशाहीला प्राणघातक इजा होईल हे त्यांनी कधीच मान्य केले नाही.

**शुंपिटर** : शुंपिटर भांडवलशाहीचे द्वेष्टेही नव्हते आणि कडवे अभिमानीही नव्हते. तरीपण त्यांना भांडवलशाहीविषयी जिव्हाळा होता. १९४१ साली प्रसिद्ध केलेल्या ' कॅपिटॅलिझम, सोशॅलिझम अँड डेमॉ-क्रसी ' या ग्रंथात त्यांनी भांडवलशाहीच्या भवितव्याचा ऊहापोह केला आहे. ते म्हणतात, ' काय भांडवलशाही वाचेल काय ? नाही, मला तसे वाटत नाही.'[२४] भांडवलशाहीला मिळालेल्या नेत्रदीपक यशातूनच भांडवलशाहीचा ऱ्हास सुरू झाला आहे. लोणी खाता खाता मांजराचा दम कोंडावा तसे यश पचविता पचविता भांडवलशाही बेजार झाली आहे. भांडवलशाहीच्या यशातून भांडवलशाहीचे चार दोष उद्भवले आहेत. आज उद्योगपती या व्यक्तीची जागा बड्या कंपनीने घेतली आहे, छोटा भांडवलदार नष्ट झाला आहे, समाजहितकारक वर्गाला भांडवलशाहीने गिळंकृत केले आहे, इतकेच नव्हे तर नुसत्या शब्दच्छलात कृतार्थता मानणारा बुद्धिवंताचा निष्क्रीय वर्ग भांडवलशाहीने पोसला आहे. उद्योगपतीची जागा बड्या कंपनीने घेतली असल्यामुळे नावीन्य-निर्मितीची वीणा या अवाढव्य संघटनेच्या गळयात आली आहे. अशा कंपन्यात ' शोध लावणे ' ' नवनवोन्मेष दाखविणे ' इत्यादि प्रतिभासंपन्न कार्ये ' वेळापत्रकाबरहुकूम ' चालू असल्यामुळे जातिवंत भांडवलशाहीतील चैतन्यच हरपल्यासारखे वाटते.

भांडवलशाहीविषयी कोणाला प्रेम असो वा नसो, तिचा अंतकाल नजीक येऊन ठेपला आहे याची हळूवार जाणीव शुंपिटरनी जगाला करून दिली आहे.

◊ ◊ ◊

# समाजवाद

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमधील औद्योगिक क्रान्ती पूर्ण होऊन भांडवलशाहीचा उदय आणि उत्कर्ष मोठ्या झपाट्याने झाला. त्याचा परिणाम म्हणून इंग्लंडच्या भावी औद्योगिक आणि व्यापारी वर्चस्वाचा पाया घातला गेला. या संक्रमणाची किंमतही तशीच जबर होती. राष्ट्राला आणि कारखानदारांना भांडवलशाही हितकर ठरली. पण कामगारवर्गाला ती तशी मुळीच ठरली नाही, म्हणून कामगारांचे कैवारी भांडवलशाही व्यवस्थेतील दोषस्थळे शोधू लागले. अशाप्रकारे भांडवलशाहीला शह देणारा समाजवादी विचार एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यन्त तयार झाला.

औद्योगिक क्रान्तीला चांगली आणि वाईट अशा दोन्ही बाजू होत्या. तिने निर्माण केलेल्या भांडवलशाहीमुळे हाताच्या बोटावर मोजता येतील येवढ्या व्यक्ती अतिश्रीमंत झाल्या. पण बहुतेकांना दारिद्र्य आले. राष्ट्राची संपत्ती वाढली, पण सामाजिक प्रगती खुंटली. भूमिहीन आणि मालमत्ताविहीन असा कामगारांचा वर्ग प्रथमच निर्माण झाला. दारिद्र्याच्या समस्येला उठाव मिळाला. एकोणिसाव्या शतकातील कामगार त्याला मिळणाऱ्या रोजगारावर जगत होता. उत्पादनाची साधने त्याच्याजवळ नव्हती. श्रम विकण्याखेरीज उपजीविकेचा अन्य मार्ग त्याला उपलब्ध नव्हता. दरिद्री समाज औद्योगिक क्रान्तीपूर्वीही होता. पण तो नजरेत भरण्याततका मोठा नव्हता. क्रान्तीनंतर गरीब कामगार वर्ग हा समाजाचा एक मोठा घटक बनला. आकार वाढल्यामुळे या समाजाला मोठे बळ

आले. अशा वर्धमान शक्तीच्या समाजावरील अन्याय फार काळ पचण्यासारखे नव्हते. अत्यल्प वेतनावर दिवसभर राबण्याचा दुर्दैवी प्रसंग त्या काळातील कामगारांवर कोसळला होता. स्त्रिया आणि मुले यांनादेखील कारखानदार नफ्याच्या हेतूने अमानुषपणे वागवीत. हे सर्व प्रकार सरकार निमूटपणे पहात होते. निर्हस्तक्षेपनीती शिष्टसंमत झाली होती. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे चालू होती. या परिस्थितीत बदल होईल याची कोणाला शाश्वती वाटत नव्हती. सरकार परिस्थिती पालटविण्याचा इरादादेखील व्यक्त करीत नव्हते. एकंदरीत, कामगारांना पिळण्याबाबतचा कारखानदारांचा अभिनिवेश आणि कामगारांबद्दल सरकार दर्शवीत असलेली अनास्था यातून समाजवादाच्या उदयाला पोषक वातावरण निर्माण होत होते.

## समाजवादी विचारांचे प्रवर्तक :

भांडवलशाहीच्या प्रतिष्ठापनेचे श्रेय जसे इंग्रजांना आहे तसे समाजवादी विचारांचा श्रीगणेशा करण्याचे श्रेय फ्रेंचांनाआहे. सेंट सायमन[२५] (१७६०-१८२५), चार्लस फूर्ये[२६] (१७७२–१८३७), सिस्मॉंडी[२७] (१७७३–१८८२), प्रूधॉं[२८] ( १८०९ - १८६५), लुई ब्लॅंक[२९] (१८११-१८८२)या फ्रेंच अर्थपंडितांनी भांडवलशाहीच्या दोषांचे दिग्दर्शन करीत करीत समाजवादी विचाराचे प्रवर्तन केले. या पूर्वतयारीनंतर कार्ल मार्क्स ( १८१८–१८८३ ) या जर्मन विभूतीने समाजवादाला शास्त्रीय अधिष्ठान देऊन, त्याच्या जागतिक प्रसारकार्याला स्फूर्ती दिली. लेनिन (१८७०-१९२४) आणि स्टॅलिन (१८७९–१९५३) या दोन विख्यात रशियन नेत्यांनी मार्क्स यांच्या समाजवादाला मूर्त रूप दिले. वर उल्लेखलेल्या समाजवाद्यांपैकी काहींच्या कामगिरीचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

**सेंट सायमन :** यांचा जन्म उमराव घराण्यात झाला. सैनिक, प्रवासी, वायदेबाज, लेखक इत्यादि भूमिका धाडसीपणे बजावून त्यांनी

'पहिलावहिला समाजवादी' असल्याचा दावा केला. खाजगी मालमत्तेच्या संस्थेला स्पष्ट हरकत त्यांनी कधीच घेतली नाही. त्यामुळे 'पहिलावहिला समाजवादी' हा किताब त्यांना बहाल करणे कितपत योग्य होईल, याची शंका आहे. त्यांच्या अनुयायांना सेंट सायमनियन्स असे म्हणतात. या सेंट सायमनियन्सनी आपल्या गुरूच्या तत्त्वांना परिपक्वता आणली व त्यांना सामुदायिकतेचे रूप दिले. राजकीय सत्ता आता जमीनदार, सैनिक आणि कायदेपंडित यांच्याकडून कारखानदारांच्याकडे, नव्या अर्थव्यवस्थेचे प्रतिनिधी या नात्याने, जाणार आहे, अशी त्यांची धारणा होती. व्याज घेण्यास त्यांची हरकत नव्हती. पण खंड पूर्णपणे नामंजूर होता. खाजगी मालमत्ता बाळगण्याची पद्धत सेंट सायमन यांनी स्पष्टपणे अव्हेरली नाही. हा दोष यांच्या अनुयायांनी भरून काढला. या अनुयायी वर्गात कोंट, लेसेप्स अशी मातब्बर मंडळी होती. न्याय आणि स्वहित या दोन्ही गोष्टी लक्षात घेता, खाजगी मालमत्तेची संस्था अनुयायी मंडळींना नामंजूर होती. माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेचा वारसा सरकारकडे जावा, म्हणजे एक-दोन पिढ्यात सर्व भांडवल आपोआप सरकारजमा होईल, मग त्या भांडवलाचा ज्यांना जास्तीतजास्त चांगल्याप्रकारे वापर करता येतो, अशा उत्पादकांना सरकार ते भांडवल पुरवेल अशी त्यांची योजना होती. समाजातील उत्पादन याच पद्धतीने कमाल मर्यादा गाठू शकेल असा त्यांचा विश्वास होता. ते समतावादी नव्हते. 'प्रत्येकाला कुवतीप्रमाणे मिळेल' असा त्यांचा आदेश होता. त्यानुसार अधिक कर्तबगार उत्पादकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा जादा हिस्सा मिळू शकत होता. पण त्यांनी सुचविलेली पद्धत समुदायवादी होती. उत्पादनाच्या साधनांचे सार्वजनिकरित्या नियंत्रण आणि उत्पादनाच्या क्रियेचे सरकारमार्फत दिग्दर्शन ही त्यांच्या पद्धतीची वैशिष्ट्ये होती. सेंट सायमन यांच्या निधनानंतर सात-आठ वर्षांत त्यांचा पंथ फोफावला. त्यांच्या

शिकवणीत धार्मिक आणि गूढवादी सूर होते. या शिकवणींच्या प्रसारासाठी १८३१ साली पॅरिसजवळ एक आश्रमवजा वसाहत उभारण्यात आली. पण पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे या पंथाचा बोजवारा उडाला. बरेचजण, कोंटच्या पॉझिटिव्हिझमचा स्वीकार करून, त्यांचे अनुयायी बनले, काही समाजवादाच्या या ना त्या पोटशाखेस जाऊन मिळाले. काही अनुयायी व्यापार-उदिमात पडले आणि चांगले नावारूपाला आले. पैकी लेसेप्सने सुवेझ कालवा बांधला, एन्फिन्टीन रेलवे कंपनीचा संचालक झाला, पिअेर बंधूंनी पतपेढी काढली, शेवलियार सिनेटर झाला. (इंग्लंडशी कॉब्डन व्यापारी करार करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली.) गूढवादी दृष्टिकोण आणि व्यावहारिक चातुर्य यांचे अजब मिश्रण हा सेंट सायमनच्या बहुतेक अनुयायांचा एक विशेष होता.

**फूर्ये :** हा एक निष्कलंक चारित्र्याचा विक्षिप्त ब्रह्मचारी होता. विक्षिप्तपणामुळे त्याच्या विचारातील मौलिकतेकडे इतरांचे दुर्लक्ष झाले. छोटया छोटया समाजवादी वस्त्या वसवून, हळूहळू सामाजिक परिवर्तन घडवून आणावे अशी त्यांची शिकवण होती. सक्तीच्या राष्ट्रीयीकरणापेक्षा खुषीच्या सहकाराचा ते पुरस्कार करीत. फलान्सटर म्हणजे त्यांना अभिप्रेत असलेली समाजवादी वस्ती. या वस्तीतील रहिवाशांनी संयुक्त निधी मंडळी स्थापून एकत्र यावयाचे अशी त्यांची कल्पना होती. अशी वस्ती वसविण्यासाठी लागणारा पैसा पुरविण्यास कोणीतरी धनिक पुढे येईल अशी त्यांची श्रद्धा होती. आपल्या समाजवादाच्या प्रयोगासाठी पैसा पुरविणाऱ्या लक्षाधीशाची ते दररोज एक तास याप्रमाणे, एका विशिष्ट खोलीत बारा वर्षे नेमाने वाट पाहत होते. या संकल्पित फलान्सटरीत एक हजार एकर जमीन व एक सामुदायिक उपाहारगृह यांची योजना करण्यात येणार होती. जमिनीचा वापर फळे, भाजीपाला पिकविणे अथवा मधमाशा, कोंबड्या पाळणे येवढ्यासाठीच करावयाचा, धान्ये पिकवावयाची नाहीत. (कारण ते काम फार कंटाळवाणे आहे !)

उत्पादनाचे वाटप श्रमाबद्दल $\frac{5}{12}$, भांडवलाबद्दल $\frac{4}{12}$ आणि कर्तृत्वाबद्दल $\frac{3}{12}$ या सूत्रानुसार करावयाचे इत्यादि फूर्येच्या फलान्सटरविषयीच्या कल्पना होत्या. श्रमिकाला निदान संयुक्त-मालक तरी करता येईल का हे अर्थपंडितांनी सर्वप्रथम पाहिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. फूर्येच्या मृत्युनंतर फलान्स्टरविषयीचे कुतूहल संपले नाही. फलान्स्टर पंथ नेस्तनाबूत झाला आहे असे अजूनही म्हणता येणार नाही. सह-भागीदारीची कल्पना जनमानसात रुजाविण्यात फूर्ये यांनी मोलाची कामगिरी बजावली.

**सिस्मॉंडी :** अभिजात अर्थशास्त्रावर हल्ला चढवून सिस्मॉंडी यांनी समाजवादी विचाराच्या आगमनाची वाट मोकळी केली. स्पर्धा, यंत्रांचा वापर इत्यादिमुळे भांडवलशाहीत अतिरिक्त उत्पादनाचा धोका असल्याचे मत त्यांनी हिरीरीने मांडले. कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणाऱ्या उपायांचा त्यांनी पुरस्कार केला. कामगाराला बेकारी, आजारपण, अपघात, वृद्धत्व याबाबत नुकसानभरपाई देण्याची मालकावर जबाबदारी असली पाहिजे असे प्रतिपादून त्यांनी सामाजिक सुरक्षितताविषयक विचारांना चालना दिली. छोटे शेतकरी, छोटे कारागीर यांचा जुना जमाना पुन्हा सुरू केल्यास श्रमिक वर्गाची पुष्कळशी दुःखे कमी होतील असा त्यांचा कयास होता. म्हणून यंत्रे वापरण्यावर, इतकेच नव्हे तर नव्या यंत्रांचा शोध लागण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण असावे असे त्यांना वाटे. समाजपरिवर्तनासाठी समाजवादाचा तोडगा त्यांना सुचला. पण त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमी मनाने तो तोडगा अव्हेरलाच असे म्हटले पाहिजे.

**प्रूधाँ :** 'मालमत्ता म्हणजे काय?' अशी पृच्छा करणारे नाव असलेले पुस्तक प्रूधाँ यांनीं लिहिले. 'मालमत्ता म्हणजे चोरी' असे त्यांनी सदर पुस्तकात प्रतिपादले. पण प्रूधाँ अतिरेकी विचाराचे नव्हते. भांडवलदारांना अस्वस्थ करण्याइतपत सनसनाटी भाषा

वापरण्याचा त्यांचा इरादा होता. खाजगी मालमत्तेच्या रिवाजापेक्षा खाजगी मालमत्तेचा गैरवापर केल्याने खंड आणि व्याज यावर जगणारा ऐतखाऊ वर्ग तयार होतो या विकृतीवर त्यांचा विशेष रोख होता. ऐतखाऊंची मालमत्ता त्यांना चोरीसमान होती. श्रमिकांनी घाम गाळून संपादलेली मालमत्ता त्यांनी योग्य मानली. पिळवणूक संपुष्टात आली आहे, श्रमिकांना स्वातंत्र्य आहे, स्पर्धेला पूर्ण वाव आहे आणि समान सेवांचा विनिमय होत आहे असा समाज त्यांना अभिप्रेत होता. एकाच्या श्रमाचे फळ दुसऱ्याने लुबाडणे त्यांना मान्य नव्हते. खाजगी मालमत्तेचे महत्त्व कमी करण्यासाठी त्यांनी सरकारी कर्जवाटपाचा कार्यक्रम सुचविला. प्रत्येक उत्पादकाला, त्याला लागणारे भांडवल बिनव्याजी मिळू शकले तर मालकाला विनाकष्ट प्राप्ती मिळवून देण्याची खाजगी मालमत्तेची शक्ती संपुष्टात येईल व केवळ श्रमामधूनच नवी संपत्ती निर्माण होईल असे त्यांना वाटे. अपरिवर्तनीय कागदी चलन छापून सरकारने प्रामाणिक उत्पादकांना बिनव्याजी मुबलक कर्जपुरवठा करावा असे त्यांनी सुचविले. जिवंतपणी प्रूधाँ फारसे मान्यता पावले नाहीत. पण त्यांचे विचार फ्रेंच जनमानसाला रुचण्यासारखेच होते. अलीकडे, म्हणजे १९२० च्या सुमारास, प्रूधाँचे स्मारक म्हणून एक सार्वजनिक संस्था स्थापन झाली होती. यावरून प्रूधाँच्या विचाराविषयी फ्रेंचांना अजूनही स्वारस्य वाटते, असे अनुमान काढावयास हरकत नाही.

**लुई ब्लँक :** समकालीन समाजवादी विचारवंतांमध्ये लुई ब्लँक हे फार लोकप्रिय झाले. त्यांच्याजवळील विचार फारसा सखोल नव्हता. पण विचार संकलित करून तो चुरचुरीतपणे मांडण्याची हातोटी त्यांना साधली होती. त्यांचे विचार बव्हंशी सेंट सायमन, फूर्ये आणि प्रूधाँ यांच्या विचारावरच आधारलेले होते. पण ब्लँक यांचे विचार इतरांच्यापेक्षा अधिक वाचनीय होते. शिवाय ब्लँकची योजना इतरांच्यापेक्षा सोपी आणि व्यवहार्य होती. त्यांचे ' ऑर्गनायझेशन

'पहिलावहिला समाजवादी' असल्याचा दावा केला. खाजगी मालमत्तेच्या संस्थेला स्पष्ट हरकत त्यांनी कधींच घेतली नाही. त्यामुळे 'पहिलाबहिला समाजवादी' हा किताब त्यांना बहाल करणे कितपत योग्य होईल, याची शंका आहे. त्यांच्या अनुयायांना सेंट सायमनियन्स असे म्हणतात. या सेंट सायमनियन्सनी आपल्या गुरूच्या तत्त्वांना परिपक्वता आणली व त्यांना सामुदायिकतेचे रूप दिले. राजकीय सत्ता आता जमीनदार, सैनिक आणि कायदेपंडित यांच्याकडून कारखानदारांच्याकडे, नव्या अर्थव्यवस्थेचे प्रतिनिधी या नात्याने, जाणार आहे, अशी त्यांची धारणा होती. व्याज घेण्यास त्यांची हरकत नव्हती. पण खंड पूर्णपणे नामंजूर होता. खाजगी मालमत्ता बाळगण्याची पद्धत सेंट सायमन यांनी स्पष्टपणे अव्हेरली नाही. हा दोष यांच्या अनुयायांनी भरून काढला. या अनुयायी वर्गात कोंट, लेसेप्स अशी मातब्बर मंडळी होती. न्याय आणि स्वहित या दोन्ही गोष्टी लक्षात घेता, खाजगी मालमत्तेची संस्था अनुयायी मंडळींना नामंजूर होती. माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेचा वारसा सरकारकडे जावा, म्हणजे एक-दोन पिढ्यात सर्व भांडवल आपोआप सरकारजमा होईल, मग त्या भांडवलाचा ज्यांना जास्तीतजास्त चांगल्याप्रकारे वापर करता येतो, अशा उत्पादकांना सरकार ते भांडवल पुरवेल अशी त्यांची योजना होती. समाजातील उत्पादन याच पद्धतीने कमाल मर्यादा गाठू शकेल असा त्यांचा विश्वास होता. ते समतावादी नव्हते. 'प्रत्येकाला कुवतीप्रमाणे मिळेल' असा त्यांचा आदेश होता. त्यानुसार अधिक कर्तबगार उत्पादकांना राष्ट्रीय उत्पन्नाचा जादा हिस्सा मिळू शकत होता. पण त्यांनी सुचविलेली पद्धत समुदायवादी होती. उत्पादनाच्या साधनांचे सार्वजनिकरित्या नियंत्रण आणि उत्पादनाच्या क्रियेचे सरकारमार्फत दिग्दर्शन ही त्यांच्या पद्धतीची वैशिष्ट्ये होती. सेंट सायमन यांच्या निधनानंतर सात-आठ वर्षांत त्यांचा पंथ फोफावला. त्यांच्या

शिकवणीत धार्मिक आणि गूढवादी सूर होते. या शिकवणीच्या प्रसारासाठी १८३१ साली पॅरिसजवळ एक आश्रमवजा वसाहत उभारण्यात आली. पण पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे या पंथाचा बोजवारा उडाला. बरेचजण, कोंटच्या पॉझिटिव्हिझमचा स्वीकार करून, त्यांचे अनुयायी बनले, काही समाजवादाच्या या ना त्या पोटशाखेस जाऊन मिळाले. काही अनुयायी व्यापार-उदिमात पडले आणि चांगले नावारूपाला आले. पैकी लेसेप्सने सुवेझ कालवा बांधला, एन्फिन्टीन रेलवे कंपनीचा संचालक झाला, पिअेर बंधूंनी पतपेढी काढली, शेवलियार सिनेटर झाला. (इंग्लंडशी कॉब्डन व्यापारी करार करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली.) गूढवादी दृष्टिकोण आणि व्यावहारिक चातुर्य यांचे अजब मिश्रण हा सेंट सायमनच्या बहुतेक अनुयायांचा एक विशेष होता.

**फूर्ये :** हा एक निष्कलंक चारित्र्याचा विक्षिप्त ब्रह्मचारी होता. विक्षिप्तपणामुळे त्याच्या विचारातील मौलिकतेकडे इतरांचे दुर्लक्ष झाले. छोटया छोटया समाजवादी वस्त्या वसवून, हळूहळू सामाजिक परिवर्तन घडवून आणावे अशी त्यांची शिकवण होती. सक्तीच्या राष्ट्रीयीकरणापेक्षा खुषीच्या सहकाराचा ते पुरस्कार करीत. फलान्सटर म्हणजे त्यांना अभिप्रेत असलेली समाजवादी वस्ती. या वस्तीतील रहिवाशांनी संयुक्त निधी मंडळी स्थापून एकत्र यावयाचे अशी त्यांची कल्पना होती. अशी वस्ती वसविण्यासाठी लागणारा पैसा पुरविण्यास कोणीतरी धनिक पुढे येईल अशी त्यांची श्रद्धा होती. आपल्या समाजवादाच्या प्रयोगासाठी पैसा पुरविणाऱ्या लक्षाधीशाची ते दररोज एक तास याप्रमाणे, एका विशिष्ट खोलीत बारा वर्षे नेमाने वाट पाहत होते. या संकल्पित फलान्सटरात एक हजार एकर जमीन व एक सामुदायिक उपाहारगृह यांची योजना करण्यात येणार होती. जमिनीचा वापर फळे, भाजीपाला पिकविणे अथवा मधमाशा, कोंबड्या पाळणे येवढ्यासाठीच करावयाचा, धान्ये पिकवावयाची नाहीत. (कारण ते काम फार कंटाळवाणे आहे !)

ऑफ लेबर ' हे समाजवादावरील चोपडेवजा पुस्तक १८४१ साली प्रसिद्ध झाले. छोटेखानी आकारामुळे तसेच लेखकाच्या प्रसिद्धीमुळे या पुस्तकाचा खप पुष्कळ झाला. स्पर्धा हे सर्व दुःखांचे मूळ आहे, म्हणून स्पर्धेची जागा कामगारांच्या मालकीच्या आणि कामगारांनी चालविलेल्या यंत्रशाळांनी घेतली पाहिजे, सार्वजनिक यंत्रशाळा आणि खाजगी यंत्रशाळा यांच्यातील स्पर्धेमध्ये खाजगी यंत्रशाळांचा टिकाव लागणार नाही, अखेर आस्तेआस्ते व आपोआप खाजगी कारखाने नष्ट होतील असे त्यांचे कयास होते. ब्लँकची योजना लोकप्रिय झाली, पण पण ब्लँकना म्हणावे तसे यश मात्र आले नाही.

**मार्क्स :** कार्ल मार्क्स हे ज्यू आईबापांच्या पोटी जर्मनीत जन्माला आले. त्यांचे बरेचसे आयुष्य हद्दपारीमुळे लंडन शहरी व्यतीत झाले. कॅपिटल हा अतिनावाजलेला ग्रंथ त्यांनी तेथेच लिहून पुरा केला. या ग्रंथाचा पहिला खंड १८६७ साली प्रसिद्ध झाला. उरलेले दोन खंड त्यांच्या मृत्यूनंतर लगेचच त्यांचे मित्र एन्गल्स यांनी प्रसिद्ध केले. मार्क्स यांचे विचार फ्रेंच समाजवाद्यांपेक्षा सर्वस्वी वेगळे आहेत. मार्क्स क्रान्तीवादी आहेत. परंपरागत समाजाला मूठमाती देण्यासाठी सर्वंकष क्रान्तीची आवश्यकता मार्क्स प्रतिपादतात. या क्रान्तीला हिंसा वर्ज्य नाही. मार्क्स यांचा समाजवाद समाजातील केवळ एकाच वर्गाला—म्हणजे श्रमिक-वर्गाला—आवाहन करतो. मार्क्सचे विचार आदर्शांची आळवणी करणारे, भावनाधीन असे नाहीत. समाजविकासाच्या नियमांचा निःपक्षपातीपणे विचार करून आणि वस्तुस्थितीचा पद्धतशीर आणि तार्किक अभ्यास करून काढलेल्या निष्कर्षांवर त्यांचे समाजवादी विचार आधारलेले आहेत. थोडक्यात म्हणजे, हा ' शास्त्रीय समाजवाद ' आहे. सामाजिक दुखणी शांततेच्या मार्गांनी बरी व्हावीत असा फ्रेंच समाजवाद्यांचा पवित्रा होता. समाजातील सर्व थरांना फ्रेंच समाजवादी आवाहन करीत. सर्वजण सुखी व्हावेत, अगदी श्रीमंतदेखील, अशी

त्यांची पायघोळ भूमिका असे. सामाजिक न्यायाच्या कोणत्यातरी तत्त्वावर समाजाची घडी पुन्हा बसवावी असे त्यांना वाटे. मार्क्सनी या सर्वांची 'स्वप्नाळू समाजवादी' अशी संभावना केली. मार्क्स यांचा समाजवाद या स्वप्नाळू मंडळींच्या विचारापेक्षा अधिक सरस होता, कारण तो प्राप्त आर्थिक पद्धतीच्या शास्त्रीय चिकित्सेवर आणि त्या पद्धतीच्या विकासाच्या इतिहासावर आधारलेला होता. मार्क्स यांची कामगिरी दुहेरी स्वरूपाची होती. एकीकडे त्यांनी आपले आर्थिक सिद्धान्त मांडले तर दुसरीकडे इतिहासाचा अन्वय लावला. मार्क्स यांच्या विचारांचा सारांश पुढे दिला आहे.[१०]

१. श्रममूल्य सिद्धान्त : वस्तू माणसाच्या श्रमाने निर्माण होतात. श्रमनिर्मित वस्तू बाजारात विक्रीस येतात. दोन भिन्न वस्तूंची बाजारात देवाणघेवाण होते यांचा अर्थ त्या दोन वस्तू समान अमूर्त मानवी श्रमातून निर्माण झाल्या आहेत.

२. सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम : वस्तूचे विनिमयमूल्य ठरविताना 'सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम' ही कल्पना महत्त्वाची ठरते. श्रमिक जर सरासरी कसब दाखविणारा, उत्पादनाची आधुनिक साधने वापरणारा आणि मागणी असलेली वस्तू निर्माण करणारा असेल तरच त्याचे श्रम 'सामाजिकदृष्ट्या आवश्यक' मानले पाहिजेत. सरासरी श्रमाला ठराविक संख्येने गुणले की कसबी श्रम येतात. 'चालू' श्रमच आवश्यक श्रम आहेत असे नव्हे, 'गत' श्रमदेखील—म्हणजे यंत्रे वगैरे स्वरूपातील भांडवल—आवश्यक आहेत.

३. श्रमशक्तीचे मूल्य : श्रमाचे मूल्य वस्तू-मूल्याप्रमाणेच ठरते. श्रमिकाची उदरनिर्वाहाची साधने बनविण्यासाठी श्रमिकाला जेवढा काळ लागतो त्यावरून श्रमिकाची किंमत ठरते.

ऑफ लेबर' हे समाजवादावरील चोपडेवजा पुस्तक १८४१ साली प्रसिद्ध झाले. छोटेखानी आकारामुळे तसेच लेखकाच्या प्रसिद्धीमुळे या पुस्तकाचा खप पुष्कळ झाला. स्पर्धा हे सर्व दुःखांचे मूळ आहे, म्हणून स्पर्धेची जागा कामगारांच्या मालकीच्या आणि कामगारांनी चालविलेल्या यंत्रशाळांनी घेतली पाहिजे, सार्वजनिक यंत्रशाळा आणि खाजगी यंत्रशाळा यांच्यातील स्पर्धेमध्ये खाजगी यंत्रशाळांचा टिकाव लागणार नाही, अखेर आस्तेआस्ते व आपोआप खाजगी कारखाने नष्ट होतील असे त्यांचे कयास होते. ब्लँकची योजना लोकप्रिय झाली, पण पण ब्लँकना म्हणावे तसे यश मात्र आले नाही.

**मार्क्स :** कार्ल मार्क्स हे ज्यू आईबापांच्या पोटी जर्मनीत जन्माला आले. त्यांचे बरेचसे आयुष्य हद्दपारीमुळे लंडन शहरी व्यतीत झाले. कॅपिटल हा अतिनावाजलेला ग्रंथ त्यांनी तेथेच लिहून पुरा केला. या ग्रंथाचा पहिला खंड १८६७ साली प्रसिद्ध झाला, उरलेले दोन खंड त्यांच्या मृत्यूनंतर लगेचच त्यांचे मित्र एन्गल्स यांनी प्रसिद्ध केले. मार्क्स यांचे विचार फ्रेंच समाजवाद्यांपेक्षा सर्वस्वी वेगळे आहेत. मार्क्स क्रान्तीवादी आहेत. परंपरागत समाजाला मूठमाती देण्यासाठी सर्वंकष क्रान्तीची आवश्यकता मार्क्स प्रतिपादतात. या क्रान्तीला हिंसा वर्ज्य नाही. मार्क्स यांचा समाजवाद समाजातील केवळ एकाच वर्गाला—म्हणजे श्रमिक-वर्गाला—आवाहन करतो. मार्क्सचे विचार आदर्शाची आळवणी करणारे, भावनाधीन असे नाहीत. समाजविकासाच्या नियमांचा निःपक्षपातीपणे विचार करून आणि वस्तुस्थितीचा पद्धतशीर आणि तार्किक अभ्यास करून काढलेल्या निष्कर्षावर त्यांचे समाजवादी विचार आधारलेले आहेत. थोडक्यात म्हणजे, हा 'शास्त्रीय समाजवाद' आहे. सामाजिक दुखणी शांततेच्या मार्गांनी बरी व्हावीत असा फ्रेंच समाजवाद्यांचा पवित्रा होता. समाजातील सर्व थरांना फ्रेंच समाजवादी आवाहन करीत. सर्वजण सुखी व्हावेत, अगदी श्रीमंतदेखील, अशी

त्यांची पायघोळ भूमिका असे. सामाजिक न्यायाच्या कोणत्यातरी तत्त्वावर समाजाची घडी पुन्हा बसवावी असे त्यांना वाटे. मार्क्सनी या सर्वांची 'स्वप्नाळू समाजवादी' अशी संभावना केली. मार्क्स यांचा समाजवाद या स्वप्नाळू मंडळींच्या विचारापेक्षा अधिक सरस होता, कारण तो प्राप्त आर्थिक पद्धतीच्या शास्त्रीय चिकित्सेवर आणि त्या पद्धतीच्या विकासाच्या इतिहासावर आधारलेला होता. मार्क्स यांची कामगिरी दुहेरी स्वरूपाची होती. एकीकडे त्यांनी आपले आर्थिक सिद्धान्त मांडले तर दुसरीकडे इतिहासाचा अन्वय लावला. मार्क्स यांच्या विचारांचा सारांश पुढे दिला आहे.[१०]

१. श्रममूल्य सिद्धान्त : वस्तू माणसाच्या श्रमाने निर्माण होतात. श्रमनिर्मित वस्तू बाजारात विक्रीस येतात. दोन भिन्न वस्तूंची बाजारात देवाणघेवाण होते यांचा अर्थ त्या दोन वस्तू समान अमूर्त मानवी श्रमातूत निर्माण झाल्या आहेत.

२. सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम : वस्तूचे विनिमयमूल्य ठरविताना 'सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम' ही कल्पना महत्त्वाची ठरते. श्रमिक जर सरासरी कसब दाखविणारा, उत्पादनाची आधुनिक साधनें वापरणारा आणि मागणी असलेली वस्तू निर्माण करणारा असेल तरच त्याचे श्रम 'सामाजिकदृष्ट्या आवश्यक' मानले पाहिजेत. सरासरी श्रमाला ठराविक संख्येने गुणले की कसबी श्रम येतात. 'चालू' श्रमच आवश्यक श्रम आहेत असे नव्हे, 'गत' श्रमदेखील—म्हणजे यंत्रे वगैरे स्वरूपातील भांडवल—आवश्यक आहेत.

३. श्रमशक्तीचे मूल्य : श्रमाचे मूल्य वस्तू-मूल्याप्रमाणेच ठरते. श्रमिकाची उदरनिर्वाहाची साधने बनविण्यासाठी श्रमिकाला जेवढा काळ लागतो त्यावरून श्रमिकाची किंमत ठरते.

४. अतिरिक्त मूल्य : श्रमिक उत्पादन-साधनांचा ( म्हणजे कारखाने वगैरेंचा ) कधी मालक नसतो. तो आपली श्रमशक्ती भांडवलदाराला विकतो. भांडवलदार त्यास त्याच्या श्रमशक्तीइतका रोजगार मोजतो. उदाहरणार्थ, श्रमिकाच्या रोजच्या निर्वाहासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीसाठी आठ श्रम-तासांचा मोबदला श्रमिकाला देतो. पण या मोबदल्यात भांडवलदाराने श्रमिकाला दिवसभर ( म्हणजे रोज दहा तास असे आपण समजू ) राबवून घेतलेले असते. श्रमिकाने भांडवलदाराच्या कारखान्यात तयार केलेल्या वस्तूंची किंमत बारा श्रमतासांच्या बरोबरीची असते. म्हणजे श्रमिकाने आपल्या निर्वाहासाठी लागणाऱ्या वस्तूपेक्षा, दोन श्रम-तासात तयार होणाऱ्या वस्तूंचे जादा उत्पादन केले. यास अतिरिक्त मूल्य म्हणतात. भांडवलदार ते स्वतः बळकावतो.

५. स्थिर आणि बदलते भांडवल : भांडवलाचे स्थिर भांडवल (C) आणि बदलते भांडवल (V) असे दोन प्रकार पडतात. पैकी केवळ बदलते भांडवलच वर उल्लेखलेले अतिरिक्त मूल्य (S) निर्माण करते. सर्व उत्पादित वस्तूंचे मूल्य C, V आणि S यांच्या बेरजेबरोबर असते. स्थिर भांडवलात यंत्रे आणि कच्चा माल यांचा समावेश होतो. कारण ते भांडवल अतिरिक्त मूल्य निर्माण करीत नाही. श्रमशक्तीच्या मूल्याला बदलते भांडवल म्हणावयाचे. हेच भांडवल अतिरिक्त मूल्य निर्माण करते.

६. अतिरिक्त मूल्याचा दर : यासच पिळवणुकीचा अथवा शोषणाचा दर असेही नाव आहे. अतिरिक्त मूल्याच्या बदलत्या भांडवलाशी असलेल्या प्रमाणास—म्हणजे S भागिले V— अतिरिक्त मूल्याचा दर असे म्हणतात. समजा, श्रमिकाने सहा तास काम केले असता त्याचे पोट भरण्याइतके काम होते. अशा परिस्थितीत

तो प्रत्यक्षात बारा तास काम करीत असेल तर पिळवणुकीचा दर $\frac{S}{V}$, म्हणजे $\frac{६}{६}$, म्हणजे शंभर टक्के आहे.

७. भांडवलाची सेन्द्रीय बनावट : स्थिर भांवलाचे बदलत्या भांडवलाशी असलेले प्रमाण ( $\frac{c}{v}$) म्हणजे भांडवलाची सेन्द्रीय बनावट होय. जसजशी तांत्रिक प्रगती होत जाईल तसतसे एकूण भांडवलातील स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढत जाते.

८. नफ्याचा दर : अतिरिक्त मूल्याचे एकूण भांडवलाशी असलेले प्रमाण ( $\frac{S}{C+V}$ ) म्हणजे नफ्याचा दर होय. पिळवणुकीचा दर ( $\frac{s}{v}$ ) आणि भांडवलाची सेन्द्रीय बनावट ( $\frac{c}{v}$ ) यामुळे नफ्याचा दर ठरतो.

९. नफ्याचा घटता दर : केवळ बदलते भांडवलच अतिरिक्त मूल्य निर्माण करीत असल्यामुळे आणि तांत्रिक प्रगतीनुसार स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढत जात असल्यामुळे नफ्याच्या दराची प्रवृत्ती घटण्याकडे असणार हे उघड आहे.

१०. यंत्रांचा परिणाम : यंत्रांच्या वापरामुळे श्रमिकाची उदरनिर्वाहाची साधने पूर्वीपेक्षा कमी वेळात तयार होतात. यंत्रामुळे शारीरिक श्रमाला महत्त्व न राहिल्यामुळे स्त्रिया वगैरे दुबळे कामगार काम करण्यास पात्र ठरतात. कामाचा दिवस लांबविणे आणि कामाची गती वाढविणे शक्य होते. म्हणून यंत्रांच्या वापरामुळे पिळवणुकीचा आणि नफ्याचा दर वाढतो.

११. श्रमिकांची राखीव सेना : यंत्रांच्या वापरामुळे बरीच श्रमसंख्या निरुपयोगी ठरते. त्यांच्या समुदायाला श्रमिकांची राखीव सेना म्हणावयाचे. असे बेकार श्रमिक समाजात असले म्हणजे रोजगाराचे दर सतत खाली खेचत आणणे शक्य होते.

१२. नफ्याच्या दराचे समानीकरण : हळूहळू सर्व उद्योगात नफ्याचा दर समान होतो. म्हणजे सर्व भांडवलदारांना नफ्याचा समान दर मिळतो. त्यामुळे वस्तूचे मूल्य आणि वस्तूची किंमत यात तफावत निर्माण होते. पूर्वी वस्तूमूल्य हे (C+V+S) या बेरजेबरोबर होते. पण आता त्या बेरजेतील S च्या जागी सरासरी S आलेला असतो.

१३. पिळवणुकीच्या दराची समता : श्रमिकांमधील स्पर्धा, श्रमिकांचे एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात जाणे या क्रियेमुळे अतिरिक्त मूल्याचा दर सर्वत्र समान होतो.

१४. प्राप्तीचे वाटप : प्राप्तीचे वाटप विषम बनते. जनतेची उपभोगक्षमता क्षीण होत जाते. पण अर्थकारणाची उत्पादनक्षमता अफाट असते. एकंदरीत अर्थकारणाची उत्पादनक्षमता आणि समाजाची उपभोगक्षमता यांच्यात प्रखर विसंवाद निर्माण होतो.

१५. आर्थिक आपत्तींची परंपरा : यानंतर समाजात आर्थिक पेचप्रसंग उद्भवतो. नफ्याचा दर घटत असतो. श्रमिकांची राखीव फौज वाढत असते. आलेल्या आर्थिक आपत्तीत छोटा भांडवलदार नष्ट होतो. भांडवल अल्प लोकांच्या हाती एकवटते. दरम्यान बेकारी वाढलेली असते. त्यामुळे पिळवणुकीचा दर वाढून उरलेल्या भांडवलदारांना भरगच्च नफा होतो. भांडवलसंचय वाढतो. श्रमशक्तीची मागणी वाढते. पण वाढता रोजगार पुन्हा अतिरिक्त मूल्यात कपात घडवून आणतो.

१६. ऱ्हास : अर्थकारणाच्या पडत्या काळात अशी आर्थिक आपत्ती वारंवार उद्भवल्यामुळे श्रमिकांचे वास्तव वेतन आणि राहणीमान घसरते. भांडवलाचे केंद्रीकरण होते. श्रमिक-वर्गाची प्रचंड वाढ होते. मालमत्तेविषयीचे परंपरागत संकेत उत्पादनात खीळ बसवू

लागतात. तेव्हा सामाजिक क्रान्ती होते व त्यातून वर्गविहीन समाज निर्माण होतो.

अशाप्रकारे श्रमिकांचे शोषण आणि वर्गविग्रह याचा परिणाम म्हणून भांडवलशाही अस्तंगत होते असे सांगून कार्ल मार्क्स यांनी वरील सूत्रांच्या आधारे शास्त्रीय समाजवादाची उभारणी केली.

## समाजवादाची व्याख्या

समाजवादी चळवळीत मतभेदांचा सुकाळ आहे. त्यामुळे समाजवादाची निर्दोष आणि सर्वमान्य व्याख्या करणे अगदी अवघड आहे. एकोणिसाव्या शतकातील समाजवादी विचारांचे स्थूल परिशीलन करता समाजवादाची एक व्यापक व्याख्या पुढीलप्रमाणे देता येईल.

**‘ राष्ट्रातील उत्पादनाच्या आणि वितरणाच्या साधनांची मालकी आणि व्यवस्थापन सबंध समाजाकडे असणाऱ्या अर्थप्रणालीला समाजवाद असे म्हणतात. ’**

ही व्याख्या उपयुक्त, सुटसुटीत, आकलनीय आणि लोकप्रिय अशी वाटली तरी पूर्णपणे तर्कशुद्ध आणि काटेकोर म्हणता येणार नाही. म्हणून खाली समाजवादाच्या काही निवडक व्याख्या दिल्या आहेत.

१. **लाउक्स** : अमेरिकेतील प्रा. लाउक्स यांनी कंपॅरिटिव्ह इकॉनॉमिक सिस्टीम्स (६ वी आवृत्ती, १९६१) या ग्रंथात समाजवादाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे :

‘ व्यक्तीची आर्थिक प्रेरणा, व्यक्तीचे उपभोगविषयक अथवा व्यवसायविषयक स्वातंत्र्य यांचा फार मोठा नाश न करता, वृद्धिंगत झालेले राष्ट्रीय उत्पन्न अधिक समप्रमाणात वाटता यावे हे उद्दिष्ट ठेवून, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यात वापरल्या जाणाऱ्या निसर्गदत्त आणि मानवदत्त उत्पादकसामुग्रीचे मालकी आणि व्यवस्थापकीय अधिकार

व्यक्तींना देण्याऐवजी सबंध समाजाकडेच ठेवण्याचे ध्येय बाळगणारी चळवळ म्हणजे समाजवाद होय.'[३१]

**२. वेब ( सिडने–बियाट्रिस ) :** या ब्रिटिश दांपत्याने १९२३ साली प्रसिद्ध केलेल्या ' दि डीके ऑफ कॅपिटॅलिस्टिक सिविलायझेशन ' या ग्रंथात समाजवादाची पुढील व्याख्या दिली आहे :

' उद्योग आणि सेवा, तसेच त्यांना लागणारी उत्पादनसाधने व्यक्तीच्या मालकीची असता कामा नयेत, आणि खाजगी नफा प्राप्त व्हावा या कारणासाठी औद्योगिक आणि सामाजिक प्रशासनाचे संघटन होता कामा नये ही समाजीकरणाची ( म्हणजे समाजवादाची ) आवश्यक वैशिष्ट्ये आहेत. '[३२]

**३. पिगू :** विख्यात ब्रिटिश अर्थपंडित पिगू यांनी आपल्या ' सोशॅलिझम व्हर्सेस कॅपिटॅलिझम ' या ग्रंथात (प्रथम प्रकाशन १९३७) ' समाजीकृत उद्योग ' या कल्पनेच्या आधारे समाजवादाची व्याख्या दिली आहे. ती अशी :

' जेथील उत्पादनसाधने सार्वजनिक अधिकारमंडळाच्या अथवा स्वयंशासित संस्थेच्या मालकीची असून ती, जनतेला विक्री करण्याच्या मार्गाने नफा मिळविण्याच्या हेतूने नव्हे तर, ते अधिकारमंडळ अथवा ती संस्था ज्यांचे प्रातिनिधित्व करते त्यांच्या सेवेखातर वापरली जातात, अशा उद्योगाला समाजीकृत उद्योग म्हणतात. समाजवाद म्हणजे जिच्या उत्पादक सामुग्रीचा मुख्य भाग समाजीकृत उद्योगात गुंतला आहे अशी अर्थव्यवस्था.'[३३]

**४. डिकिन्सन :** १९३९ साली प्रसिध्द झालेल्या ' दि इकॉनॉमिक्स ऑफ सोशॅलिझम ' या पुस्तकात ब्रिटिश अर्थपंडित श्री. एच्. डी. डिकिन्सन म्हणतात :

**'सर्वव्यापी आर्थिक योजनेस अनुसरून प्रमुख उत्पादन साधनांवर सबंध समाजाची मालकी आणि समान हक्कांच्या अधिष्ठानावर समाजाच्या सर्व सदस्यांना समाजीकृत आणि नियोजनबद्ध उत्पादनाच्या परिणितींचा लाभ घेण्याचा अधिकार यांनी युक्त असे समाजाचे आर्थिक संघटन म्हणजे समाजवाद होय.'** [२४]

वरील व्याख्यांमध्ये बरेचसे साम्य व काही सूक्ष्म भेद आहेत. पहिल्या प्रथम दिलेली समाजवादाची 'लोकप्रिय' व्याख्या बरीच अपुरी आहे. त्यातील सुप्त अर्थ खाजगी मालकी आणि खाजगी व्यवस्थापन यांचे उच्चाटन दर्शवितो. पण समाजोपयोगी व्यवहारांना अग्रक्रम आणि नियोजन या समाजवादाच्या अनिवार्य लक्षणांचा स्पष्ट उल्लेख या व्याख्येच्या व्याप्तीतून निसटला आहे. लाउक्स समाजवादाकडे ध्येय ( म्हणजे बहुधा अजून गाठावयाचे ध्येय ) आणि चळवळ या दृष्टीने पाहतात. चळवळ या शब्दामुळे समाजवादी पक्षातील विस्कळीतपणाकडे अथवा अनुशासन-विहीनतेकडे आपले लक्ष वेधते. वेब पति-पत्नींनी समाजवादाची व्यवच्छेदक लक्षणे सांगताना खाजगी मालकी आणि खाजगी नफा यांच्या उचल-बांगडीला विशेष महत्त्व दिले आहे. पिगू यांनी सार्वजनिक मालकी आणि समाजहितपरायणतेचे धोरण यांना अधिक महत्त्व दिले आहे. समाजवादाच्या कसोटीस उतरण्यासाठी, त्यांच्या मते, केवळ मुख्य (म्हणजे सर्वच्या सर्व नव्हे) उत्पादनसामुग्री समाजाच्या मालकीची असली तरी पुरेसे आहे. तौलनिकदृष्टया डिकिन्सन यांची व्याख्या अधिक समाधानकारक वाटते. समाजवादास चळवळ न मानता आर्थिक संघटनाची विविक्षित पध्दत मानतात. केन्द्रवर्ती नियोजन, सार्वजनिक मालकी, समता या समाजवादाच्या व्यवच्छेदक लक्षणांचा अंतर्भाव त्यांनी आपल्या व्याख्येत केला आहे.

## समाजवादाची रूपे

समाजवादी विचार एकजिनसी नाही. त्यात विविध छटा आहेत. प्रमाण-भेद आहेत. म्हणून समाजवादाच्या निरनिराळ्या पोटप्रकारांची ओझरती ओळख असणे हितावह आहे. स्वप्नाळू समाजवाद आणि शास्त्रीय समाजवाद या दोन प्रकारांचा उल्लेख यापूर्वी येऊन गेलेला आहेच.

**फेबियन सोशॅलिझम :** या नावाचा एक पंथ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये उदयाला आला. सिडने वेब, बर्नार्ड शॉ अशी प्रज्ञावंत मंडळी या पंथाची अध्वर्यू होती. त्यांच्या संघटनेला फेबियन सोसायटी असे नाव होते. ती १८८४[३५] साली स्थापन झाली. फेबियस कन्क्टेटर [३६] नावाच्या रोमन योद्धयावरून सदर संघटनेने आपले फेबियन हे नाव घेतले. सबूरीचे डावपेच लढविण्यात हा योध्दा पटाईत होता. त्याच्यासारख्याच धिमेपणाने समाजवाद आणला पाहिजे, अशी या मंडळींची धारणा होती. रिकॅर्डोच्या मूल्यासिध्दान्ताचा नाद त्यांनी सोडला. पण खंडाविषयीचे रिकॅर्डोचे विवेचन प्रसृत करून, समाजातील ऐतखाऊ वर्ग, खंड आणि व्याज यांच्या रूपाने राष्ट्रीय उत्पन्नातील केवढा मोठा हिस्सा फस्त करतो ते त्यांनी प्रभावीपणे दाखवून दिले. त्यासुमारास सामाजिक घडामोडी सरकारी नियंत्रणाखाली होण्यास प्रारंभ झाला होता. या प्रवृत्तीचा फेबियन-पंथियांनी चांगला उपयोग करून घेतला. सरकारी नियंत्रणाची प्रथा अशीच वाढीला लागून अखेर समाजवाद अवतरेल असे त्यांचे भाकित होते.

**सिंडिकॅलिझम ( संघवाद ) :** मार्क्सवादातूनच हा पोटप्रवाह निर्माण झाला. प्रूधाँचे विचार आणि अराज्यवाद ( अनार्किझम ) यांचा पगडाही संघवादाच्या उदयास कारणीभूत ठरला. जॉर्जेस सोरेल यांच्यासारख्या फ्रेंच विचारवंताच्या भाकितातून समाजवादाचे हे रूप विसाव्या

शतकात नावारूपाला आले. संघवादाच्या तत्त्वानुसार कामगार संघटना केवळ समाज-क्रान्तीचे साधन नाही तर नव्या समाजाची उभारणी करताना ते एक संघटना-परिमाणदेखील आहे. सार्वत्रिक संपाच्या मार्गाने सामाजिक क्रान्ती घडवून आणावयाची. कामगार नुसते हात बांधून उभे राहिले की भांडवलदार शरण येतील. क्रान्ती झाल्यावर प्रत्येक कामगार संघटनेने एक-एक उद्योग ताब्यात घेऊन तो चालवायचा. सरकारची गरज अशी उरणार नाही. निरनिराळ्या कामगार-संघटनामध्ये संबंध ठेवण्यासाठी एक महासंघ ठेवला म्हणजे झाले. राज्य अथवा सरकार यांच्याविषयी संघवादी वैरभाव बाळगतात. म्हणून अराज्यवाद्यांना ते जवळचे वाटतात. श्रमिकाविषयी जिव्हाळा आणि वर्गकलहातून उद्भवणारी क्रान्ती या कल्पनांमुळे ते मार्क्सवाद्यांना जवळचे वाटतात. फ्रान्स, इटली वगैरे युरोपीय देशातील जनतेला हे समाजवादाचे रूप, त्यातील क्रान्तीकारक कल्पनांमुळे, विशेष आकर्षक वाटत आले आहे. इंग्लंडमध्ये संघवाद १९१० च्या सुमारास जरा सौम्य स्वरूपात अवतरला. त्याला गील्ड-सोशॅलिझम (उद्योग-पंचायत समाजवाद) असे नाव मिळाले.

**बोल्शेविझम** : हे समाजवादाचे आणखी एक ताजे रूप. मार्क्सवादाचे प्रत्यक्ष आचरण म्हणजेच बोल्शेविझम. लेनिन हे बोल्शेविक पीठाचे प्रमुख आचार्य. बोल्शेविझमचा आशय असा : सामाजिक क्रान्ती हे समाजवाद्यांचे आद्य कर्तव्य असून वेळ पडल्यास हिंसक[१७] मार्गांनी अशी क्रान्ती घडवून आणली पाहिजे. क्रान्तीनंतर समाजात जे तात्पुरते पर्व सुरू होईल त्याला 'श्रमिकांच्या हुकूमशाहीचे पर्व.'[१८] असे म्हणावयाचे. ते संपुष्टात आल्यानंतर पूर्ण साम्यवाद साकार होईल. अशाप्रकारे व्यक्तिवादी समाजात प्रथम क्रान्ती, नंतर श्रमिकांची हुकूमशाही आणि शेवटी पूर्ण साम्यवादाची अवस्था उद्भवते. श्रमिकांच्या हुकूमशाहीच्या काळात फक्त सरकारला भांडवलशाही पद्धतीने वागण्याची

मुभा असते. सरकारदेखील केवळ श्रमिकांच्या हितापुरतेच भांडवलशाही पद्धतीने वागते. पूर्वी भांडवलदारांची श्रमिकांवर दडपशाही चाले. आता श्रमिकांचे सरकार खाजगी भांडवलदारावर दडपशाही गाजवेल. लेनिन यांच्या मते असली हुकूमशाही राज्यसंस्थेमार्फत चालणे योग्य. भांडवलशाही समाज आणि श्रमिक समाज यांच्यात फरक एवढाच की भांडवलशाहीत भांडवलदारांचे वर्चस्व असते तर श्रमिकांच्या हुकूमशाहीत श्रमिकांचे वर्चस्व असते. येवढा फरक वगळता दोन्ही प्रकारच्या अर्थकारणात फारसा वेगळेपणा नसतो. पण श्रमिकांच्या हुकूमशाहीची ही अवस्था केव्हातरी संपुष्टात येते. नंतर प्रत्येकजण आपल्या गरजेइतके घेतो आणि आपल्या ऐपतीप्रमाणे समाजाला देतो. अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर मानवी व्यवहारांच्या सार्वजनिक नियमनाची गरज न उरल्यामुळे राज्यसंस्थेचा आपोआप विलय होतो. लेनिनचे उत्तराधिकारी स्टॅलिन यांनी या मीमांसेत एक महत्त्वाचा बदल केला. क्रान्ती विश्वव्यापी असली पाहिजे असे लेनिन यांचे मत होते. म्हणून जगातील सर्व राष्ट्रांमध्ये क्रान्ती घडवून आणण्यासाठी ‘ कॉमिन्टर्न ’ या संघटनेची योजना करण्यात आली होती. पण साम्यवादी चळवळ आंतरराष्ट्रीय स्वरूपाची असलीच पाहिजे असे नाही, असे स्टॅलिन यांचे मत होते.[३९] भांडवलशाही राष्ट्रांनी वेढले असतानादेखील साम्यवादी राष्ट्राला अस्तित्व टिकविणे अवघड नाही. साम्यवादी राष्ट्राविषयी द्वेष-मत्सरादि भावना बाळगणाऱ्या भांडवलशाही राष्ट्रांचे भोवती कडे पडले असताना रशियासारख्या साम्यवादी राष्ट्राने स्वहितसंवर्धनासाठी हुकूमशाही राजवट स्वीकारलीच पाहिजे असा त्यांचा दावा होता. रशियात अजून श्रमिकांच्या हुकूमशाहीचा कालखंड चालू असून तो जेव्हा केव्हा संपेल तेव्हा खराखुरा साम्यवाद तेथे अवतरणार आहे.

**ख्रिश्चन समाजवाद :** भांडवलशाहीने निर्माण केलेले प्रश्न ख्रिश्चन धर्मतत्त्वांना अनुसरून सोडविणारा समाजवादी पंथ म्हणजे ख्रिश्चन

समाजवादी पंथ होय. त्यांच्या विचारात नैतिक बाजूला विशेष महत्त्वाचे स्थान होते. भांडवलशाही उध्वस्त करण्यापेक्षा ती सुधारण्यावर त्यांचा अधिक भर होता. क्रान्तिकारक कामगार संघटना बांधण्यापेक्षा उत्पादकांच्या सहकारी संस्था काढण्याचाच त्यांचा कार्यक्रम होता. इंग्लंडमधील चार्लस् किंग्जले आणि फ्रान्समधील फ्रेडरिक ला प्ले व चार्लस् जीड ही मंडळी ख्रिश्चन समाजवादी चळवळीची अध्वर्यू मानली जातात. मार्क्सने समाजवादाचा पुरस्कार करताना ऐहिक बाजूवर सर्वथैव भर दिला, तर ख्रिश्चन समाजवाद्यांनी नैतिक बाजूवर विशेष भर दिला. युरोपमधील समाजवादी चळवळ काहीशी कामगार वर्गापुरतीच मर्यादित होती. पण या मंडळींनी धर्म-माध्यमातून समाजवादाचा प्रचार केल्यामुळे समाजातील सर्व थरांना समाजवादाचे शिक्षण मिळू शकले.

**भारतीय समाजवाद :** १९१७ साली म. गांधींनी चंपारण्यात हिंदुस्थानातील सत्याग्रहाचा पहिला प्रयोग सुरू केला. अशारीतीने रशियात प्रभावहीन ठरलेले टॉलस्टॉयचे अध्यात्मिक तत्त्वज्ञान व अहिंसक क्रान्तिशास्त्र भारतात यशस्वी करण्याचा प्रयत्न सुरू झाला.[४०] भारतीय स्वातंत्र्याचा क्रान्तिकारक लढा आणि बोल्शेविक क्रान्ती एकमेकापासून भिन्न आहेत असा आचार्य जावडेकर यांचा दावा आहे. ब्रिटन आणि भारत यांच्यामधील स्वातंत्र्य-लढ्याला अखेरपर्यंत समंजसपणाचे आणि माणुसकीचे स्वरुप होते. म. गांधी यांच्यासारखे ‘ अव्यभिचारी, सत्यनिष्ठ व निरपवाद अहिंसावादी ’ नेते भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला लाभल्यामुळे या संग्रामातील माणुसकी टिकून राहिली. ‘ गांधीजींची ही अव्यभिचारी सत्यनिष्ठा व निरपवाद अहिंसावाद यांचा तर्कशुद्ध निष्कर्ष म्हणजेच अध्यात्मिक अराज्यवाद होय. रशियामध्ये अपेशी ठरलेले व बोल्शेविक पक्षाच्या हुकूमशाही रणगाड्याखाली चुरडून गेलेले हे अराज्यवादी ध्येय महात्मा गांधीना प्रभावी बनविता आले ........’ [४१] आचार्य जावडेकर यांच्या विश्लेषणानुसार भारताच्या समाजवादी चळवळीत म. गांधींच्या

विचाराचा प्रभाव असलेले तीन प्रवाह आढळतात. काँग्रेस पक्षाचा नेहरूप्रणीत समाजवाद, हिंदी समाजवाद अथवा प्रजा-समाजवाद आणि विनोबाजींचा भूदानाच्या रूपाने प्रकटलेला आत्मराज्यवाद हे ते तीन प्रवाह होत. याखेरीज कम्युनिस्ट क्रान्तीकारकांचीही एक शक्ती या देशात आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न गेली पन्नास-साठ वर्षे करीत आहे.[४२]

भारतातील समाजवादी विचाराचा उदय रशियन क्रान्तीनंतरच झाला. खुद्द काँग्रेस पक्षात एक अंतर्गत समाजवादी विभाग निर्माण झाला. मिनू मसानी, जयप्रकाश नारायण, नरेन्द्र देव हे त्यात प्रामुख्याने होते. सुरवातीला तरी या मंडळींना मार्क्सवादाचे फार आकर्षण वाटे. पण भारतीय समाजवादी विचार मार्क्सवादापासून अलग ठेवण्याची त्यांनी काळजी घेतली. १९३६ नंतर कम्युनिस्ट आणि काँग्रेस समाजवादी यांच्यातील भेद आधिक स्पष्ट झाले. १९४६ साली समाजवादी म्हणविणाऱ्या मडळींनी काँग्रेसला रामराम ठोकला. पैकी प्रजा-समाजवादी मंडळींनी बिगर-मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानावर भारतातील शेती व कामगार-विषयक समस्या सोडविण्याचा थोडाफार प्रयत्न केला आहे. कृपलानी, जयप्रकाश नारायण, अशोक मेहता इत्यादि समाजवाद्यांनी म. गांधीप्रणीत सर्वोदय हे भारतीय समाजवादापुढील ध्येय असले पाहिजे असे प्रतिपादले आहे. प्रजा-समाजवाद्यांच्या अथवा समाजवाद्यांच्या तत्त्वज्ञानाचे समग्र रूप कधीच प्रकट झालेले नसले तरी नरेन्द्र देव, अशोक मेहता आणि डॉ. लोहिया यांच्या लेखनात त्यांचे काही अंश आढळतात. नरेन्द्र देव यांनी लोकशाही समाजवादाची कल्पना स्पष्ट केली, अशोक मेहता यांनी भारतातील कृषिसमस्येचे समाजवादी दृष्टिकोणातून परिशीलन केले तर डॉ. राम मनोहर लोहिया यांनी मार्क्सवादावर निरूपण केले. निवडक साम्यवादी नेत्यांचे लेखनही महत्त्वाचे आहे. कॉम्रेड श्री. अ. डांगे यांनी एन्गल्सच्या सामाजिक उत्क्रान्तीच्या दृष्टिकोणावर आधारलेला वेद-पुराण-

क्र. १८७७१

कालीन भारतीय इतिहासाचा अन्वय सादर केला. ई. एम्. एस्. नम्बुद्रिपाद, बी. टी. रणदिवे, अजित रे हे समाजवादावरील विचार मांडणारे आणखी काही साम्यवादी विचारवंत. मार्क्सवादाच्या क्षितिजा-पलिकडील वेध घेणारा मानवेन्द्रनाथ रॉय यांचा नवमानवतावाद हा-देखील भारतीय समाजवादी विचारातीलच एक धारा आहे. पण एकंदरीत वर्गविग्रहाचा हव्यास न बाळगता, अहिंसक मार्गांनी प्राप्त करावयाचा आणि लोकशाहीवर आधारलेला समाजवाद हेच भारतीय समाजवादाचे लोकप्रिय आणि सर्वमान्य स्वरूप आहे.

भारतातील समाजवादी विचारावरील गांधीजींचा प्रभाव लक्षात घेता त्यांचे सर्वोदयाचे तत्त्वज्ञान ध्यानात घेणे आवश्यक आहे. देशाचे आर्थिक संघटन कोणत्या पायावर व्हावे याचे दिग्दर्शन म. गांधींनी केले आहे. मोठे अथवा अवजड उद्योगधंदे आणि सर्वंकष केन्द्रीय नियोजन आवश्यक आहे असे त्यांना कधीच वाटले नाही. त्यांच्या सर्वोदय योजनेनुसार प्रादेशिक उद्योगधंदे स्वयंपूर्णतेच्या दृष्टिकोणातून उभारण्यात आले पाहिजेत. तांत्रिकदृष्ट्या विचार करता जे उद्योग मोठ्या प्रमाणावर चालविणे भागच आहे, त्यांचे राष्ट्रीयीकरण व्हावे. एकंदरीत मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे आणि यंत्रे यांचा कमीतकमी वापर व्हावा आणि संपत्तीचे वाटप जास्तीतजास्त सम प्रमाणात व्हावे यावर सर्वोदयाचा कटाक्ष आहे.

भारतीय स्वातंत्र्य-चळवळ आणि समाजवाद यांची सांगड घालण्याचे श्रेय अखिल भारतीय काँग्रेस पक्षाला द्यावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे, आवडी व भुवनेश्वर येथील अधिवेशनांतील समाजवादावरील प्रसिद्ध ठराव आणि पंचवार्षिक योजनांतील धोरणे याद्वारे याच पक्षाने नवभारताची उभारणी आणि समाजवाद यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. मार्गदर्शक

तत्त्वांतील तरतुदीनुसार राष्ट्रीय-जीवन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाने संपृक्त राहील अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करून ती टिकविण्याची जबाबदारी राज्यसंस्थेवर आली आहे. सर्वांना उपजीविकेची पुरेशी साधने उपलब्ध व्हावीत, उत्तम राहणीमान लाभावे आणि सुसंस्कृत जीवनाची अनुभूति यावी या हेतूंनी राज्यसंस्थेने आपली धोरणे आखण्याचा आदेश देण्यात आला आहे. सार्वजनिक हिताला उपकारक ठरेल अशाच पद्धतीने समाजातील साधनसंपत्तीच्या मालकीच्या व नियंत्रणाच्या हक्कांचे वाटप व्हावे व सार्वजनिक हिताला बाध येईल अशा रीतीने संपत्ती आणि उत्पादनसाधने यांचे केन्द्रीकरण न व्हावे याबाबत राज्यसंस्थेने दक्षता घेतली पाहिजे, असे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. राज्यघटनेसारख्या पवित्र व श्रेष्ठ कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वांमधील या तरतुदी भारतीय समाजवादाची स्थूल रूपरेषा दाखवितात. राज्यसंस्थेच्या धोरणाविषयीची ही मार्गदर्शक तत्त्वे सरकारवर बंधनकारक नसली तरी राष्ट्राच्या समाजवादी आकांक्षा जागृत ठेवायाचे कार्य या मार्गदर्शक तत्त्वांमुळे शक्य झाले आहे. राज्यघटनेने समाजवादाची व्यापक चौकट आखून दिल्यामुळे पंचवार्षिक योजनांमध्ये त्याचा सूक्ष्म तपशील भरणे सोपे गेले. खाजगी नफ्याच्याऐवजी सामाजिक लाभाला प्राधान्य देणे हे आपल्या समाजवादाच्या दिशेने व्हावयाच्या मार्गक्रमणाचे गमक आहे असे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत म्हटले आहे. 'आर्थिक विकासाचा लाभ समाजातील कनिष्ठ थरांना वाढत्या प्रमाणात व्हावा आणि प्राप्ती, संपत्ती व आर्थिक शक्ती यांच्यातील केन्द्रीकरण उत्तरोत्तर अधिकाधिक संकुचित व्हावे अशी दृष्टी दुसरी योजना असताना योजनाकारांनी ठेवली होती.[४३] 'ज्ञातीरहित, वर्गविहीन अथवा विशेषाधिकाररहित समाजाची स्थापना आणि राष्ट्रीय कल्याणाला हातभार लावण्याची तसेच समाजातील सर्व थराना व देशातील सर्व विभागांना विकासाची पुरेपूर

संधी उपलब्ध करणे ' हे ध्येय तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत नजरेसमोर ठेवण्यात आले होते.[४४]

श्रीमन्नारायण यांनी सोशॉलिझम इन इंडियन प्लॅनिंग या ग्रंथात भारतीय राज्यघटना आणि पंचवार्षिक योजना यामध्ये अनुस्यूत असलेल्या समाजवादाचे उत्तम सर्वेक्षण केले आहे. भारतीय समाजवादाला आधुनिक सिद्धान्त आणि प्राचीन परंपरा या दोहोंचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याची कामगिरी राष्ट्रीय नेत्यांनी पार पाडली असे श्रीमन्नारायणजी मानतात. ते म्हणतात, ' अन्य देशातील सामाजिक व आर्थिक प्रगतीतील चांगल्या गोष्टी संग्रहित करण्याचा प्रयत्न भारतीय समाजवादाने केला आहे. तरीपण तो अस्सल देशी बनावटीचा आहे आणि त्याची प्रवृत्ती प्राचीन सांस्कृतिक वारशापासून स्फूर्ती देण्याचीदेखील आहे. नूतन आणि प्राच्य, विज्ञान आणि अध्यात्म, भौतिक प्रगती आणि नैतिक पुनरुत्थान यांच्यातील सम्मीलन म्हणजे भारतीय समाजवाद. त्याचे हे व्यवच्छेदक लक्षण भारताच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत प्रतिबिंबित झाले आहे. किमान राहणीमानाची हमी आणि अर्थेतर व अध्यात्मिक मूल्यांचे जतन या दोन्ही गोष्टींना भारतीय समाजवादात महत्त्व आहे. अहिंसा, साधनशुचिता आणि विकेन्द्रीकरण ही आमच्या समाजवादाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.'[४५]

## समाजवादाची वैशिष्ट्ये

समाजवादाच्या विविध व्याख्यांवरून समाजवादाची निवडक वैशिष्ट्ये अचूकपणे सांगणे कठीण आहे. निरनिराळ्या देशांतील समाजवादी कल्पनांमध्ये व कार्यक्रमांमध्ये सूक्ष्मच नव्हे तर स्थूलदेखील फरक आहेत. श्री. हामू यांनी ' इकॉनॉमिक सिस्टीम्स' ( १९५१ ) या ग्रंथामध्ये समाजवादाचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या विवेचनानुसार ( अ ) समुदायवाद ( कलेक्टिव्हिझम ), ( ब )

सत्ता—भांडवलशाही (ॲथॉरिटॅरियन कॅपिटॅलिझम अथवा फॅसिझम,) (क) केन्द्रनियोजनबद्ध समाजवाद (सोशॅलिझम वुइथ सेंट्रल प्लॅनिंग, (ड) उदारमतवादी अथवा लोकशाही समाजवाद (लिबरल सोशॅलिझम) आणि (इ) सत्ता-समाजवाद अथवा साम्यवाद (कम्युनिझम) अशी समाजवादाची विविध रूपे पहावयास मिळतात. हे वर्गीकरण लक्षात घेता समाजवाद ही अर्थव्यवस्था एकाजिनसी नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे समाजवादाची सर्वमान्य वैशिष्ट्ये सांगणे आणखी कठीण झाले म्हणून त्यातल्यात्यात सर्वमान्य अशा वैशिष्ट्यांचा ऊहापोह येथे केला आहे.

**१. समता :** आर्थिक आणि सामाजिक समतेचा पुरस्कार समाजवादात मोठ्या हिरीरीने केलेला असतो. भांडवलशाहीत आर्थिक विषमता असते. व्यक्तिस्वातंत्र्य, खाजगी मालमत्ता, नफ्याची प्रेरणा या वैशिष्टयामुळे भांडवलशाहीतील विषमता तीव्रतर होते. त्यामुळे समाजातील बहुसंख्य जनता कामगार अथवा बेकार आणि म्हणून दरिद्री राहते. उलट निवडक व्यक्ती भांडवलसज्ज, म्हणून श्रीमंत आणि ऐषारामी आढळतात. आर्थिक विषमतेतून सामाजिक विषमता निर्माण होण्यास वेळ लागत नाही. समाजवादाचे प्रयोजन विषमता नष्ट करण्यासाठी असल्यामुळे समाजवादी तत्त्वज्ञानात आर्थिक समतेला महत्त्वाचे स्थान आहे. खाजगी मालमत्ता, नफा-तत्त्व यांचे उच्चाटन केल्यानंतर विषमतेला वाव फारसा रहात नाही. समता-तत्त्वात संधीच्या समानतेचा समावेश असतो. त्यामुळे सर्वांनाच उत्कर्षाची संधी मिळते. कालांतराने गरीब-श्रीमंत अथवा श्रमिक-ऐतखाऊ असे वर्ग नष्ट होतात आणि अखेर खराखुरा वर्गविहीन समाज निर्माण होतो. समाजवादातील समता-तत्त्वाच्या मुळाशी मानवता हीच प्रेरणा आहे. पण आर्थिक समता काटेकोर, गणितातल्यासारखी अचूक नाही. अधिक चांगले, कौशल्याचे जबाबदारीचे काम करणाऱ्यांना प्रोत्साहन रहावे म्हणून वरिष्ठ पातळीवरील

श्रमांना अधिक मोबदला मिळणे समाजवादातदेखील क्रमप्राप्त आहे. तरीपण हे मोबदल्यातील फरक भांडवलशाहीतील तुलनेच्या मानाने खूपच कमी प्रमाणात असावयास पाहिजेत यात शंका नाही. मानवी जीवनाची प्रतिष्ठा टिकविण्यासाठी माणसाला प्राथमिक गरजा व्यवस्थित भागविणारे किमान राहणीमान लाभले पाहिजे. त्याला रोजगार आणि सुरक्षितता यांची हमी मिळाली पाहिजे. या अपेक्षा समाजवाद पुऱ्या करतो. या निमित्ताने आर्थिक समतेचाच आविष्कार होत असतो.

**२. उत्पादन-सामुग्रीची सामाजिक मालकी :** उत्पादन-सामुग्रीची सामाजिक मालकी आणि तिचे सामाजिक व्यवस्थापन हे समाजवादी अर्थरचनेचे आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. सर्व, निदान बहुतेक सर्व उत्पादनसाधने–म्हणजे शेते, कारखाने, दुकाने वगैरे–कुणा व्यक्तीच्या खाजगी मालकीची न राहता, ती सबंध समाजाच्या मालकीची असतात. मालकीबरोबरच अशा उत्पादनसाधनांच्या व्यवस्थापनाचे कार्यही सबंध समाजावर म्हणजेच समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांवर–सोपविलेले असते. त्यामुळे उत्पादनाचे कार्य समाजहिताला प्राधान्य देऊन पार पाडले जाते. भांडवलशाहीतील प्राधान्यक्रम आणि समाजवादातील प्राधान्यक्रम वेगवेगळे असतात. भांडवलशाहीत व्यक्ती आपल्या नफ्याच्या प्रेरणेला अग्रक्रम देऊ शकते. पण समाजवादी रचनेत समाजाच्या हिताच्या व उत्कर्षाच्या बाबींना अग्रक्रम मिळतो. व्यवस्थापनातही सामाजिक हिताला प्राधान्य असते. कारखान्यात काम करणारे कामगारच बव्हंशी कारखाना चालवितात किंवा सामुदायिक शेती-संस्थेतील सदस्यच शेते पिकवितात. उत्पादनसाधनांच्या समाजीकरणानंतर उत्पादन-वितरणाच्या साधनांचे समाजीकरण होणे क्रमप्राप्त ठरते. समाजवादात सगळे या ना त्या स्वरूपाचे श्रमिक असल्यामुळे सर्वांना वेतनाच्यावाटे उत्पन्न मिळते. या वेतनावरही समाजाची मालकी आणि समाजाचे नियंत्रण असते. प्रत्येकाला काम मिळण्याची तेथे जशी

हमी आहे त्याचप्रमाणे प्रत्येकावर काम करण्याची जबाबदारी आहे. एकंदरीत, आर्थिक निर्णय घेण्याची जबाबदारी, नफा मिळविण्याच्या उद्दिष्टाने भारलेल्या कुणा व्यक्तीवर नसते तर सार्वजनिक हिताची चाड बाळगणाऱ्या सबंध समाजावर असते.

**३. नियोजन :** नियोजन हे समाजवादाचे अत्यावश्यक वैशिष्टय आहे. पण जेथे नियोजन आहे त्या प्रत्येक ठिकाणी समाजवाद हमखास असेलच असे नाही. उदाहरणार्थ, भांडवलदार कारखानापातळीवर उत्पादन-नियोजनाचा हव्यास धरतो याचा अर्थ त्याची समाजवादावर निष्ठा आहे असा घेतल्यास तो चुकीचा ठरेल. नियोजनाची तरफदारी निरनिराळ्या अर्थपद्धती करू शकतात. म्हणून समाजवाद असेल तेथे नियोजन असेल हे जरी खरे असले तरी नियोजन असेल तेथे समाजवाद नसूही शकेल.

श्री. एच्. डी. डिकिन्सन यांनी नियोजनाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. ते म्हणतात, ‘ सबंध अर्थव्यवस्थेची सांगोपांग पाहणी करून त्या आधारे उत्पादन आणि वितरण या विषयींचे महत्त्वाचे आर्थिक निर्णय—म्हणजे उत्पादन कोणते, किती, कसे, केव्हा, कोठे करावे व ते कोणामध्ये वाटावे—एका सुनिश्चित अधिकारमंडळाच्या विवेकी निर्णयाला अनुसरून घेणे यास आर्थिक नियोजन असे म्हणतात.’ प्रत्येक समाजवादी अर्थकारणात नियोजन-मंडळासारखी एक यंत्रणा असली पाहिजे. तिने सर्व अर्थकरणाचा परिपूर्ण अभ्यास करावयाचा, साधनसामुग्रीची मोजदाद करावयाची, अग्रक्रम द्यावयाचे, विकास-प्रक्रियेचे पवित्रे ठरवावयाचे व त्यानुसार जाणीवपूर्वक तयार केलेल्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करावयाचे. साधनसामुग्रीच्या वाटपव्यवस्थेचे केन्द्रीकरण नियोजन-मंडळामध्ये झालेले असल्यामुळे समन्वय आणि काटकसर या दोन गोष्टींचा लाभ होतो. अग्रक्रम जाणीवपूर्वक ठरवावयाचे असल्यामुळे समाजहिताची दृष्टी ठेवून योजना आखणे

शक्य होते. भांडवलशाहीत साधनसामुग्रीचे वाटप किंमती आणि नफा यांच्या यंत्रणेद्वारे आपोआप होत असते. समाजवादात हे वाटप नियोजित असते. वाटपविषयक धोरण आपोआप उद्भवलेले नसते. ते जाणीवपूर्वक ठरविलेले असते. वाटपाच्या बाबतीत किंमती आाणि नफा यांना महत्त्व न देता समाजहिताला महत्त्व दिलेले असते. आर्थिक नियोजनामुळे विकासाची दिशा निश्चित राहते. मानवी कर्तृत्व अनिर्बन्ध न राहता त्याचे समाजाहिताच्या दृष्टिकोणातून नियमन होते. पहिल्या महायुद्धापर्यन्त मागासलेला असलेला रशिया जेमतेम पन्नास वर्षात इंग्लंड, अमेरिका, या देशांच्या पंक्तीला जाऊन बसला व काही काही बाबतीत तर त्याने वरील देशांच्याही पुढे मजल मारली. याचे बरेचसे श्रेय आर्थिक नियोजनास द्यावयास हवे. नियोजित अर्थकरणात विकास वेगाने होतो यात शंका नाही.

४. **संकीर्ण** : याशिवाय समाजवादाची आणखी काही वैशिष्ट्ये सांगता येतील. समाजवादात खाजगी नफ्याचे उच्चाटन केलेले असते. नियोजनामुळे व्यक्तिस्वातंत्र्य भांडवलशाहीच्या तुलनेने धोक्यात असते, पण त्याचबरोबर आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षितता भांडवल-शाहीच्या मानाने अधिक असते. विनिमय-व्यवहारांचे स्तोम कमी झाल्यामुळे पैसा केवळ विनिमयाचे माध्यम येवढ्यापुरतेच काम करतो. पैशास भांडवलशाहीतल्याप्रमाणे महत्त्व उरत नाही. खाजगी मालमत्तेला, विनाकष्ट प्राप्तीला मज्जाव असतो. वरील सर्व वैशिष्ट्यांनी युक्त अशी ही समाजवादी अर्थव्यवस्था परिपक्व अवस्थेल पोहोचली म्हणजे ‘प्रत्येकजण आपल्या कुवतीनुसार समाजाला देतो आणि गरजेनुसार समाजाकडून घेतो.’ अशावेळी सार्वजनिक नियमनाची गरज उरत नाही. म्हणून अखेर राज्यसंस्थेचा विलय होतो.

## समाजवादाचे गुण

समाजवादी अर्थरचनेत भांडवलशाहीच्या पुष्कळशा दोषांचा अभाव असल्यामुळे अशी अर्थव्यवस्था सरस मानण्याची प्रवृत्ती लोकप्रिय ठरत आहे. समाजवादाचे गुण खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. मानवता :** भांडवलशाहीने अर्थमानवाचे स्तोम माजविल्यामुळे खऱ्याखुऱ्या मानवी मूल्यांची चांगली जोपासना भांडवलशाहीत होऊ शकली नाही. समाजवादात मात्र सर्व अर्थव्यवहारांचा केन्द्रबिंदू मानवता हाच आहे. सर्वांना सुख मिळावे, किमान राहणीमान मिळावे, अल्पसंख्यांकांच्या सुखाखातर बहुसंख्यांकांच्यावर दारिद्य आणि दुःख यांचे डोंगर कोसळू नयेत अशी समाजवादाची धारणा आहे. प्रत्येकाला नियमित रोजगार मिळण्याची हमी, पिळवणुकीचे उच्चाटन, किमान राहणीमानाची शाश्वती, आजारपण, अपघात, वृद्धत्व, अपंगत्व अशा संकटापासून संरक्षण इत्यादि गोष्टींचा लाभ समाजवादी अर्थरचनेतील सामान्य माणसाला मिळतो. माणसाची काहीएक किमान प्रतिष्ठा आहे व ती प्रतिष्ठा टिकून राहील अशा प्रकारे जन्म व्यतीत करण्याची संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे याची दक्षता समाजवादाने घेतली आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या धुंदीत भांडवलशाहीने माणुसकीचे स्मरण ठेवले नाही. माणसाला श्रम विकणारे जनावर बनविले. समाजवादाने मात्र मानवतेची दृष्टी ठेवून आर्थिक रचना करण्याची दक्षता घेतली आहे.

**२. पिळवणुकीचे उच्चाटन :** खाजगी मालमत्ता, वारसा हक्क, नफ्याची प्रेरणा, आर्थिक स्वातंत्र्य इत्यादि वैशिष्ट्यामुळे भांडवलशाहीत श्रमिकांची पिळवणूक करणे भांडवलदारांना उपयुक्त वाटू लागले. ही पिळवणूक बंद व्हावी म्हणून पिळवणुकीला उत्तेजन देणाऱ्या वरील वैशिष्ट्यांना समाजवादाने मज्जाव केला आहे. खाजगी मालमत्ता अथवा

खाजगी व्यवसाय नसल्यामुळे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीस पिळण्याचा प्रसंगच उद्भवत नाही. जेवढी सेवा घेतली तेवढा मोबदला देण्याचे धोरण समाजवादात आग्रहपूर्वक राबविले जाते. त्यामुळे श्रमिकाला भांडवलशाहीतील वेतनापेक्षा अधिक वास्तव वेतन मिळते.

३. **विषमतेचा ऱ्हास** : संपत्ती आणि प्राप्ती यांच्या वाटपातील प्रचंड विषमता हा भांडवलशाहीचा अंगभूत दोष आहे. भांडवलशाहीपेक्षा समाजवादी अर्थव्यवस्थेत विषमतेचे प्रमाण खूपच कमी होईल असा दावा समाजवाद्यांनी केल्यास तो बऱ्याच अंशी खरा आहे. उत्पादनाच्या प्रमुख साधनांची मालकी समाजाकडे गेल्यामुळे खाजगी व्यक्तींना मिळणारी आणि विनाकष्ट स्वरूपाची मानली जाणारी प्राप्ती आता व्यक्तींना मिळण्याऐवजी समाजाला मिळते. जमिनीला मिळणारा खंड, भांडवलाला मिळणारे व्याज आणि संयोजनचातुर्याबद्दल मिळणारा नफा या गोष्टी आता सरकारला मिळतात. राहता राहिले श्रमिकांचे आणि व्यवस्थापकांचे रोजगार आणि पगार. त्याबाबतीत विषमता पूर्णपणे नष्ट व्हावी असे आधुनिक समाजवाद्यांचे उद्दिष्ट असत नाही. श्रमिकांना व्यवसायस्वातंत्र्य द्यावयाचे म्हटल्यास रोजगाराची भिन्नता स्वीकारलीच पाहिजे. डिकिन्सनच्या म्हणण्यानुसार, 'श्रमिकाच्या श्रमाचे मूल्य आणि श्रमिकाला मिळणारा रोजगार यांचा संबंध समाजवादात असतोच असे नाही.' दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास हिशोबाच्या सोईसाठी वेतन एका दराने मोजले जाईल व राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप करताना श्रमिकाला त्याच्या गरजेनुसार वेगळेच वेतन दिले जाईल, अशी शक्यतादेखील असू शकते. पण ओस्कार लांगे या विख्यात समाजवादी विचारवंताचे म्हणणे असे की, समाजवादी अर्थव्यवस्थेतील वेतनाच्या दरातील तफावत किरकोळ स्वरूपाची व दुर्लक्षणीय अशी ठेवता येणे शक्य आहे. डिकिन्सन म्हणतात, 'श्रमिकांच्या गतिक्षमतेतील अडथळे दूर केले, शिक्षण आणि प्रशिक्षण

देण्याची तीव्र इच्छा असणाऱ्या सर्वांना ते मोफत आणि मुक्तद्वार ठेवले तर सध्या दुर्मीळ असलेल्या श्रमाचा पुरवठा वाढेल, त्यामुळे त्या श्रमांची किंमत कमी होऊन श्रमिकांच्या व्यक्तिगत प्राप्तीतील विषमता कमी होईल.' डिकिन्सन यांचे हे विवेचन पटण्यासारखे आहे. पुढे ते म्हणतात, 'सध्या घाणेरडी आणि हलकीसलकी कामे करणाऱ्यांना वेतन भलतेच कमी मिळते. पण समाजवादी पद्धतीत जशा कामांना कधी नव्हे इतका भरगच्च रोजगार मिळण्याची शक्यता आहे. हा रोजगार इतका भरगच्च असेल की सुट्टी काढून सफरीला जाण्याचे मनोराज्य पुरे करण्यासाठी पैसा साठविता यावा म्हणून एखादा मंत्री अथवा बँकेचा मॅनेजर काही महिन्यांसाठी झाडूवाला अगर भंगी होण्यास आपखुषीने तयार होईल.' विषमता कमी करण्याच्या भरात मुत्सद्या-पेक्षाही झाडूवाल्याला जास्त पगार देवविणारे, डिकिन्सन यांचे भाकित मनोरंजक नाही काय ?

**४. श्रमाला प्रतिष्ठा :** भांडवलशाही अर्थकारणातील मानव हा केवळ श्रमिक असतो. तेथे श्रमिक घाम गाळतात पण भांडवलदारांच्या हातून त्याचे चीज होत नाही. उलट समाजवादात प्रत्येक श्रमिकाला केवळ श्रमिक म्हणूनच नव्हे तर माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची शाश्वती असते. ऐतखाऊपणाला, ऐषारामाला मज्जाव असल्यामुळे श्रम करण्याच्या प्रवृत्तीकडे सहाजिकच आदराने पाहिले जाते. श्रम शारीरिकच असले पाहिजेत असे नाही. ते मानसिक अथवा बौद्धिकदेखील असू शकतात. पण कसल्याच प्रकारचे श्रम न करता सुखवस्तू जीवन व्यतीत करण्याची सोय समाजवादात नाही. प्रत्येकावर समाजोपयोगी काम करून उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी आहे. एकंदरीत समाजवादाने श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.

**५. त्यागाला प्रतिष्ठा :** त्याग भावी उत्कर्षाचा पाया आहे हे एक अभिजात सत्य आहे. समाजवादाने त्यागभावनेलादेखील प्रतिष्ठा

आणली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य, मालकी हक्क, वारसा इत्यादि गोष्टी सार्वजनिक सुखासाठी व्यक्तीने त्याज्य मानल्या पाहिजेत. नियोजनबद्ध आर्थिक विकासात समाजाने दिलेल्या अग्रक्रमामुळे व्यक्तीच्या सुखाचा नाश झाल्यास व्यक्तीने तो धीरोदात्तपणे सहन करावयाचा असतो. नियोजनाच्या सुरवातीच्या काळात मूलभूत उद्योगांना अग्रक्रम मिळाल्यामुळे ग्राहकोपयोगी वस्तूंचा फार मोठा तुटवडा जाणवतो. देशाची उभारणी करणाऱ्या पिढीला दैनंदिन गरजेच्या सर्व वस्तू मुबलक प्रमाणात मिळत नाहीत हा त्या पिढीने भावी पिढ्यांसाठी केलेला त्यागच म्हटला पाहिजे. समाजवादात व्यक्तिगत वारसा ठेवता येत नसला तरी एक पिढी आपल्या त्यागाच्या सामर्थ्यावर भावी पिढ्यांना संपन्नतेचा वारसा ठेवू शकते, याबाबतीत रशियातील एक विनोद उल्लेखनीय आहे. रशियन अंतरिक्ष-वीर युरी गागारीन पत्नीसह घराबाहेर पडताना, घरी एकट्यानेच बसावे लागणाऱ्या आपल्या छोट्या मुलाची समजूत घालताना अजीजीने म्हणतो, ' हे बघ, तू थोडावेळ घरी बैस. रेशनच्या रांगेत उभी राहून तुझी आई तुला आंघोळीसाठी साबण घेऊन येणार आहे. तेवढ्यात मीही पृथ्वीभोवती एक चक्कर मारून लगेच परत येईन.' तात्पर्य, अंतराळ संशोधनासाठी पुरेशी साधनसामुग्री उपलब्ध करण्यासाठी साबणासारख्या तुलनेने क्षुल्लक ( पण जीवनोपयोगी ) वस्तू अगदी कष्टाने मिळवून आणि संयमाने वापरून जनतेने त्यागमय जीवनाचे आचरण केले. पहिल्या दोन पंचवार्षिक योजना पार पाडल्या जात असताना रशियन ग्राहकाची फार आबाळ झाली. पण त्यामुळेच भावी काळात मजबूत आणि संपन्न रशिया निर्माण होऊ शकला.

**६. उधळपट्टीला आळा :** भांडवलशाहीत स्पर्धा असल्यामुळे उधळपट्टी आणि अतिरिक्त उत्पादन यांचा धोका सतत असतो. समाजवादी रचनेत उत्पादनाची मक्तेदारी समाजाकडे असते. उत्पादन नियोजनबद्ध असते. त्यामुळे साधनसामुग्रीची उधळपट्टी होण्याचा धोका

जवळ जवळ संपल्यासारखाच असतो. दुसरे असे की, समाजवादी अर्थरचना स्थिर असल्यामुळे भांडवलशाहीत मधून मधून उद्भवणाऱ्या अस्थिरतेतून जन्मणाऱ्या बेकारीवाटे मानवी साधनसंपत्तीचा होणारा नाश टळतो. तिसरे असे की, प्राप्तीच्या वाटपात विषमता माफक प्रमाणातच असल्यामुळे भांडवलशाहीत अल्पसंख्य अतिश्रीमंत समाजाच्या चैनीच्या खुळचट गरजा भागविण्यासाठी भौतिक साधनसंपत्तीचा जो प्रचंड व्यय होतो, तो समाजवादात होण्याची शक्यता अगदीच कमी असते. उलट, शिक्षण, आरोग्य याबाबतीतील मुबलक सुखसोईमुळे श्रमिकांची कार्यक्षमता वाढीस लागते.

७ **स्थैर्य आणि सुरक्षितता :** समाजवादी अर्थकारणात मूल्ययंत्रणेच्या लहरी कारभाराला वाव नसतो. तेथे प्रत्येक कार्य नियोजनबद्ध पद्धतीने होते. त्यामुळे अस्थिरता हा भांडवलशाहीचा अंगभूत दोष समाजवादात आढळत नाही. तेजी–मंदीच्या अवस्थांना तोंड देत देत भांडवलशाही जलद आर्थिक प्रगती करते. उलट समाजवादी अर्थकारण संथपणे प्रगती करीत राहते. १९२९ च्या महामंदीचा फटका अमेरिकेसारख्या विकसित अर्थकारणाला खूपच जाणवला. पण रशियासारखे नवोदित समाजवादी राष्ट्र, सर्व जग महामंदीने हैराण झाले असता, त्या अरिष्टापासून अलिप्त राहू शकले. आर्थिक चढउतार नसल्यामुळे समाजवादातील आर्थिक जीवच काहीसे सुरक्षित आहे. श्रमिकांना सामाजिक सुरक्षितेची हमी देणे त्यामुळे सुकर झाले आहे. म्हणून समाजवादी व्यवस्थेत सामाजिक संतोषाचे प्रत्यंतर येते. सर्व समाजाला पुरेपूर संतोष देणारी अर्थरचना हाच निखळ लोकशाहीचा खराखुरा आविष्कार नाही काय ?

## समाजवादाचे दोष :

भांडवलशाहीपेक्षा अधिक सरस अशी समाजरचना करण्याच्या जिद्दीने समाजवादी तत्त्वज्ञान निर्माण झालेले असले तरी त्यावरही टीका

होत आली आहे. मार्क्सवादावरील टीका तर इतकी प्रचंड आहे की तिचा छोटेखानी परामर्ष घेणे अगदीच अशक्य कोटीतील गोष्ट आहे. समाजवादावरील टीका मुख्यतः भांडवलशाहीच्या गोटातून होत असते. टीकेचे काही मुद्दे पुष्कळदा दुर्लक्षणीय असतात. 'समाजवाद आहे फक्त पुस्तकात, व्यवहारात कोठे आहे तो पुस्तकातील समाजवाद?' 'समाजवादाचा ध्यास कोणालाच नाही, सगळे स्वार्थासाठी समाजवादाचा बुरखा पांघरलेले आहेत,' 'भांडवलशाहीत सुधारणा केली की समाजवाद निरुपयोगीच नाही का ठरणार?' इत्यादि स्वरुपाचे समाजवादावरील दोषारोप विचारात घेण्याइतक्या महत्त्वाचे नाहीत. पण समाजवादात मूल्यप्रक्रिया अशक्य आहे, तेथे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो, अधिक काम करण्यासाठी उत्तेजन देणाऱ्या प्रभावी साधनांचा अभाव आढळतो, नोकरशाही थाटाच्या उत्पादनव्यवस्थेमुळे अकार्यक्षमतेचा प्रसार व्हावयास वेळ लागत नाही, समाजवादात मुळातच विसंगती आहे अशा आशयाची टीका ध्यानात घेण्यासारखी असून तिचा अधिक परामर्ष खाली घेतला आहे.

**१. सदोष मूल्यनिश्चिती प्रक्रिया :** पहिल्या महायुद्धानंतर समाजवादी पक्षांना युरोपात सत्तेवर येण्याची संधी मिळाली. त्यानिमित्ताने समाजवादी अर्थरचना भांडवलशाहीपेक्षा कशी अधिक सरस आहे हे दाखवून देण्याचीही नामी संधी त्यांना प्राप्त झाली. पण नेमक्या अशा मोक्याच्या वेळी लुडविग फॉन मायझेस या व्हिएन्ना येथील अर्थपंडिताने 'समाजवाद मूर्त स्वरूपात आणण्याचा प्रयत्न झाल्यास तो अपेशी ठरल्याशिवाय राहणार नाही' असे सडेतोड भाकित करून सर्वत्र खळबळ उडवून दिली. त्यांचे म्हणणे असे : उत्पादनखर्च मोजता येत नसेल तर खरेखुरे अर्थकारण निर्माण करता येत नाही. समाजवादात सर्व उत्पादनसाहित्य समाजाच्या मालकीचे असल्यामुळे त्यांच्या विनिमयाचा प्रश्न उद्भवणार नाही. त्यामुळे त्यांचे पैशातील मूल्य ठरविणे अशक्य

होईल. पैशातील मूल्य अशक्य म्हणून पैशातील उत्पादनखर्च शोधून काढणेदेखील आपोआपच अशक्य होईल. मूल्यनिश्चितीचे होकायंत्र सोबत नसल्यामुळे समाजवादी अर्थकारणाचे तारू उत्पादनसाधनांची जोडणी करण्याच्या विविध शक्यतांच्या महासागरात भरकटून नष्ट होईल यात शंका नाही.

समाजवादी विचारवंतांनी प्रा. मायझेस यांच्या युक्तिवादाचे महत्त्व मान्य केले. त्यास उत्तर देताना एक विख्यात समाजवादी विचारवंत श्री. ओस्कार लांगे म्हणतात, 'आम्ही समाजवादी मंडळींनी प्राध्यापक मायझेस यांच्याविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांनी दिलेल्या दमदार आव्हानामुळे समाजवादी मंडळींना समाजवादी अर्थकारणात साधनसामुग्रीच्या वाटपास मार्गदर्शन करण्यासाठी आर्थिक हिशोबीपणाची पुरेशी तरतूद असण्याचे महत्त्व आम्हाला मान्य करावे लागले.' एवढेच नव्हे तर ते गमतीदारपणे पुढे असेही म्हणतात, 'प्रा. मायझेस यांनी आर्थिक हिशोबीपणाची महत्त्वाची जाणीव करून देऊन बजावलेल्या थोर सेवेची स्मृती तेवत रहावी म्हणून समाजवादी राष्ट्राच्या मध्यवर्ती नियोजन-मंडळाच्या अगर राष्ट्रीयीकरण मंत्रालयाच्या भव्य दालनात प्रा. मायझेस यांच्या पुतळ्याची सन्मानपूर्वक प्रतिष्ठापना होणे अगत्याचे आहे.'[४६] यातील मिस्किलपणाचा भाग सोडला तरी प्रा. मायझेस यांनी समाजवादातील मूल्ययंत्रणा सदोष असते याकडे सर्वांचे प्रभावीपणे लक्ष वेधले यात शंका नाही.

समाजवादी अर्थरचनेत मागणी-पुरवठ्याच्या प्रेरणेमुळे किंमती ठरत नाहीत. त्या नियोजनमंडळाकडून ठरविल्या जातात. त्या ठरविताना उत्पादनखर्चाचा अंदाज घेता येत नाही. कारण उत्पादनासाठी लागणाऱ्या सर्वच वस्तू सरकारच्या असल्यामुळे त्यांच्या देवाणघेवाणीचा व पर्यायाने किंमतीचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे समाजवादात ठरवून दिलेल्या किंमती बहुधा असमर्थनीय असतात. अशाप्रकारच्या आडमाप,

तत्त्वहीन आणि असमर्थनीय मूल्यनिश्चिती योजनेमुळे ग्राहकांचे निवडस्वातंत्र्य आणि श्रमिकांचे व्यवसायस्वातंत्र्य धोक्यात आल्याखेरीज रहात नाही.

२. **व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच** : समाजवादी अर्थरचनेत व्यक्तीला समाजाच्या व्यापक हिताप्रीत्यर्थ आपल्या आवडीनिवडींना मुरड घालावी लागते. नियोजनाने घालून दिलेले अग्रक्रम आणि विकास-कार्यक्रम नेहमीच व्यक्तींना रुचणारे असतात असे नाही. तरीपण सार्व-जनिक हिताची दृष्टी बाळगून त्यांची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त असते. भांडवलशाहीत उपलब्ध असलेले मुक्त स्वातंत्र्य— मग ते ग्राहकाचे असो, व्यवसायाच्या निवडीचे असो अथवा सृजनशीलता-प्रदर्शनाचे असो— समाजवादात तेवढ्या प्रमाणात उपभोगावयास मिळणे कठीणच. पूर्ण साम्यवादाची स्थिती येईपर्यंत राज्यसंस्थेला हुकूमशाही अधिकार असल्या-मुळे त्या काळात व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करणे मुळीच अवघड नसते. अर्थात अशा दडपशाहीचे समर्थन स्वातंत्र्याची व्याख्या बदलून करता येते. समाजाच्या हितासाठी, समाजाला खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचा लाभ व्हावा म्हणून, व्यक्तींना आपल्या खाजगी स्वातंत्र्यावर पाणी सोडावे लागले तर ती सामाजिक स्वातंत्र्याला पोषक अशी घटना आहे, असा युक्तिवाद समाजवादी मंडळी करताना आढळतात.

३. **उत्तेजनाची समस्या** : समाजवादी अर्थव्यवस्थेत सर्वांना समभावाने वागविण्यात येत असल्यामुळे उत्तेजनाची समस्या निर्माण होते. समाजातील सर्वच कामे महत्त्वाची असली तरी समाजवादातदेखील काही कामे कमी महत्त्वाची व काही कामे अधिक महत्त्वाची मानली जातील यात शंका नाही. दोन्ही प्रकारच्या कामांना सारखाच मोबदला असेल तर मानवी स्वभावानुसार अधिक कष्टाच्या अगर गुंतागुंतीच्या कामापेक्षा कमी कार्यक्षमतेचे वा कमी बुद्धिमत्ता लागणारे काम निवडण्या-कडे व्यक्तींची प्रवृत्ती राहील. पंतप्रधान व कारकून या दोघांच्या मोबदल्यात फारसा फरक न ठेवल्यास व्यक्ती पंतप्रधानाऐवजी कारकूनच

बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगण्याची भीती दूर करता येत नाही. काम करण्यास उत्तेजन मिळावे म्हणून रशियातदेखील प्राप्तीतील विषमता काही प्रमाणात टिकवावी लागली आहे. भांडवली अर्थव्यवस्थेत प्राप्तीतील विषमता जेवढ्या प्रमाणांत असू शकते तेवढ्या प्रमाणात ती रशिया-सारख्या देशातदेखील आहे असे मानण्यात भरपूर वाव आहे. स्वीडन-पेक्षा रशियात प्राप्तीतील विषमता अधिक आहे याबाबत स्वीडिश आणि रशियन अर्थपंडितांचे एकमत असल्याचे स्टॉकहोम स्कूल ऑफ इकॉनॉ-मिक्समधील एका परिसंवादात दिसून आले.[४७] उत्तेजनाच्या प्रपंचातून रशियासारख्या समतावादी देशातदेखील 'सामाजिक-आर्थिक बाबींवर आधारलेला पिरॅमिड' आहे. या पिरॅमिडच्या शिखरावर अत्युच्च पातळी-वरील निर्णय घेणारे पक्ष-पदाधिकारी विराजमान झाले आहेत. त्या खालोखाल वैज्ञानिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील उच्चभ्रूंचा क्रमांक लागतो. पिरॅमिडच्या तळालगत नोकरशाही व दुय्यम दर्जाचे पक्ष कार्यकर्ते आहेत. त्या खाली व्यवस्थापक, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक हा वर्ग मोडतो. शेवटी रशियन समाजाचा विस्तृत तळ सर्वसामान्य शेतकरी आणि कामगार यांनी बनलेला आहे.

थोडक्यात म्हणजे आर्थिक व सामाजिक समतेला फार जपल्यास उत्तेजनाची समस्या निर्माण होते आणि उत्तेजनाची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केल्यास समतेच्या कल्पना स्थूल कराव्या लागतात. नफा आणि पैसा यांचे स्तोम नसल्यामुळे या मार्गाने व्यक्तींना कार्यप्रवण करण्याचा प्रश्न समाजवादात येत नाही. समाजवादात मुख्यत: आर्थिक आणि अन्य स्वरुपाची आमिषे दाखवून श्रमिकांना अथवा सर्वांना काम करण्यास अधिक उत्तेजन देता येते. भांडवलशाहीत तरी सर्वजण पैशाच्या लोभानेच कार्यप्रवण होतात असे कोठे आहे? अमेरिकेच्या अध्यक्षांना एक लाख डॉलर्सचा वार्षिक पगार आहे. राष्ट्रपतीपदाच्या लढतीत अनेकांना खेचण्यासाठी हे उत्तेजन पुरेसे आहे काय? रॉबर्ट मॅक्नामारा यांनी

वार्षिक दीड लाख डॉलर्स (करपश्चात) पगाराची खाजगी नोकरी सोडली व ते वार्षिक पंचवीस हजार डॉलर्स पगारावर केनेडी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री झाले असे म्हणतात. भांडवलशाहीत ज्याप्रमाणे पैशाचे आमिष नसतानादेखील शासकीय कार्यासाठी कर्तबगार माणसे उपलब्ध होऊ शकतात, त्याप्रमाणे समाजवादातदेखील सुरक्षितता आणि उत्कर्ष यांचे आमिष दाखवून उत्तेजनाची समस्या थोडीफार सोडविता येते. पण भांडवलशाहीतून समाजवादाकडे स्थित्यंतर होत असतानाच्या काळात उत्तेजनाची समस्या बहुधा गंभीर स्वरूप धारण करत असते.

**४. नोकरशाही :** आर्थिक जीवनाला नोकरशाहीची कळा येणे हा समाजवादातील खरा धोका आहे असे विख्यात समाजवादी विचारवंत ओस्कार लांगे यांनी म्हटले आहे.[४८] उत्पादनाची सर्व क्षेत्रे समाजाच्या मालकीची झाल्यानंतर उद्योगपतीची सर्व कार्ये नोकरशहा-व्यवस्थापका-मार्फत होऊ लागतील. कर्तव्यतत्परता, कार्यक्षमता याबाबतची सुकीर्ती नोकरशाहीला अजून मिळवावयाची आहे. ती मिळविताना त्यांना अपार-कष्ट पडतील यात शंका नाही. केवळ कायदा आणि सुव्यवस्था याविषयीच्या नित्यनैमित्यिक जबाबदाऱ्या पार पाडतानादेखील पदोपदी अपयशी ठरणाऱ्या नोकरशाहीला उत्पादन कार्याचे नित्यनूतन, कल्पनारम्य आणि निर्णयव्यवहारांनी बहरलेले विश्व मानवेल का, अशी शंका आल्यास ती अगदी रास्त आहे. भारताच्या सार्वजनिक क्षेत्रात नोकरशहांनी आपल्या धसमुसळेपणाने आर्थिक विकासाचे लगाम कसे खेचून ठेवले याची कित्येक उदाहरणे शोधता येतील. अर्थात नोकरशहांची अकार्यक्षमता केवळ सरकारी क्षेत्रातच असते असे नाही. स्पर्धामय भांडवलशाहीतील उद्योगपती अथवा त्याचे अंमलदार खूप कार्यक्षम असतात हे खरे. पण मक्तेदारीमय भांडवलशाहीत जेव्हा सुस्त औद्योगिक साम्राज्यांची पैदास होत असते तेव्हा जगड्व्याळ कार्पोरेशनमधील व्यवस्थापक सरकारी नोकरीतील अंमलदारांइतकेच अकार्यक्षम असू शकतात. म्हणजे

नोकरशाही नियंत्रणाचा धोका एकट्या समाजवादी अर्थव्यवस्थेला नाही. मक्तेदारीमय भांडवलशाहीलाही आहे. तरीपण त्यातून काहीतरी व्यवहार्य मार्ग निघणे आवश्यक आहे.

**५. विसंगती :** साधनसंपत्तीचे वाटप करताना मूल्याविषयी एक निकष लावायचा आणि श्रमिकाला मोबदला देताना दुसरा निकष लावावयाचा यात विसंगती आहे. भांडवलशाहीचा सरस पर्याय म्हणून समाजवादाचा उदय झाला आहे. तेव्हा समाजवादाने आपला सरसपणा पटविला पाहिजे. समाजवादात सार्वजनिक उद्दिष्टे अथवा ध्येये अगोदर ठरतात. ती गाठता यावीत अशा प्रकारे मूल्यनिश्चितीचे कार्य जाणून-बुजून पार पाडले जाते. पण समाजवादातील ध्येये गाठण्यासाठी हा धोपट मार्ग अवलंबूनदेखील व्यक्तिस्वातंत्र्य संकुचित केल्याखेरीज ध्येयपूर्ती होत नाही. सार्वजनिक मालकी, नियोजन आणि व्यक्तिस्वातंत्र्य एकमेकाशी सुसंगत आहे असा कितीही दावा केला तरी तो फोल आहे. व्यक्तिस्वातंत्र्य अनेकांना अतिप्रिय आहे. ते अबाधित ठेवून समाजवाद पूर्णार्थाने साकार करण्याची किमया अजून तरी साधलेली नाही.

## समाजवादाचे भवितव्य

समाजवादाचे भवितव्य उज्ज्वल आहे यात शंका नाही. समाजवादी राष्ट्रांची संख्या वाढली असून समाजवादाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. बहुतेक नवजात राष्ट्रांना समाजवादाशिवाय तरणोपाय नाही असे वाटते.

आर्थिक दृष्टिकोणातून समाजवाद व्यवहार्य नाही असे दोन महायुद्धामधील काळात मानले जात असे. भांडवलशाही विरुद्ध समाजवाद या वादामध्ये त्या काळी श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची जबाबदारी समाजवादाचे समर्थन करणारांची आहे असे मानले जाई. पण टेलर, लांगे, डिकिन्सन,

लर्नर, स्वीझी, हेनमान इत्यादि अर्थपंडितांच्या समाजवादाच्या पुरस्कारावरील प्रभावी लिखाणामुळे भांडवलशाहीच्या जागी समाजवाद का येऊ नये हे सिद्ध करण्याची जबाबदारी आता भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांवर येऊन पडली आहे. लांगे यांच्या मते समाजवाद भांडवलशाहीपेक्षा दोन बाबतीत सरस आहे.[४९] एक म्हणजे, स्पर्धामय अर्थकारणात उचित समतोल-किंमती निर्माण होण्यास कराव्या लागणाऱ्या चांचण्यापेक्षा कमी चांचण्यात सदर किंमती समाजवादात निश्चित होतात. उदाहरणार्थ, मुकलेल्या आणि मिळविलेल्या उत्पादनाचे सर्व पर्याय समाजवादात लक्षात घेता येतात. आयुष्य, सुरक्षितता, आरोग्य इत्यादि गोष्टींवर पाणी सोडून जेव्हा भांडवलशाहीत उत्पादन होते तेव्हा या मुकलेल्या गोष्टींचा हिशोब होत नसतो. समाजवादात मात्र नियोजन मंडळाला अर्थकारणाचे तपशीलवार ज्ञान असल्यामुळे या सर्व गोष्टी विचारात घेऊन उत्पादनाची इष्टानिष्टता ठरविता येते. दुसरे असे की भांडवलशाहीतील प्राप्ती-वाटपविषयक परिस्थितीपेक्षा समाजवादातील सदर परिस्थिती अधिक समाधानकारक असते.

समाजवादी विचारात स्थित्यंतरे फार झपाट्याने घडत आहेत. चैतन्य टिकविण्यास ही स्थित्यंतरे उपयुक्त आहेत. समाजवादातील पोथीनिष्ठता कमी होत असून बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात समाजवादी विचारात नवा आशय भरला जात आहे. दारिद्र्य आणि गुलामगिरी यांच्याविरुद्ध लढा देण्यासाठी समाजवाद आहे असे ब्रिटनमध्ये श्री. जी. डी. एच्. कोल म्हणत. आता त्या दोन गोष्टी ब्रिटनमध्ये संपुष्टात आल्यासारख्या आहेत. म्हणून 'समाजवादाला काही प्रयोजन उरले आहे काय?' अशासारख्या प्रश्नांच्याद्वारे ब्रिटिश समाजवादी मंडळी आत्मशोधन करीत आहेत.[५०] आता ब्रिटनमध्ये समाजवादी कार्यक्रमात शैक्षणिक सुधारणा आणि ग्राहक-वस्तूंचे वैपुल्य या उद्दिष्टांना विशेष प्राधान्य देण्यात येत आहे.[५१] राष्ट्रीयीकरण आणि राज्यसत्तेद्वारा

नियोजन याविषयींचा पूर्वीचा उत्साह तेथे कमी झाला असून अनुभवान्ती सामाजिक कल्याण आणि सामाजिक समता यांना प्राधान्य मिळू लागले आहे. 'दारिद्याचे आव्हान संपुष्टात आले असले तरी आर्थिक चैतन्यहीनता, आर्थिक जीवनातील विरोधाभास, अयोग्य सामाजिक मूल्यांचा आणि नीतिशून्य उद्दिष्टांचा राष्ट्रीय जीवनातील उदय यामुळे ब्रिटिश समाजवादाला नवे आव्हान मिळाले आहे' असे श्री. हॅरॉल्ड विल्सन यांना वाटते.[५२] समाजवादी विचाराची भावी दिशा कशी बदलत आहे हे दाखविण्यासाठी नमुन्यादाखल ब्रिटिश समाजवादी विचारातील ही एक दोन स्थित्यंतरे दर्शविली आहेत.

भारतात समाजवाद हा परवलीचा शब्द बनला आहे. येथे प्रत्येक-जण समाजवादाच्या दिंडीत घुसण्यासाठी आसुसलेला आहे. त्यामुळे बऱ्याच कर्त्या समाजवाद्यांना समाजवादी विचाराच्या उत्क्रांतीचा गंधही नाही. मूर्ख, व्यासंगशून्य, संधिसाधू आणि निष्ठारहित असे लोक जर आपणाला समाजवादी म्हणवून घेण्यात दीर्घकाळ यशस्वी झाले तर ते भारतीय समाजवादी चळवळीची जेवढी हानी करू शकतील तेवढी हानी इतर कोणी करू शकणार नाहीत. म्हणून निकोप समाजवादी विचाराचा प्रसार करण्याची आज भारतात नितान्त गरज आहे.

# टीपा

१. **लाउक्स : *कंपॅरीटिव्ह इकॉनॉमिक सिस्टीम्स*,** हार्पर इंटरनॅशनल, न्यू यॉर्क, सहावी आवृत्ती, १९६१, पृ. ५.

२. अर्थव्यवस्थांची वर्गवारी करण्याची ही पद्धत परंपरागत आहे. अलीकडे वर्गवारी अधिक चिकित्सकतेनें व पुष्कळदा अर्थव्यवस्थांची रूढ नावे टाळून केली जाते. उदाहरणार्थ, कंपॅरिटिव्ह इकॉनॉमिक सिस्टीम्स या अगदी अलीकडे ( म्हणजे १९७१ साली ) प्रसिद्ध झालेल्या शिनत्झर आणि नॉर्दायके यांच्या पुस्तकात 'अमेरिकन मॉडिफाइड मार्केट इकॉनॉमी,' मिक्स्ड इकॉनॉमीज् ऑफ द मिडल वे' आणि 'इकॉनॉमीज् ऑफ मॉडिफाइड सेंट्रल कमांड' असे शब्दसमूह वापरले आहेत. जॉर्ज हाम् यांनी आपल्या 'इकॉनॉमिक सिस्टीम्स; कंपॅरिटिव्ह ॲनालिझिस' या ग्रंथात समाजवाद असा प्रकार न कल्पिता लिबरल सोशॅलिझम व इकॉनॉमिक्स ऑफ सेंट्रल प्लॅनिंग असे दोन स्वतंत्र प्रकार पाडलेले आहेत. याखेरीज अमेरिकन भांडवलशाही,'युगोस्लाव्ह समाजवाद असे देशपरत्वे प्रकार पडतात ते वेगळेच.

३. राज कपूरच्या 'जिस देशमे गंगा बहती है' या लोकप्रिय झालेल्या चित्रपटातील भोळचा राजूला दरोडेखोरांचा म्होरक्या भेटतो, त्यावेळचा संवाद :
राजू : आप क्या करते हो ?
दरोडेखोर : अमीरों की दौलत ले के गरीबों को बाँटता हूँ ।
राजू : याने की आप चोचॅलिस्ट ( सोशॅलिस्ट ) हो ?

४. कम्युनिस्टांचे भांडवलशाहीवरील लिखाण तसेच 'जॉन बुल' भांडवलदारांचे समाजवादावरील लिखाण कधी कधी अशा थराला जाते की पूर्वग्रह दूर ठेवणे अशक्य आहे, निदान फार अवघड आहे हे पटावे.

५. **लाउक्स** : पूर्वोक्त पृ. १७.

६. अमेरिकेसारख्या कट्टर भांडवलशाही देशात मक्तेदारी अथवा संयोगीकरण यांच्याविरुद्ध आवाज उठविण्यास एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थांतच प्रारंभ झाला. मक्तेदारीवरील उतारा म्हणून हेन्री जॉर्ज यांनी १८७९ साली प्रसिद्ध केलेल्या प्रोग्रेस अँड पॉव्हर्टी या ग्रंथात 'एकमेव कर'

पद्धतीची शिफारस केली. एडवर्ड बेलामी यांच्या 'लुकिंग बॅकवर्ड' (१८८७) आणि एच्. डी. लॉइड्स् यांच्या 'वेल्थ अगेन्स्ट कॉमनवेल्थ' (१८९४) या ग्रंथातदेखील ट्रस्ट संघटनांविरुद्ध तोफा डागण्यात आल्या. १८८८ च्या सुमारास अमेरिकेतील सर्व मोठ्या राजकीय पक्षांनी मक्तेदारी-नियंत्रणाचा विषय आपल्या कार्यक्रमांत समाविष्ट केला. १८९० च्या अखेरीस अमेरिकेतील २७ संस्थानात व प्रादेशिक विभागात मक्तेदाऱ्यांचा नाश करणारे वा त्याना प्रतिबंध करणारे कायदे संमत झाले होते तर १५ संस्थानांनी आपल्या घटनामध्ये वरील हेतूसाठी तरतूद करून ठेवली होती. तरीदेखील १८९० साली फेडरल सरकारने मक्तेदारी नियंत्रणाचा कायदा करावा अशी जोरदार मागणी होऊ लागली. डिसेंबर १८८९ च्या प्रेसिडेंट हॅरिसन यांच्या संदेशात मक्तेदारीविषयक कायद्याची निकड प्रतिपादली आहे. १८९० साली प्रसिद्ध शेरमन अॅन्टी ट्रस्ट अॅक्ट संमत झाला. पाहा : **एच. यू. फॉकनेर** : ***अमेरिकन इकॉनॉमिक हिस्टरी*** (आठवी आवृत्ती) १९६७, युनिव्हर्सल बुक स्टॉल, दिल्ली. पृ. ४३७–३८.

७ अगदी अलीकडे म्हणजे १९६५ नंतर रशियासारख्या समाजवादी अर्थकारणातदेखील नफ्याविषयी पूर्वीइतक्या तिटकाऱ्याने बोलले जात नाही. उलट नफ्याविषयी एक नवी आस्था रशियात निर्माण झाली आहे असे म्हटले तरी चालेल. भांडवलशाही नफा आणि समाजवादी नफा असे वर्गीकरण करून समाजवादी नफ्याबाबत आस्था दाखविण्याचे धोरण १९६५ नंतर विशेष प्रसिद्धीस आले. अधिक माहितीसाठी पाहा : **लिबरमन, डॉब आणि इतर**, ***थिअरी ऑफ प्रॉफिट इन् सोशॅलिस्ट इकॉनॉमी***, पीपल्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९६६, पृ ९–२०.

८. **जे. फ्रेडरिक ड्यूहर्स्ट अँड असोसिएट्स्** : ***अमेरिकाज् नीड्स् अँड रिसोर्सेस : ए न्यू सर्व्हे***, ट्वेंटिएथ सेंचुरी फंड, न्यूयॉर्क १९५५, पृ. १९७३ आणि इकॉनॉमिक रिपोर्ट ऑफ दि प्रेसिडेंट, १९६०, पृ. १८५.

९. प्रा. जे. के. गॅल्ब्रेथ यांचे मत भिन्न आहे. त्यांच्या मतानुसार निदान महामंदीच्या काळात व तत्पूर्वी प्राप्तीच्या वाटपाची परिस्थिती असमाधानकारक होती. पाहा : जे. के. **गॅल्ब्रेथ**, ***दि ग्रेट डिप्रेशन–१९२९*** हॅमिश हॅमिल्टन, लंडन, १९५५ पृ. १५९.

१०. डिपार्टमेंट स्टोअरची इमारत प्रशस्त आठ मजली असणे ही अमेरिकेत अगदी नित्याची गोष्ट झाली आहे. पाहा. **केली आणि ब्रिस्को** : ***रिटेलिंग-बेसिक प्रिन्सिपल्स***, तिसरी आवृत्ती, प्रेंटिस–हॉल, एन्जलवूड क्लिफ्, न्यू जर्सी, १९५७. पृ. १६९–७०.

११. **ड्यूहर्स्ट अँण्ड असोसिएट्स्** : पूर्वोक्त पृ. १११६ वरील माहितीवर आधारित.

१२. **लाउक्स** : पूर्वोक्त, पृ. ५८ वरील कोष्टकावर आधारित.

१३. ***कॉपिटिशन ॲण्ड मोनोपॉली इन् अमेरिकन इंडस्ट्री***, मोनोग्राफ नं. २१, गव्हर्मेंट प्रिंटिंग ऑफिस, वॉशिंग्टन, १९४०.

१४. **लाउक्स** : पूर्वोक्त पृ. ६४.

१५. नॅशनल इंडस्ट्रियल कॉन्फरन्स बोर्डचा अंदाज, ७ मार्च १९६० च्या न्यूयॉर्क टाइम्समधील वृत्तानुसार.

१६. **ओवेन** : रॉबर्ट ओवेन ( १७७१–१८५८ ) इंग्रज अर्थशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक. सहकारी चळवळीचे जनक. वेल्श कारागिराचे पुत्र. कारखान्यात उमेदवारी केल्यावर सूत कातणारे तंत्रज्ञ झाले. लौकरच व्यवसायात प्रगती करून न्यू लॅनार्क मिलचे मालक झाले. तेथे त्यांनी तांत्रिक व कामगारविषयक सुधारणा करण्यात पुढाकार घेतला. त्यात अपयश आले. पण त्याला न जुमानता अखेरपर्यंत सार्वत्रिक शिक्षण, कामगार–कल्याण आणि सहकार यांचा पुरस्कार केला. अमेरिकेच्या इंडियाना संस्थानात त्यांनी ' न्यू हार्मनी ' या नावाची वसाहत सहकारी पद्धतीवर स्थापली. त्यांचे महत्त्वाचे लेखन ' ए न्यू व्ह्यू ऑफ सोसायटी ॲण्ड अदर रायटिंग्ज ' या नावाखाली उपलब्ध आहे. त्याचे प्रा. जी. डी. एच्. कोल यांनी संपादन केले असून त्यांनीच ओवेन यांचे विस्तृत चरित्रही लिहिले आहे.

१७. **मार्क्स** : हेन्रीश कार्ल मार्क्स, ( १८१८–१८८३ ). कार्ल मार्क्स याच नावाने प्रसिद्ध. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजवादी चळवळीचा पाया घातला. वडील जर्मन ज्यू होते. पुढे त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. तत्त्वज्ञान व इतिहास या विषयांची गोडी वडिलांच्यामुळेच लागली. विद्यापीठात प्राध्यापक होण्याचा विचार होता. पण प्रक्षोभक विचारामुळे प्राध्यापक होता आले नाही. म्हणून पत्रकार झाले. सरकारी रोषास पात्र झालेल्या ' ऱ्हाइनिश झीटंग ' या पत्राचे संपादन केले. त्यामुळे फ्रान्सला पळून जावे लागले. पॅरिसघून प्रक्षोभक लिखाण प्रसिद्ध केल्याबद्दल प्रशियन सरकारने फ्रान्स सरकारकडे तक्रार केल्यामुळे फ्रान्स सोडावे लागले. बेल्जममध्ये काही दिवस काढून ते जर्मनीला परतले. बऱ्याच राजकीय उलाढाली केल्यानंतर लंडन शहरात कायमच्या वास्तव्यासाठी आले. तेथील ब्रिटिश म्यूझियममध्ये दीर्घकाळ संशोधन करून दास कॅपिटल हा जगद्विख्यात ग्रंथ लिहिला. त्याचा बराचसा भाग त्यांचे जीवश्चकंठश्च मित्र

फ्रेडरिक एन्गल्स यांनी त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध केला. मार्क्स हे शास्त्रीय समाजवादाचे जनक असून त्यांनी आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीत मोलाची कामगिरी बजावली.

१८. **वेब्लेन :** अमेरिकेतील संस्थात्मक अर्थशास्त्राच्या विकासाशी थॉर्स्टिन वेब्लेन यांचे नाव कायमचे निगडित झाले आहे. १८५७ साली अमेरिकेत स्थलांतरित नॉर्वेजियनाच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. विक्षिप्त व्यक्तिमत्व आणि जगरहाटीशी न जुळणारे विचार यामुळे त्याचे आयुष्य जरा धकाधकीचे गेले. त्यांनी अकरा गाजलेले ग्रंथ आणि कित्येक निबंध लिहिले. परंपरागत अर्थशास्त्र आणि त्या अर्थशास्त्राभोवती असलेल्या सामाजिक संस्था यांना त्यांनी आपल्या साक्षेपी प्रज्ञेचा निकष लावून ग्रंथनिर्मिती केली. विचार आणि कृतीविषयीचे रूढ संकेत यांचा समूह म्हणजे संस्था अशी त्यांची व्याख्या होती. त्यांचे विशेष प्रसिद्ध असलेले ग्रंथ दि थिअरी ऑफ दि लीझर क्लास ( १८९९ ), दि थिअरी ऑफ बिजनेस एन्टरप्राइझ ( १९०४ ), दि इन्स्टिंक्ट ऑफ वर्कमनशिप ( १९१४ ), दि इंजिनिअर्स अँड दि प्राइस सिस्टीम (१९२१) आणि ॲब्सेन्टी ओनरशिप (१९२३) हे होत. त्यांचे निबंध तीन खंडात संग्रहित करण्यात आलेले आहेत. १९३४ साली जोसेफ डॉर्फमन यांनी 'थॉर्स्टिन वेब्लेन अँड हिज अमेरिका' या नावाने त्यांचे चरित्र प्रसिद्ध केले. मॅक्स लर्नर यांनी १९४८ साली 'पोर्टेबल वेब्लेन' या शीर्षकाखाली त्यांचे निवडक लेखन संपादित केले. उत्तरायुष्यात वेब्लेन यांना त्यांच्या माजी विद्यार्थ्यांच्या मदतीवर अवलंबून रहावे लागले. या मदत करणाऱ्या हितचिंतकात मिचेल, जे. लॉरेन्स लगलिन, चिकागो विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे संस्थापक हर्बर्ट जे. डेव्हनपोर्ट ही उल्लेखनीय नावे आहेत. वेब्लेन १९२९ साली निधन पावले.

१९. **केन्स :** जॉन मेनार्ड केन्स ( पुढे लॉर्ड केन्स ) यांचा ५ जून १८८३ रोजी जन्म झाला. केम्ब्रिज विद्यापीठातील अर्थशास्त्र व तर्कशास्त्राचे प्राध्यापक जॉन नेविल केन्स यांचे ते चिरंजीव. जॉन मेनार्ड इटन, किंग्ज कॉलेज ( केम्ब्रिज ) येथे शिकले. विख्यात अर्थशास्त्रज्ञ आल्फ्रेड मार्शल यांना गुरुस्थानी मानत. गणितात ट्रायपॉस घेऊन ते बाराव्या क्रमांकाने रँग्लर झाले. १९०६ साली सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देऊन इंडिया ऑफिसमध्ये सनदी नोकरीस प्रारंभ केला. पुढे फेलोशिप मिळवून अध्यापनासाठी केम्ब्रिजला आले. तेथे ते वित्त हा विषय शिकवीत. हिंदुस्थानच्या चलनव्यवस्थेची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चेंबरलेन कमिशनचे तसेच मॅक्मिलन समितीचे ते सदस्य होते. पॅरिस शांतता परिषदेस

गेलेल्या ( १९१८–१९ ) ब्रिटिश शिष्टमंडळाचे सदस्य होते. पुढे बँक ऑफ इंग्लंडचे संचालक व टिल्टनची सरदारकी मिळाल्यामुळे हाऊस ऑफ लॉर्डस्‌चे सदस्य झाले. १९१३ ते १९४० या काळात तेरा ग्रंथ लिहिले. १९३६ साली प्रसिद्ध केलेल्या 'दि जनरल थिअरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी' या ग्रंथामुळे ते अर्थशास्त्रात अमर झाले. जुलै १९४४ मध्ये ब्रेटनवूड्स् परिषदेत केन्स-योजना मांडून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांच्या निर्मितीस हातभार लावला. १९४५ साली वरील संस्थांचे गव्हर्नर झाले. २१ एप्रिल १९४६ रोजी निधन पावले. १९१२ पासून इकॉनॉमिक जर्नलचे संपादक होते. १९२५ साली लिडिया लोपोकोवा या रशियन नर्तिकेशी विवाह केला. केन्स लिटन स्ट्रॅचो आणि व्हर्जिनिया वूल्फ यांचे मिळून 'ब्लूम्सबरी' नावाचे साहित्यमंडळ होते. केन्सप्रणीता अर्थशास्त्राचे जनक. विसाव्या शतकातील एक शेलके प्रज्ञावंत.

२०. **शुंपिटर** : जोसेफ ए. शुंपिटर यांचा जन्म १८८३ साली व मृत्यू १९५० साली झाला. व्हिएन्ना येथे शिक्षण. बोमबावर्क यांचे विद्यार्थी. १९३० नंतरच्या काळात युरोपातील प्राध्यापकाचा पेशा सोडून अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी गेले. १९३२ पासून मृत्यूपर्यंत हार्वर्ड विद्यापीठात अध्यापन केले. १९४८ साली अमेरिकन इकॉनॉमिक अॅसोसिएशनचे अध्यक्ष झाले. परदेशी अर्थपंडिताला हा मान मिळण्याचा अमेरिकेतील तो पहिलाच प्रसंग. आपल्या अर्थशास्त्रीय लेखनात शुंपिटर यांनी भांडवलशाहीतील अर्थव्यवहारांना केंद्रस्थानी कल्पिले आहे. या पद्धतीत संयोजकाला मोक्याचे स्थान मिळालेले असून त्याच्या नावीन्य–निर्मितीमुळे आर्थिक विकास होत असतो हे त्यांच्या लेखनाचे मुख्य सूत्र आहे. त्यांच्या व्यापारचक्राविषयीच्या सिद्धान्तातही नावीन्य-निर्मिती व्यवहारांना महत्त्वाचे स्थान आहे. भांडवलशाहीतील संस्थात्मक सृष्टीवर त्यांचे मन जडलेले होते. भांडवलशाही विरोधी वृत्तीबद्दल ते नेहमी भय व्यक्त करीत. भांडवलशाहीच्या यशातूनही भांडवलशाहीविरोधी विचार उद्भवेल असे त्यांचे मत होते. ते सिद्धहस्त लेखक होते. आर्थिक विचारांचा विकास हे त्यांचे व्यासंगाचे आवडते क्षेत्र होते. त्यांनी इतर अर्थपंडितांविषयी सुंदर लेख लिहिलेले आहेत.

२१. पाहा : **डॉब, मॉरिस** : ***ऑन इकॉनॉमिक थिअरी ऑफ सोशॅलिझम***, रूटलेज अँड केगन पाल, लंडन, १९५५ पृ. २०१.

सदर ग्रंथातील 'ए लेक्चर ऑन मार्क्स' या प्रकरणात श्री. डॉब यांनी मार्क्सवादावर टीका करणारे एक विख्यात अमेरिकन अर्थपंडित

श्री. लिऑटिफ यांचा उतारा उल्लेखित केला असून त्यांत त्यांनी 'मार्क्स यांचे मांडवलशाहीतील सुदीर्घ प्रवृत्तीविषयीचे विश्लेषण प्रज्ञासंपन्न आहे' असे म्हटले आहे.

२२. **वेब्लेन, थॉर्स्टिन :** *थिअरी ऑफ बिजनेस एन्टरप्राइझ*, स्क्राइबनर्स, पृ. ३१६.

२३. **लेकाशमन :** *ए हिस्टरी ऑफ इकॉनॉमिक आयाडियाज* हार्पर अँड रो, न्यूयार्क, १९६४ पृ. ३५०.

२४. **शुंपिटर, जोसेफ ए. :** *कॅपिटॅलिझम सोशॅलिझम अँड डेमॉक्रसी*, हार्पर, १९५० पृ. ६१.

२५. **सेंट सायमन :** ( १७६०–१८२५ ) फ्रेंच समाजवादाचा जनक. थोर घराण्यात जन्म पण प्रागतिक विचारामुळे घराशी असलेला संबंध तोडावा लागला. स्वातंत्र्य–लढयात अमेरिकन वसाहतींना अप्रत्यक्ष मदत केली. फ्रेंच राज्यक्रान्तीच्या काळात उमराव असल्याच्या वहिमावरून तुरूंगवास पत्करावा लागला. या काळातील आर्थिक परिस्थितीचा फायदा घेऊन काही लाभ मिळविला. त्याचा विनियोग केवळ मानवी हितासाठीच करण्याचा निश्चय केला. पण मानवी हिताच्या योजना भंपकपणे आखल्याबद्दल सगळी मालमत्ता गमावून बसावे लागले. त्यामुळे दारिद्र्य आले. दारिद्र्य आणि निराशा यांना कटाळून आत्महत्या करण्याचाही एकदा प्रयत्न केला. त्यांच्या जवळ असलेल्या मानवी हिताबाबतच्या तळमळीला जरी प्रतिसाद मिळाला नाही तरी कोंटसारख्या समाजशास्त्रज्ञामार्फत त्यांचा प्रभाव जाणवला.

२६. **फूर्ये, चार्लस् :** ( १७७२–१८३७ ) :— अनेक समाजवादी प्रयोग हाती घेतलेले फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ. वडील श्रीमंत व्यापारी होते. त्यामुळे चांगले शिक्षण घेता आले. वडिलार्जित संपत्ती मिळाली. पण फ्रेंच राज्यक्रांतीच्या धुमश्चक्रीत ती गमवावी लागली. थोडा काळ सैन्यात नोकरी केल्यावर ते धंद्यात शिरले. एका छोटचा धंद्यात जम बसल्यावर आपल्या समाजवादी तत्त्वज्ञानाच्या व्यासंगाकडे लक्ष पुरविण्यास त्यांनी प्रारंभ केला. त्यांनी पुष्कळ पुस्तके लिहिली. पण ली नोवो मॉंडे इंडस्ट्रिएल या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर त्यांना बरीच प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या समाजवादाविषयीच्या कल्पना स्वप्नाळूपणाच्या होत्या. शास्त्रीय समाजवादाच्या उदयानंतर त्या प्रभावी ठरेनाशा झाल्या.

२७. **सिस्मॉंडी :** जीन चार्लस लिओनार्ड डी सिस्मॉंडी यांचा जन्म स्वित्झलंड-मध्ये जिनिव्हा येथे १७७३ साली झाला. पूर्वज स्वित्झलंडमध्ये रहावयास

आलेले फ्रेंच. शिक्षणानंतर सिस्माँडी यांनी बँकेत कारकुनाची नोकरी पत्करली. फ्रेंच राज्यक्रांतीचे कारण घडून त्यांच्या कुटुंबाला इंग्लंडला पळून जावे लागले. परतल्यावर मालमत्ता जप्त झाल्याचे आढळले. हाती लागले ते विकून इटलीत थोडी शेतजमीन घेतली. इंग्लंडमधील वास्तव्यामुळे तसेच ऐतिहासिक लेखनामुळे निर्हस्तक्षेपनीतीवरील त्यांचा विश्वास उडू लागला. एडिंबरा एन्सायक्लोपीडियासाठी अर्थशास्त्रावरील नोंदी लिहिल्या. सामाजिक हितासाठी सरकारने आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करणे आवश्यक आहे असे त्यांनी आपल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथात प्रतिपादले. जिनिव्हाला स्थाईक होऊन त्यांनी स्थानिक राजकारणात भाग घेतला. सामाजिक सुधारणाबाबत निराशा झाल्यामुळे उत्तरायुष्यात ते काहीसे प्रतिगामी बनले. नंतरच्या कालखंडात अर्थशास्त्रात जे निरनिराळे वाद निर्माण झाले त्या सर्वांचा आरंभ सिस्माँडी यांच्या अर्थशास्त्रीय लेखनात आढळून येतो.

२८. **प्रूधाँ** : पिएर जोसेफ प्रूधाँ. जन्म १८०९. फ्रान्समधील समाजवादी चळचळवळीचे अविस्मरणीय नेते. राज्यसंस्थेला विरोध केल्याबद्दल त्यांची गणना अराजकवाद्यात केली जाते. लहानपणी आर्थिक ओढाताणीमुळे गुराख्याचे काम करावे लागले. बेसांगो या रहात्या गावी असलेल्या विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी केवळ बुद्धिचापल्य दाखविल्यामुळे मिळाली. शिक्षण संपल्यावर एका छापखान्यात जुळाऱ्याची नोकरी धरली. पण फावल्या वेळात निबंधलेखन करण्याचा उद्योग चालू ठेवला. त्यांच्या लेखनामुळे त्यांना तीन वर्षांसाठी एक शिष्यवृत्ती मिळाली. खाजगी मालमत्तेच्या हक्कावर प्रखर टीका केल्याबद्दल शिष्यवृत्ती देणाऱ्या अॅकेडमीची त्यांच्यावर नाराजी झाली. पण जागतिक विचारवंत म्हणून त्यांची कीर्ती पसरण्यासही या गोष्टीची मदत झाली. अखेर ते पॅरिसमध्ये वास्तव्यासाठी आले. कामगार चळवळ आणि समाजवाद यांना वाहिलेल्या नियतकालिकांचे संपादन करण्याचे काम त्यांनी पत्करले. १८४८ च्या क्रांतीनंतर लोकप्रतिनिधी म्हणून असेंब्लीमध्ये त्यांचा प्रवेश झाला. समाजवादी कार्यक्रमाचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. व्याज आणि खंड यावर भरमसाठ कर लादण्याच्या कल्पना मांडल्या. जनता बँक स्थापन करण्याचा त्यांचा प्रयत्न फसला. त्यांच्या प्रक्षोभक विचाराबद्दल त्यांना तुरुंगात जावे लागले. पण नंतरचे आयुष्य जरा शांतपणे जाते तोच त्यांनी चर्चसंस्थांच्या प्रतिगामीपणावर हल्ला करणारे पुस्तक लिहिले. त्यामुळे बरीच खळबळ उडाली. बेल्जमला पळून जाणे भाग पडले. तेथून परतल्यावर प्रकृती बिघडली व लगेचच अंत झाला. ( १८६५ )

२९. ब्लँक : लुई ब्लँक यांचा जन्म १८११ साली व मृत्यू १८८२ साली. फ्रेंच राजकारणी, इतिहासकार आणि समाजवादी अर्थशास्त्रज्ञ. फ्रेंच मुत्सद्द्याचा मुलगा. पण गृहकलामुळे स्वतःच्या हिमतीवरच शिक्षण घ्यावे लागले. 'ऑर्गनायझेशन ऑफ लेबर' या प्रसिद्ध ग्रंथात त्यांचे समाजवादी विचार व्यक्त झाले आहेत. इतिहासाच्या व्यासंगाची विशेष आवड होती. पण मधूनमधून इतिहासाचा व्यासंग सोडावा लागला. अखेर फ्रेंच राज्यक्रान्ती-वरील ग्रंथ प्रसिद्ध केला. १८४९ साली फ्रेंच घटना समितीचे सदस्य झाले. कामगारांची बाजू मोठ्या हिरीरीने मांडत. विरोध वाढल्यामुळे इंग्लंडला पलायन केले. पॅरिसमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रामार्फत आपले समाजवादी विचार प्रसृत करण्याचा त्यांचा परिपाठ होता.

३०. हाम्. जॉर्ज एन्. : *इकॉनॉमिक सिस्टिम्स–ए कंपॅरिटिव्ह ॲनॉलीसिस*, होल्ट, राइनहार्ट अँड विन्स्टन, न्यूयॉर्क, १९६२, पृ. ११८–१२०.

३१. लाउक्स : पूर्वोक्त पृ. १८०

३२. वेब, ( सिडने–बियाट्रिस ) : *दि डीके ऑफ कॅपिटॅलिस्टिक सिविलायझेशन*. पृ. २.

३३. पिगू : *सोशॅलिझम व्हर्सेस कॅपिटॅलिझम*, मॅक्मिलन, लंडन, १९६८, पृ. २.

३४. डिकिन्सन, एच्. डी. *दि इकॉनॉमिक्स ऑफ सोशॅलिझम* पृ. १०

३५. ४ जानेवारी १८८४ रोजी झालेल्या सभेत 'फेबियन सोसायटी' हे नाव धारण करणारा ठराव संमत झाला असला तरी या संस्थेच्या स्थापने-बाबतची पहिली सभा १८८३ सालच्या अखेरीस झाली होती. पाहा : कोल, मार्गारेट : *दि स्टोरी ऑफ फेबियन सोशॅलिझम*, हाइनमान, लंडन, १९६१, पृ. ४

३६. फेबियस हे नाव धारण करणारे अनेक रोमन योद्धे व मुत्सद्दी होऊन गेले. पैकी ज्याच्यावरून फेबियन सोसायटीने आपले नाव घेतले तो क्विंटस फेबियस मॅक्झिमस हा योद्धा कन्क्टॅटर या नावाने ओळखला जातो. इसवी सनापूर्वी २३३ ते २०३ हा त्याचा राजकीय कर्तृत्वाचा काळ. हन्नीबालला हतबल करताना त्याचे संथपणाचे व गनिमी काव्याचे धोरण यशस्वी झाले.

३७. हिंसेचा वा बळाचा पुरस्कार बोल्शेविझम कोणत्या शद्बात करतो हेही पाहणे आवश्यक आहे. नमुन्यादाखल खालील उतारा पाहा :

"आणि तरीसुद्धा लेनिननी म्हटल्याप्रमाणे 'जनतेविरुद्धच्या हिंसेला आमच्या ध्येयप्रणालीत स्थान नाही.' ज्या वर्गाने शतकानुशतके दडपशाही,

भयंकर क्रौर्य व ससेहोलपट यांचा अनुभव घेतला आहे तो वर्ग, ज्या समाजव्यवस्थेत जनतेविरूद्ध हिंसेचा वापर केला जातो, जनतेवर दडपशाही व अपमान लादण्यासारखी परिस्थिती असते त्या व्यवस्थेचा तीव्र द्वेष करतो. त्याचबरोबर ज्यांनी त्याचे शोषण केले, त्यांच्यावर सूड घेण्याची मनीषा तो बाळगत नाही. तो सत्ता हाती घेतो ती सूड उगवण्यासाठी नव्हे तर नव्या समाजाची उभारणी करण्यासाठी आणि जनतेची शोषणापासून व दडपशाहीपासून मुक्तता करण्यासाठी !......... अस्तास जाणाऱ्या वर्गांनी प्रथम शस्त्रे हाती घेतल्यामुळेच कामगार वर्गाला हिंसा करणे भाग पडते. तेव्हा त्याची जबाबदारी नव्या समाजवादी पक्षावर पडत नाही, जुन्या भांडलदारी समाजावर पडते." **ओ. व्ही. कूझिनेन आणि इतर : अनु. सौ. सरला कारखानीस :** ***मार्क्सवाद–लेनिनवादाची मूलतत्त्वे,*** भाग चौथा, पी. पी. एच्. बुकस्टॉल, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६८ पृ. ५–६.

३८. इंग्रजीत डिक्टेटरशिप ऑफ दि प्रोल्टॅरिएट असे म्हणतात. कोणी त्याचे मराठी भाषांतर 'कामगार वर्गाची अधिसत्ता' असेदेखील करतात. पाहा– तत्रैव : पृ. १.

३९. स्टॅलिन यांचे १९३९ सालचे उद्‌गार मार्मिक आहेत. ते म्हणतात, '( राज्ययंत्र श्रमिकांनी काबीज केल्यानंतर वर्गविहीन समाज निर्माण होतो. शोषित वर्ग उरत नाही. त्यामुळे राज्यसत्तेची गरज उरत नाही. राज्यसत्तेचे उच्चाटन न होता ती विलय पावते ) हे एन्गलस यांचे समाजवादी राज्याविषयीचे भाकित एकटयादुकटया समाजवादी राज्याला लागू पडत नाही. भांडवलशाही राष्ट्रांनी वेढलेल्या समाजवादी राष्ट्राला परकीय हल्ल्यापासून समाजवादी विजयाचा बचाव करावयाचा असेल तर समाजवादी राज्य सामर्थ्यवान असले पाहिजे. म्हणून श्रमिकांची अधिसत्ता संपून पूर्ण साम्यवाद अवतरला तरी राज्यसंस्था राहीलच. परकीयांच्या लष्करी हल्ल्याचा धोका नष्ट होत नाही व भांडवलशाही राष्ट्रांचे कडे उध्वस्त होत नाही तोपर्यंत राज्यसंस्था राहीलच.' **स्टॅलिन, जे. :** ***'रिपोर्ट ऑन दि वर्क ऑफ दि सेंट्रल कमिटी टू दि एटीन्थ कॉंग्रेस ऑफ दि सी. पी. एस्. यू. (बी.); ' दि लॅंड ऑफ सोशॅलिझम टू डे अँड टुमॉरो,*** पृ. ४७-९१, मास्को, फॉरिन लॅंग्वेजेस पब्लिशिंग हाऊस, १९३९. **हॅरी श्वार्ट्झ :** ***राशियाज सोव्हिएट इकॉनॉमी,*** दुसरी आवृत्ती, १९६३, प्रेंटिस हॉल, नवी दिल्ली, पृ. ८१–८२ वर उल्लेखल्याप्रमाणे.

श्रमिकांच्या हुकूमशाहीचा कालखंड लांबविण्यासाठीच स्टॅलिन यांनी आंतरराष्ट्रीय साम्यवादी विजयापेक्षा राष्ट्रीय साम्यवादी विजयास प्राधान्य दिले आहे.


४०. **जावडेकर, शंकर दत्तात्रेय (आचार्य) :** ***समाजवाद आणि सर्वोदय (तुलनात्मक विवेचन)*** सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९५७ पृ. ६२.

४१. तत्रैव, पृ. ६४.

४२. तत्रैव, पृ. ६६.

४३. **गव्हर्मेंट ऑफ इंडिया,** ***दि सेकंड फाइव्ह इयर प्लॅन,*** पृ. २२

४४. **गव्हर्मेन्ट ऑफ इंडिया,** ***दि थर्ड फाइव्ह इयर प्लॅन,*** पृ. १९.

४५. **श्रीमन्नारायण,** ***सोशॅलिझम इन इंडियन प्लॅनिंग,*** एशिया, मुंबई, १९६४, पृ. ११९–१२०.

४६. **लांगे, ओस्कार :** ***ऑन दि इकॉनॉमिक थिअरी ऑफ सोशॅलिझम*** (संपा. बेजामिन इ. लिपिनकॉट), मॅकग्रॉ–हिल बुक कं. न्यूयॉर्क, १९६४, पृ. ५७–५८

४७. **श्नित्झर आणि नॉरदायके :** ***कंपॅरिटिव्ह इकॉनॉमिक सिस्टीम्स,*** साउथ वेस्टर्न पब्लिशिंग कं., सिनसिनाटी, ओहिओ, १९७१, पृ. ६२१

४८. **लांगे, ओस्कार :** पूर्वोक्त, पृ. १०९.

४९. तत्रैव, पृ. १८–२१

५०. **क्रॉसलँड, सी. ए. आर्. :** ***दि फ्यूचर ऑफ सोशॅलिझम,*** जोनाथन केप, लंडन, १९५६, पृ. ११४.

५१. तत्रैव, पृ. ५१८.

५२. **विल्सन, हॅरॉल्ड :** ***दि रेलेव्हन्स ऑफ ब्रिटिश सोशॅलिझम,*** वेडनफेल्ड अँड निकोल्सन, लंडन, १९६४, पृ. ११–१२.


◊ ◊ ◊

# परिशिष्ट

## लोकशाही–समाजवाद *

देशाला दास्यमुक्त करणाऱ्या इंडियन नॅशनल काँग्रेसची भूमिका केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यापुरती मर्यादित नव्हती. तिच्या ध्येयाला सामाजिक पैलूदेखील होते. राष्ट्रीय चळवळीचे सामाजिक अधिष्ठान अधिक प्रकाशात आले ते म. गांधींच्या नेतृत्वाचा उदय झाल्यानंतर. काँग्रेसच्या पुष्कळ ठरावात या सामाजिक अधिष्ठानाचा उल्लेख होत आला आहे. १९३१ सालचा कराची ठराव या संदर्भात उल्लेखनीय आहे. जातीय ऐक्य, अस्पृश्यता निवारण, सामाजिक क्षेत्रातील वनितोद्धार, ग्रामीण विकास, कुटिरोद्योग असे कित्येक विधायक उपक्रम महात्माजींनी हाती घेतले. सामाजिक ध्येयाचा पाठपुरावा करणे हाच या कार्यक्रमामागील हेतू होता. असल्या कार्यक्रमातून नवनव्या प्रेरणा निर्माण झाल्या. त्या स्वातंत्र्य चळवळीला बलवान करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरल्या.

२. स्वातंत्र्य मिळाल्यावर, सहाजीकच, सत्ताधारी पक्ष या नात्याने, आपल्या सामाजिक उद्दिष्टांना निश्चित आकार देण्याची आणि ध्येयसिद्धीसाठी कर्तेपण अंगिकारण्याची कामगिरी काँग्रेसला अपरिहार्य होऊन बसली. भारतीय राज्यघटनेचा सरनामा आणि मार्गदर्शक तत्त्वे यांची आखणी, हाच ध्येयसिद्धीचा हेतू बाळगून करण्यात आली. घटना मंजूर झाली आणि काँग्रेसची ती ध्येये आणि उद्दिष्टे नंतर राष्ट्राची ध्येये आणि उद्दिष्टे बनली.

### आवडी ठराव

३. भारतीय राज्यघटनेतील सरनामा आणि राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये अनुस्यूत असलेल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी व काँग्रेसच्या उद्दिष्ट

---

* इंडियन नॅशनल काँग्रेसच्या भुवनेश्वर अधिवेशनात जानेवारी १९६४ मध्ये संमत झालेल्या लोकशाही–समाजवादावरील विख्यात ठरावाचे मराठी रूपांतर. अंमलबजावणीची त्यातल्या त्यात जास्त शक्यता असलेले समाजवादी धोरण व कार्यक्रम यांचा एक प्रतिनिधिक नमुना म्हणून वाचकांच्या सोईसाठी येथे देत आहे. चिकित्सक अभ्यासकांनी सदर ठराव मूळ इंग्रजीत वाचलयास उत्तम.

— लेखक

पूर्तीसाठी देखील नियोजनाचे प्रयोजन असावे असे या संदर्भात १९५५ च्या आवडी काँग्रेसमध्ये निश्चित करण्यात आले. आवडी ठरावात समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीचा आदेश होता. प्रमुख उत्पादन साधनांची सामाजिक मालकी अथवा सामाजिक नियंत्रण, वर्धमान उत्पादन आणि राष्ट्रीय संपत्तीचे न्याय्य वाटप या गुणांनी युक्त अशी ती समाजवादी समाजरचना असावी असेही त्यात म्हटले होते. आपल्या घटनेतील पहिल्या कलमाद्वारे समाजवादी–सहकारी–राष्ट्रकुल शांततामय आणि उचित मार्गांनी स्थापज्यात यावे या उद्दिष्टास काँग्रेसने १९५७ साली औपचारिक मान्यता दिली. अशा रीतीने समाजवादी समाजरचना हे काँग्रेसचे ध्येय बनले. या ध्येयाच्या दिशेने धिमेपणाने व जाणीवपूर्वक वाटचाल काँग्रेस पक्ष करीत आहे असे पक्षाच्या कृतिप्रधान इतिहास सांगतो.

४. ‘समाजवादासाठी नियोजन’ या मुद्यावर काँग्रेसने यानंतर दोन निवडणुका लढविल्या. या धोरणांना भारतीय जनतेने बहुतांशाने मान्यता दिली आहे. हे ध्येय विविध पंचवार्षिक योजना आखतानादेखील नजरेसमोर ठेवले होते. आर्थिक विकासाप्रीत्यर्थं समाजवादी दृष्टिकोण संसदेनेदेखील स्वीकारला आहे.

५. समाजवादाचे ध्येय अधिक परिपूर्णतेने साकार करता यावे यासाठी असलेल्या कार्यक्रमाची महत्त्वाची वैशिष्टचे आणि काँग्रेसच्या दृष्टिकोणामागील मूलभूत कल्पना यांना प्रकाशात ठेवणे आवश्यक झाले आहे.

## लोकशाही समाजवाद

६. आर्थिक आणि सामाजिक संबंधांची क्रान्ती भारतीय समाजात व्हावी म्हणून काँग्रेस प्रयत्नशील आहे. क्रान्ती व्हावी म्हणून जनतेच्या प्रवृत्तीत आणि दृष्टीत जमीन अस्मानाचा बदल घडवून आणला पाहिजे. इतकेच नव्हे तर जनता ज्या सामाजिक संस्थांमार्फत क्रियाशील राहते त्या सामाजिक संस्थांत देखील तेवढाच बदल घडवून आणला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला स्वास्थ्याची शाश्वती मिळेल अशाप्रकारे मानवी आणि वस्तुमय साधनसामुग्रीचा जास्तीतजास्त परिणामकारक वापर करून देशात समृद्ध अर्थकारण निर्माण करणे हे आपल्यापुढील ध्येय आहे. समान संधी आणि प्रगतीतील न्याय्य वाटा या दोन गोष्टी प्रत्येकाला मिळाल्या पाहिजेत. खास हक्क, विषमता आणि शोषण यांचे उच्चाटन झाले पाहिजे. घटनेंत सांगितलेले लोकशाही मार्ग आणि मूल्य यांचे जतन व अभिवृद्धी करून जनतेच्या संमतीने व शांततामय मार्गाने हा बदल घडवन आणावा लागेल. लोकशाही, व्यक्तिमात्राची प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांच्यावर अधिष्ठित लोकशाही समाजवाद हाच काँग्रेस पुढील आदर्श आहे.

७. समाजवादी समाज निर्माण करण्यासाठी गरीबी– सोबतच्या सर्व आपत्तीसह– हटविली पाहिजे. यासाठी आर्थिक विकास द्रुतगतीने झाला पाहिजे. शेती, उद्योग या क्षेत्रातील उत्पादन-पातळी अखंडपणे वाढत राहिली पाहिजे. आपल्या मनुष्यबळाचा व नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करण्यास आपण असमर्थ ठरल्यामुळे आतापर्यंत आपल्या अर्थकारणाचा विकास मंदपणे झाला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील प्रगतीचा पुरेसा लाभ घेण्यात आपल्याला अपयश यामुळेच आले आहे.

## तंत्र-पातळीतील सुधारणा

८. उत्पादनाचे आधुनिक उपकरण झटपट उभे करावे लागते. तरच देशाच्या अर्थकारणाचे रूपांतर उच्च उत्पादन पातळीच्या आधुनिक आणि कार्यक्षम अर्थकारणात करता येते भारताची शेती मागासलेली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रगतीतीचा लाभ शेती क्षेत्रातील उत्पादनाला अधिक प्रमाणावर उपलब्ध झाला पाहिजे. विकेन्द्रित अवस्थेतील छोटया उद्योगांना तसेच कुटिरोद्योगांना देशाच्या अर्थकारणात महत्त्वाचे स्थान मिळत रहाणार आहे. आपल्याकडे भरपूर मनुष्यबळ उपलब्ध असून ते वाढतच आहे. ही गोष्ट ग्रामीण भागांत विशेषकरून जाणवते. या मनुष्यबळासाठी रोजगाराची संधी निर्माण करावी लागेल. छोटया उद्योगावाटे व कुटिरोद्योगावाटे गरजेइतका रोजगार पुरवावयाचा झाला आणि त्यांना वेतन वाजवी मोबदल्याच्या स्वरूपात द्यावयाचे ठरविले तर त्यासाठी तंत्रपातळीत जलद व अखंडपणे सुधारणा करणे भाग आहे. तसेच ग्रामीण विकासासाठी शक्य तितक्या विस्तृत प्रमाणावर वीज वगैरे शक्ति-साधने पुरविली पाहिजेत.

## नियोजनाचा स्वीकार

९. विकासाचा समाधानकारक दर आणि अर्थकारणासाठी मजबूत पाया या गोष्टी साध्य करावयाच्या असतील तर नियोजनाचा स्वीकार अपरिहार्य ठरतो. मानवेतर सामुग्री, कौशल्य आणि तांत्रिक ज्ञान या स्वरूपातील साधने आपल्याजवळ मर्यादित प्रमाणात आहेत. या दुर्मीळ साधनांचा जास्तीतजास्त चांगला वापर करावयाचा झाल्यास अग्रस्थाने निश्चित करावी लागतील आणि त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सुसंगत धोरणे आणि संघटना यांना आकार द्यावा लागेल. एकंदरीत, काँग्रेसने नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा स्वीकार केला आहे.

१०. उत्पादनाची लक्षे आणि योजनेतील सामाजिक उद्दिष्टचे यांच्या प्राप्तीसाठी निरनिराळ्या स्तरांवर, नियोजित अर्थव्यवस्थेच्या शिस्तबद्धतेनुसार, नियमन आवश्यक होऊन बसते आर्थिक विकासामुळे प्राप्तीतील विषमता वाढीस लागत नाही आणि संपत्ती व उत्पादनसाधने यांचे, समाजाचे अहित

होईल अशा प्रकारे केंद्रीकरण होत नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसे झाल्यास सामाजिक-स्थैर्यास धोका निर्माण होईल. उलटपक्षी, एक न्याधिष्ठित समाज क्रमाक्रमाने नजरेसमोर साकार होत असल्याचे चित्र जनतेला दिसले तर विकासविषयक कर्तव्ये पार पाडताना जनतेच्या उत्साहाचा व सहकाराचा लाभ होईल व ती बाब, प्रगतीची गती वाढविण्याच्या आणि साधनसामुग्रीची जुळवाजुळव करण्याच्या बाबतीत एक महत्त्वाची बाब ठरेल.

## राष्ट्रीय किमान राहणीमान

११. प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत गरजा भागविण्याची तरतूद ठेवणे आणि अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या अत्यावश्यक गरजांनी युक्त असे राष्ट्रीय किमान राहणीमान लौकरात लौकर निश्चित करणे या गोष्टी या संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या बाबतीत देशाने आपल्या समोरील उद्दिष्ट निश्चित करावे म्हणजे पाचव्या योजनेच्या अखेरीस ते बऱ्याच अंशी सफल होईल असे अपेक्षिणे योग्य ठरेल. नाहीतर, नियोजन आणि प्रगती या गोष्टी सामान्य माणसाच्या दृष्टीने अर्थशून्य ठरतील. आज अस्तित्त्वात असलेली प्राप्ती आणि संपत्ती यांच्यातील प्रचंड विषमता कमी करण्याचे साधन म्हणूनदेखील राष्ट्रीय किमान राहणीमानाची आवश्यकता राहील. शिखर आणि तळ यांच्यातील अंतर वाजवी काळात, परिणामकारक पद्धतीने कमी होईल असे इतर उपायदेखील योजावे लागतील. हे उपाय धोरण आणि संघटन या दोन्ही क्षेत्रातील असतील.

१२. खाजगी क्षेत्रात असलेली मालमत्ता आणि प्राप्ती यांच्यावर मर्यादा घालणे जरूरीचे आहे. या मर्यादा, वारसा हक्काने आलेली मालमत्ता आणि शहरी मालमत्ता यांच्या बाबतीत विशेषेकरून असल्या पाहिजेत. विनाकष्ट प्राप्ती आणि मांडवली लाभ यामधील वाढ यांच्यातील वाटा राज्यसंस्थेने सध्यापेक्षा अधिक प्रमाणात आपल्याकडे ठेवला पाहिजे.

१३. आपली सामाजिक उद्दिष्टे आणि राष्ट्रीय अग्रस्थाने यांच्याशी सुसंगत अशाप्रकारे पतसाधने आणि गुंतवणूक–सामुग्री यांचा विनियोग करणे शक्य व्हावे यादृष्टीने सरकारकडे सध्यापेक्षा अधिक परिणामकारक अधिकार असावे. अर्थ-पुरवठा उपलब्ध होण्याच्या बाबतीत छोटे उद्योगपती आणि नवागत यांची भलतीच आबाळ होते. अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांचे दुरुपयोग व गैरप्रकार यांचे उच्चाटन करण्यासाठी आणखी उपाय योजण्याची गरज आहे.

## सार्वजनिक, खाजगी आणि सहकारी क्षेत्रे

१४. भारत सरकारच्या औद्योगिक धोरणविषयक ठरावात सांगितल्या-प्रमाणे व्यापार आणि उद्योग क्षेत्रात मोक्याची आणि वरचढ भूमिका बजावणे

सार्वजनिक क्षेत्राला भाग आहे. मोठ्या प्रमाणावरील उद्योग आणि व्यापार या क्षेत्रात सार्वजनिक विभाग दिवसेंदिवस वाढत राहिलाच पाहिजे. अवजड आणि मूलभूत उद्योग आणि अत्यावश्यक वस्तूंचा व्यापार या क्षेत्रात तसे विशेषेकरून झाले पाहिजे. खाजगी क्षेत्राला अर्थकारणात महत्त्वाची भूमिका आहे. राष्ट्रीय योजनेतील विकासाच्या स्थूल व्यूहरचनेला अनुसरून खाजगी क्षेत्राला आपली भूमिका पार पाडावी लागेल. खासगी क्षेत्रात– सहकारी संघटन प्रकाराला– विशेषतः शेती, लघु उद्योग, प्रक्रिया उद्योग आणि किरकोळ व्यापार या क्षेत्रात– अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत जाईल.

१५. उचित उत्तेजनाची तरतूद करीत असतानाच उद्योग–संघटन क्षेत्रात समाज, ग्राहक आणि कामगार यांचे हितसंबंध परिणामकारकरित्या सुरक्षित ठेवलेच पाहिजेत. उद्योगाच्या व्यवस्थापनात कामगाराला मोठ्या प्रमाणावर संलग्न करून घ्यावे. या दिशेने प्रगती जलद झाली पाहिजे. त्यामुळे कामगाराला उद्योगात सहभागी होत असल्याची भावना होईल व त्याला जास्तीतजास्त उत्पादन करणे शक्य होईल.

## किंमत-नियंत्रण

१६. कनिष्ठ उत्पन्न–गट आणि दुर्बल–गट यांना भावमान हा अति-जिव्हाळ्याचा विषय वाटतो. किंमत-वाढीला संक्षेप देण्यासाठी प्राप्तीत प्रमाणशीर वाढ करूनदेखील नेहमी भागतेच असे नाही. उत्पादन-वाढीसाठी शक्य ते सर्व उपाय योजले पाहिजेत. त्याचवेळी, टंचाई उद्‌भवल्यास, सदर परिस्थितीचा गैरफायदा घेण्यास प्रतिबंध करणारी उपाययोजना सज्ज ठेवावी लागेल. समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने अपरिहार्य होईल तेव्हाच नियंत्रणे आणावीत. जनतेची हरकत नियंत्रणांना नसते तर सदोष कारभाराला असते. नियंत्रण–व्यवहार यशस्वी व्हावेत म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा झाली पाहिजे. कार्यक्षम आणि सचोटीचे प्रशासन यांची या संदर्भात आवश्यकता आहे.

## कृषि-अर्थकारणाची संरचना

१७. कृषि-अर्थकारणाची रचना, कृषिधिष्ठित संबंध आणि कायदा या बाबी, भारतासारख्या कृषिप्रधान देशात फार महत्त्वाच्या ठरतात. भारताचा औद्योगिक विकास वृद्धिगत कृषि-उत्पन्नाशी दूरान्वयाने निगडीत आहे. म्हणून देखील वरील बाबीना आणखी महत्त्व आहे. कृषि-उत्पादनातील वाढ अधिक वेगाने झाली नाही तर आपल्या वाढत्या लोकसंख्येमुळे भारताला अन्नपुरवठ्या-साठी बाह्य जगावर अवलंबून रहावे लागेल.

१८. शेतकऱ्याच्या हातून उत्पादन जास्तीतजास्त व्हावे म्हणून त्याला लागणारी साधने आणि इतर सोई यांची वेळेवर तरतूद होईल याची समाजाने

योग्य यंत्रणेद्वारा पूर्ण जबाबदारी उचलली पाहिजे. ग्रामीण भागात प्राप्ती आणि रोजगार यांची वाढ व्हावी म्हणून पशुधनाची पैदास आणि फळबागा यांच्या विकासाकडे अधिक लक्ष देणे जरूरीचे आहे. शेतकऱ्यांच्यासाठी विविध प्रकारचा पतपुरवठा करता यावा यासाठी राष्ट्रीय पातळीपासून पंचायत–पातळीपर्यंत निरनिराळ्या स्तरांवर स्वतंत्र संस्था स्थापन केल्या पाहिजेत. पत ठरवावी ती उत्पादनक्षमतेवरून. ती मालकीच्या मालमत्तेच्या तारणावरुन नेहमीच ठरावी असे नाही. शेतीत गुंतलेल्यांना लाभलेल्या सवलती आणि सामुग्री यांचा जास्तीतजास्त चांगला वापर करता यावा यादृष्टीनें प्रशिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. शेतकऱ्याचे हवामानाच्या लहरीपणापासून संरक्षण करण्यासाठी पिके आणि पशुधन यांचे विमे उतरविण्यास प्रारंभ व्हावा.

किफायतशीर नसलेली जमिनीची छोटी धारणा क्षेत्रे सहकारी तत्त्वाखाली विस्तृत करणे महत्त्वाचे आहे. मात्र हे स्वेच्छेवर असावे. जमिनीपासून मिळणारे उत्पादन वाढवत नेण्याच्या बाबतीत शक्य तितके प्रयत्न व्हावेत शेतकऱ्याला त्याच्या मालाची पुरेशी किंमत मिळाली पाहिजे. मगच आवश्यक तितकी गुंतवणूक करणे शेतकऱ्याला शक्य होईल. शेतमालावरील प्रक्रिया करणारे उद्योग खाजगी मालकीत राहता कामा नयेत. भातावरील प्रक्रियेच्या बाबतीत हे कटाक्षाने पाळले जावे. भात सडण्याच्या गिरण्या आणि इतर प्रक्रिया करणारे कारखाने सहकारी व्यवस्थापनाखाली चालावेत. हे जोपर्यंत सर्वत्र शक्य होत नाही तोपर्यंत असे प्रक्रिया कारखाने चालविण्याचे कार्य सरकारने क्रमाक्रमाने आपल्याकडे घेत राहिले पाहिजे. शक्य असेल तेथेपर्यंत शेतमालाचा विक्रय सहकारी यंत्रणेमार्फतच झाला पाहिजे. मध्यस्थांच्या बेसुमार नफ्याचे उच्चाटन करण्यासाठी आणि उत्पादक आणि ग्राहक यांना वाजवी भावाच्या बाजाराची हमी देण्याच्या दृष्टीने सहाय्यभूत होणाऱ्या उपायांपैकी योजावयाचे हे उपाय आहेत.

१९. खरोखरी जमीन कसणारा आणि राज्यसंस्था यांच्यातील संबंध प्रत्यक्ष स्वरूपाचे– म्हणजे मध्यस्थविहीन– असले पाहिजेत. हे काँग्रेसचे जमिनी-बाबतचे ध्येय–धोरण ठरलेले आहे. यापुढे व्यक्तीने कसावयाच्या धारणाक्षेत्रावर कमाल मर्यादा आणली पाहिजे. किमान वेतन आणि दुय्यम व्यवसायातील रोजगार यांबाबत शेतमजुरांचा खास करून विचार झाला पाहिजे.

सहकारी तत्त्वावरील ग्रामीण अर्थकारण हे भूमिसुधाराचे उद्दिष्ट असले पाहिजे. हे सहकारीकरण ऐच्छिक स्वरूपाचे आणि ग्रामीण समाजावर अधिष्ठित असले पाहिजे. भूमिसुधार कायद्यांची अंमलबजावणी कोठे कमी कोठे अधिक अशा प्रमाणात देशभर झाली आहे. भूमिसुधाराचा सर्व कार्यक्रम पुढील दोन वर्षांत पुरा व्हावा यादृष्टीने निकराचे प्रयत्न झाले पाहिजेत. पतपैसा, सामुग्री आणि क्रयविक्रयविषयक सोई शेतकऱ्यांना पुरविण्यात सहकारी संस्थांनी

महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे. कसणाऱ्यांच्या संमतीने शक्य तेथे संयुक्त सहकारी शेती संस्था काढल्या पाहिजेत. असल्या कार्यक्रमात पंचायत राज आणि सामूहिक विकास या संस्थांना मोठी कामगिरी बजावता येईल.

## संधीची जन्मसिद्ध समानता

२०. सामान्य माणूस आणि समाजातील दुर्बल घटक यांच्या यशोमार्गातील अडसर बऱ्याच प्रमाणात दूर करता येणे शक्य आहे. सामाजिक सुरक्षितता कार्यक्रमाच्या दिशेने नेटाने उपाय योजून आणि सामाजिक सेवांच्या क्षेत्रांतील आपल्या उपक्रमांना खास उजाळा देऊन संधीच्या समानतेची तरतूद करता येईल. विमोचन आणि साहाय्य या स्वरुपाचे काही उपाय आपद्ग्रस्तांच्या बाबतीत योजता येण्यासारखे आहेत. पण साधनसामुग्रीचा वापर अत्यंत फलदायी व्हावयाचा असेल तर त्यासाठी अग्रस्थानयुक्त अशा योजनेचा आधार घ्यावा लागेल. उदाहरणार्थं, ग्रामीण भागात. अगदी मर्यादित कालखंडात, सर्वत्र पिण्याच्या पाण्याची सोय झाली पाहिजे. शैक्षणिक सोईंचा प्रसार ही वरचा प्राधान्यक्रम लाभावा अशी दुसरी बाब. शिक्षण आणि आरोग्य या बाबतीत बालकाचा विचार सर्वप्रथम झाला पाहिजे. संधीची समानता बालकाला जन्मापासून लाभली पाहिजे प्रत्येक बालकाला, त्याच्या कुवतीनुसार, आवश्यक त्या सोई मिळाल्या पाहिजेत. कोणत्याही होतकरू मुलाला, आईबापांच्या दारिद्र्यामुळे, त्याच्या कुवतीची अत्युच्च शैक्षणिक पातळी गाठण्यास प्रतिबंध होता कामा नये.

२१. उच्च राहणीमान, सामाजिक न्याय, सामाजिक सुरक्षिता या बाबतीतील आपले यश जलद गतीचा आर्थिक विकास घडवून आणण्यातील आपल्या कामगिरीवर अवलंबून आहे. त्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा पुरेपूर उपयोग झाला पाहिजे. म्हणून वैज्ञानिक आणि तांत्रिक शिक्षणाचा प्रबंध मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. संशोधन–क्षेत्रात जलद प्रगती व्हावी आणि वैज्ञानिक दृष्टी आणि वातावरण यांची देशात अभिवृद्धी व्हावी या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत.

## लोकशाही आणि समाजवाद यांना धोका

२२. आपल्या आर्थिक व सामाजिक जीवनात समाजघातक प्रवृत्तींचा प्रादुर्भाव आहे. या प्रवृत्तीमुळे मक्तेदारी, विषमता आणि संपत्तीचे केंद्रीकरण होते. विविध स्वरूपातील अनुचित प्राप्ती, विविध कायद्याखालील कर्तव्ये पार पाडण्यातील टाळाटाळ वायदेबाजीतून होणारी प्राप्ती यांचा परिणाम म्हणून बिनहिशोबी पैशाच्या प्रचंड रकमा विवेकशून्य व्यक्तींच्या हाती राहिल्या आहेत. समाजविरोधी घटकांच्या वृत्तीमुळे अर्थकारण मोठ्या प्रमाणावर विच्छिन्न होत असते. समाजविघातक, रोगट प्रवृत्तीमुळे देशाच्या सामाजिक आणि राजकीय

जीवनाचा पाया खिळखिळा होऊ शकतो. समाजविघातक प्रेरणांची वाढ आणि त्यांचा भ्रष्टाचारी प्रभाव यामुळे लोकशाही व समाजवाद यांना धोका निर्माण झाल्याखेरीज रहात नाही. कडक आणि पद्धतशीर कारवाईच्या द्वारे हा धोका निवारला पाहिजे.

२३. देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग तौलनिकदृष्टचा मंद आहे. अंमलबजावणीतील दोष आणि उणीवा ही त्याची मुख्य कारणे आहेत. प्रशासन व्यवस्था आणि पंचवार्षिक योजनांत समाविष्ट असलेले धोरण-कार्यक्रम यांचा अंमलबजावणीविषयक कार्यभार यांच्यात पुन्हा एकदा समन्वय साधणे निकडीचे बनले आहे. नोकरशाहीच्या दृष्टीत आणि संघटनेंत प्रचंड बदल घडवून आणले पाहिजेत. प्रशासनविषयक दैनंदिन कामकाजास नव्या कार्यपद्धती स्वीकारल्या पाहिजेत.

## जीवन-चिंतनात मूलभूत बदल

२४. समाजातील आर्थिक संबंधात बदल घडवून आणणे येवढेच समाजवादापुढील मर्यादित कार्य नाही. सामाजिक रचनेतील मूलभूत बदलदेखील त्यात अंतर्भूत आहेत. आपली विचार करण्याची आणि जीवन जगण्याची पद्धतदेखील बदलली पाहिजे. काँग्रेसला अभिप्रेत असलेल्या समाजवादी व्यवस्थेत जात अथवा वर्ग यांना स्थान नाही. जन्म, जात, वर्ग, श्रीमंती अथवा सत्ताश्रेष्ठत्व यांच्यावर आधारलेल्या खास हक्कांविषयीच्या परंपरागत कल्पनांना मूठमाती दिली पाहिजे. श्रमाच्या प्रतिष्ठेला मान्यता मिळाली पाहिजे. जीवनाच्या प्रत्येक स्तरावर व्यक्तिमात्राला प्रतिष्ठेची शाश्वती असली पाहिजे. प्रत्येक काँग्रेसपक्षीय व्यक्तीने या समाजवादी तत्त्वज्ञानाचे आचरण ठेऊन त्याद्वारे समाजास स्वतःचे उदाहरण घालून दिले पाहिजे.

## नैतिक आणि अध्यात्मिक मूल्ये

नुसत्या लौकिक भरभराटीमुळे मानवी जीवन समृद्ध आणि आशयघन होणार नाही. म्हणून आर्थिक विकासाबरोबरच नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे पालन झाले पाहिजे. त्याशिवाय मानवी सामर्थ्य आणि मानवी चारित्र्य यांचा पुरेपूर विकास होणार नाही. यांच अधिष्ठानावर सध्याची संग्रहप्रधान समाजरचना हळूहळू बदलून तिचे रूपांतर ज्यात व्यक्ती आणि समाज यांच्या पूर्ण विकासास पुरेपूर उत्तेजन आहे अशा समाजवादी समाजात झाले पाहिजे.

२६. इंडियन नॅशनल काँग्रेसला अभिप्रेत असलेल्या भावी समाजाचे हे स्वप्नदर्शन आहे. या समाजात दारिद्र्य, रोगराई, अज्ञान यांचा मागमूस असणार नाही. मालमत्ता आणि खास हक्क यांना मोजकेच महत्त्व आणि सर्व नागरिकांना समान संधी असेल. नैतिक आणि अध्यात्मिक मूल्यांच्या आग्रहामुळे व्यक्तिजीवन आणि समाजजीवन संपन्न होण्यास येथे हातभार लागेल.

० ० ०

# नामसूची

श्रीमन्नारायण– ५३, ८०
एन्गल्स– ७४
एल्फिन्स्टीन– ३५
ओवेन– २६, ७३
कृपलानी– ५०
कारखानीस, सौ. सरला– ७९
कॉब्डन– ३५
किंग्जले– ४९
कूझिनेन– ७९
केन्स, जॉन नेविल– ७४
केन्स- जॉन मेनार्ड– २७, ३०, ७४
केली– ७२
कोल जी. डी. एच्.– ६९
कोल, मार्गारेट– ७८
कोंट– ३५
क्रॉसलँड– ८०

गॅल्ब्रेथ– ७२
गागारीन– ६१
गांधी, महात्मा– ४९, ५१

जयप्रकाश नारायण– ५०
जॉर्ज हेन्री– ७१
जावडेकर आचार्य– ४९, ८०

टॉल्स्टॉय– ४९
टेलर– ६८
डांगे श्री. अ.– ५०
डॉर्फमन– ७४
डॉब– ७२, ७५
डिकिन्सन– ४४, ४५ ५६, ५९, ६०, ६८, ७८
ड्यूहर्स्ट– ७२, ७३
डेव्हनपोर्ट– ७४

देव, नरेन्द्र–५०
नंबुद्रिपाद– ५१
नॉरदायके– ७१, ८०
नेहरू– ५०
पिअेर बंधू– ३५
पिगू–४४, ७८
प्रूधाँ–३३, ३६, ३७, ७७
फॉकनेर– ७२
फूर्ये– ३३, ३५, ३६, ३७, ७६
फेबियस, कन्क्टॅटर– ४६, ७८
ब्लॅंक– ३३, ३७, ३८, ७८
ब्रिस्को– ७२
बेलामी– ७२
मसानी– ५०
मॅक्नामारा– ६६

मायझ्रेस– ६३, ६४
मार्क्स– २६, २७, २८, ३३, ३८, ४३, ७३
मार्शल– ७४
मिचेल–७४
मेहता, अशोक– ५०
रणदिवे बी. टी.– ५१
राज कपूर– ७१
रॉय, मानवेन्द्र– ५१
रिकॅर्डो– ४६
रे– ५१
लगलिन– ७४
लर्नर– ६९
लॉईड्स्– ७२
लाउक्स– ४३, ४५, ७१, ७३, ७८
लाँगे– ५९, ६४, ६८, ६९, ८०
ला प्ले– ४९
लिआँटिफ– ७६
लिबरमन– ७२
लेकाशमन– ७६
लेनिन– ३३, ४७, ४८, ७८
लेसेप्स– ३५
लोपोकोवा, लिडिया– ७५
लोहिया– ५०
विनोबा– ५०
विल्सन– ७०, ८०
वूल्फ, वर्जिनिया– ७५
वेब, सिडने–बियाट्रिस– ४४, ४५, ७८
वेब– ४६
वेब्लेन– २७, २८-२९, ७४, ७६
शॉ– ४६
श्वार्टझ्– ७९
श्नीत्झर– ७१, ८०
शुंपिटर– २७, ३१, ७५
शेवलियार– ३५
स्टॅलिन– ३३, ४८, ७९
स्ट्रॅची– ७५
स्वीझी– ६९
सायमन, सेंट– ३३, ३५, ३७
सिस्माँडी– ३३, ३६, ७६
सोरेल– ४६
हन्नीबाल- ७८
हॅरिसन, प्रेसिडेंट ७२
हाम– ५३, ७८
हेनमान–६९

◇ ◇ ◇

REFBK-0018711
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६०५६९ निबंध
२२८७८ ७१९।७३
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९८०७७

# विषय सूची

**अर्थव्यवस्था**

वर्गीकरण – २,७१
व्याख्या – १

**भांडवलशाही– ३–३१**

गुण – १३–२०
दोष – २०–२६
भवितव्य – २६–३१
वैशिष्टचे – ४–१३
व्याख्या – ३–४

**समाजवाद – ३२–७०**

ख्रिश्चन – ४८–४९
गुण – ५८–६२
दोष – ६२–६८
फेबियन – ४६
बोल्शेविझम – ४७–४८
भवितव्य – ६८–७०
भारतीय – ४९–५३
मार्क्सवाद – ३९–४३
लोकशाही-समाजवाद-८१-८८
( भुवनेश्वर ठराव )
वैशिष्टचे – ५३-५७
व्याख्या – ४३–४५
सिंडिकॅलिझम – ४६–४७